TEXT FLY WITHIN
THE BOOK ONLY

UNIVERSAL
LIBRARY
OU_192677
UNIVERSAL
LIBRARY

प्रकाशमाला पुष्प १२ वें

# पागलखाना

लेखिका

दुर्गाताई जोशी,

जी. ए., एम्. एल. ए.

१ सप्टेंबर १९४१] . किंमत १ रुपया [प्रथमावृत्ती

प्रकाशक—रामभाऊ भोगे, मॅनेजिंग डायरेक्टर,
दि प्रकाशमाला, लिमिटेड, अमळनेर.

## — आमचे प्रमुख विक्रेते —

१ परचुरे पुराणिक आणि मंडळी, मुंबई.
२ महाराष्ट्र ग्रंथभांडार, मुंबई व कोल्हापूर.
३ तुकाराम पुंडलीक शेटे, बुकसेलर्स, मुंबई.
४ वीणा प्रकाशन, नागपूर.
५ घारे आणि मंडळी, पुणें.

कोणतेही वाचनीय पुस्तकाकरिता 'दि प्रकाशमाला' लिमिटेड, अमळनेर, यांजकडे मागणी करावी.

: मुद्रक :
पांडुरंग नारायण बनहट्टी
नारायण मुद्रणालय, नागपूर.

# पागलखाना पाहण्यापूर्वी—

प्रकाशमालेचें १२ वें पुष्प वाचकांना सादर करतांना आम्हाला फार आनंद होत आहे. श्रीमती दुर्गाताई जोशी यांच्या मालेचे ४० वें पुष्प म्हणून हे पुस्तक प्रसिद्ध होणार होतें परंतु आमच्याबद्दल त्यांना वाटत असलेल्या आपुलकीमुळे त्यांनी हें पुस्तक आम्हास देऊन प्रकाशन कार्यास सर्वतोपरी सहकार्य केलें. याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

दुर्गाताईची तळमळ, अनुभव आणि भावी आकांक्षा त्यांच्या सर्व लिखाणांतून प्रतीत होत असल्याने त्यांचें लिखाण जनमनाचा चटकन ठाव घेते. आतांपावेतों लहानमोठीं चाळीस पुस्तकें त्यांनी प्रसिद्ध केलीं असून पुष्कळ पुस्तकांच्या दहावीस हजार प्रती खपल्या आहेत यावरून त्यांच्या लिखाणाची लोकप्रियता उघड होत आहे.

खेड्यांतील बहुजन समाजांत समरस होऊन राष्ट्रीय भावना जागृत करण्याकरितां अहर्निश प्रचार करणें हा ताईचा आवडता विषय; प्रचलित राजकीय स्थित्यंतरावर व्याख्याने देऊन व प्रचार पुस्तकें छापून त्यांचा प्रसार करणें हें त्यांचें नित्याचें कार्य आज वीस वर्षें अव्याहत चालू आहे. मध्यप्रांत कायदेमंडळाच्या त्या सभासद आहेत. खेड्यांतील अडाणी शेतकऱ्यांपासून तों लोकधुरीण राजकीय पुढाऱ्यांपर्यंत सर्वांच्या जीवनव्यापाराचें सूक्ष्म निरीक्षण त्यांनी केलेलें असल्यामुळे त्यांचें लिखाण अधिक वास्तववादी असणें अगदी स्वाभाविक आहे. अशा प्रथितयश लेखिकेचें हें पुस्तक वाचकांना आवडेल अशी आशा करतों.

आमचे अकोल्याचे मित्र श्री. अंकुशकर यांनी उत्तम चित्र काढून दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. अंकुशकर हे उत्तम कलावान असून देखील प्रसिद्धीपराङ्मुख असल्याने त्यांच्या कलेची माहिती पुष्कळ संपादकांना व प्रकाशकांना नसणें स्वाभाविक आहे. अल्पावधींत उत्तम चित्र काढून दिल्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहोंत.

नारायण मुद्रणालयाचे चालक श्री. बनहट्टी व सर्व कामगार बंधूचे सहकार्य व दाक्षिण्य प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकाशनाचे कामीं त्यांनी आपुलकीने दिल्याबद्दल त्यांचे आम्ही फार आभारी आहोंत.

—प्रकाशक

# अनुक्रमणिका


| विषय | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| | | स्वतंत्र भारताचें स्वप्न ! | ... | १ |
| प्रकरण | पहिलें | पागलखाना | ... | ५ |
| प्रकरण | दुसरें | राजकीय वेडे | ... | १० |
| प्रकरण | तिसरें | महिषासुरमर्दिनी | ... | १९ |
| प्रकरण | चवथें | सुवासिनीचा मृत्यु | ... | २५ |
| प्रकरण | पांचवें | मी वेडी आहें काय ? | ... | ३१ |
| प्रकरण | सहावें | गीता | ... | ३९ |
| प्रकरण | सातवें | भविष्य खरें ठरलें | ... | ४८ |
| प्रकरण | आठवें | पापग्रह मंत्रिमंडळ | ... | ५७ |
| प्रकरण | नववें | दडपशाहीचा वरवंटा | ... | ६५ |
| प्रकरण | दहावें | कुसंगतीचें फळ | ... | ६८ |
| प्रकरण | अकरावें | माझी मुलाखत | ... | ७४ |
| प्रकरण | बारावें | लोकमत | ... | ८१ |
| प्रकरण | तेरावें | पहिले सर्वाधिकारी | ... | ९० |
| प्रकरण | चवदावें | वेडयांचें प्रदर्शन ! | ... | ९७ |
| प्रकरण | पंधरावें | जनताजनार्दन | ... | १०१ |

# स्वतंत्र भारताचें स्वप्न !

" वन्दे मातरम् ! स्वातंत्र्य देवी की जय ! भारत माता की जय ! हिंददेवी की जय !

" सर्वत्र एकच कल्लोळ उडाला ! सर्वत्र तिरंगी झेंडे फडकत होते ! वाजंत्री, चौघडे, नगारे वाजत होते ! घरांपुढील अंगणांत कुंकुमाचे सडे घालून त्यावर कोणी सुंदर रंगवल्ली काढीत होते ! देवमंदिरें वेदमंत्र-घोषाने घुमत होतीं ! फुलमाळांनी शोभत होतीं ! घरोघर आंब्यांचीं तोरणें लागलीं होतीं ! राजरस्त्याने भारतीय गणवेषांत लष्कर 'विजयी विश्व तिरंगी प्यारा' हें गीत गात कूच करीत होतें.

रस्त्याने मिरवणुकी चालल्या होत्या. दौंडीवाले दौंड्या देत होते ! " स्वतंत्र भारत दिनाची सभा !" सर्वत्र आनंदी आनंद !

" अहो, काय हा सुंदर आणि सुगंधी वारा वाहत आहे ! तुषारासारख्या मधूनच पडणाऱ्या पावसाच्या योगाने, मातीच्या आणि सुवासिक पुष्पांच्या गंधाने तो भरलेला आहेसा वाटतो. आकाश कसें स्वच्छ आणि निरभ्र ! सूर्याच्या कोमल किरणाने सर्वत्र एक अभिनव असें तेज चमकतें आहे. आम्रवृक्षावरील कोकील व इतर पक्षी नेहमी पेक्षा जास्तच स्फूर्तियुक्त गात आहेत. गुलाबाच्या आणि टपोऱ्या मोगऱ्याच्या फुलांनी सृष्टिदेवी जणु आपली प्रसन्नताच व्यक्त करीत आहे" रस्त्याने जाणारा एक जण बोलला."

दुसरा म्हणतो, " पुण्यकाळीं असेंच होतें असें म्हणतात. आज शुक्ल पक्षांतील नवमी ना ? आहेच आजचा पवित्र दिवस ! अशाच एका दिवशीं, वसंतऋतूंत चैत्र महिन्यांत आणि पुष्य नक्षत्रावर रावणी

राज्याचा नाश करणारा प्रभु रामचंद्र जन्माला आला होता ना? पांच ग्रह आज उच्चीचे आहेत! तेव्हा भरतखंडांतहि कुणी तरी अज्ञात ईश्वरी शक्ति आज अवतरली असली पाहिजे! म्हणूनच ही स्वतंत्र भारताची घटना अकस्मात घडून आली!

इतिहासाची पुनरावृत्ति होते म्हणतात ती अशीच!"

तिसरा "परंतु आज जन्माला येणाऱ्या व्यक्तीला वनवास किंवा अज्ञात वासाचा योग चुकणार नाही! आणि त्यामुळे माझें मन कसें साशंक होत आहे!" कोण हा ज्योतिषी? मी तिरस्काराने एकाला विचारलें! पण माझा तिरस्कार पाहावयाला ते शब्द बोलणारी व्यक्ति थांबली होती थोडीच. झटकन केव्हाच गर्दींत विलीन झाली. कांही लोक हे असेंच वेळीं अवेळीं कांही तरी अशुभ बोलून बसतात! असें माझ्या मनांत आल्यावाचून राहिलें नाही.

पण भारत स्वतंत्र झाला म्हणजे झालें तरी काय? ही नेहमीची शंका माझ्या मनांत आली. स्वप्नांतसुद्धा कांही गोष्टींवर विश्वास बसत नसतो आणि ही गोष्ट देखील त्याचपैकी होय.

वर्तमानपत्रांत आलें होतें की, "व्हाईसरायसाहेबांनी काळ वेळ परिस्थिती ओळखली. संकटकाळीं प्रत्येक इंग्रज मनुष्य आपल्या मातृदेशांतच राहील म्हणून हिंदुस्थानांतील सर्व इंग्रज विमानमार्गें इंग्लंडला निघाले. आणि जातांना आम्ही हिंदुस्थान स्वतंत्र केला असें जाहीर करण्यास ते विसरले नाहीत.

"कांग्रेसने ताबडतोब मध्यवर्ती व्यवस्थेकरितां अष्टप्रधान मंडळ नेमून त्यावर एका सर्वाधिकाऱ्याची योजना केली. तसेंच सर्व प्रांतिक गव्हर्नरांच्या व कमिशनरांच्या जागांवर सर्वत्र हिंदी माणसांचीच नेमणूक केली. अशा तऱ्हेने तात्पुरती राज्यकारभाराची व्यवस्था केली आहे.

नरेंद्र मंडळाचेंच रूपांतर सल्लागार कमिटींत करून आंतर-प्रांतीय प्रश्न तूर्त येणेंप्रमाणें सोडवले जातील असें जाहिर केलें आहे. बाकी

सर्व कायदेमंडळें पूर्वीप्रमाणेंच कांहीं दिवस कामें करतील. मात्र प्रत्येक प्रांतांत प्रधानांचीं मंत्रिमंडळें राहतील. भारत आजपासून स्वतंत्र झाला.

( सही ) मध्यवर्ती सर्वाधिकारी ”

हें वाचून त्या आनंदाच्या क्षणांत माझ्या आत्म्याचा अगदी लय लागला. ‘स्वतंत्र भारत! स्वतंत्र भारत’ हा एकच ध्वनी मी ऐकत होतें. व डोळ्यासमोर आर्यांचा सूर्यचिन्हांकित ध्वज फडफडत होता!

पहाटेच्या सुंदर साखरझोपेंत मी हें नवभारताचें गोड स्वप्न पहात होतें! इतक्यांत राममन्दिरांतील नगारा सुरू झाला व मी जागृत झालें!

क्षणभर पडलेल्या स्वप्नसृष्टींत रंगूनच नवभारत ‘पागलखाना’ ही कादंबरी लिहिली गेली.

—लेखिका

# आ म चें प्र का श न

* मुंबई, वऱ्हाड, मध्यप्रांत व बडोदें शाळाखात्याने मंजूर केलेलीं संग्राह्य पुस्तकें.

## प्रकाशमालेचीं पुष्पें

*१ श्याम खंड १ ला, ले. साने गुरुजी, एम्. ए. १ रु.
*२ धडपडणारीं मुलें खंड १ ला, ले. साने गुरुजी, एम् ए. १ ,,
*३ जीवनकलह अर्थात् श्याम खंड २ रा,
लेखक, साने गुरुजी, एम्. ए. १ रु.
*४ जवाहरलाल नेहरू चरित्र, लेखक आपटे गुरुजी १२ आ.
*५ प्रकाशकिरणें, लेखक भी. रा. देवभानकर, बी. ए. १२ ,,
*६ कुटुंबरंजन, लेखक आपटे गुरुजी १ रु.
*७ रस्ते आणि फिरस्ते, ले. रा. ग. कुंभोजकर, एम्. ए., बी. टी. १। ,,
८ स्वदेशी समाज, ले. साने गुरुजी, एम्. ए. १० आ.
*९ माझी आई, ले. भी. रा. देवभानकर, बी. ए. १० आ.
*१० निळा पक्षी, लेखक, साने गुरुजी, एम्. ए. १। रु.
*११ लघुनिबंध, ले. रा. ग. कुंभोजकर, एम्. ए., बी. टी. १२ आ.
१२ खरें मीलन, ले. के. शं. हळदीकर १ रु.
*१३ वालूची लीला, ले. चित्रकार र. वा. केळकर, ए. एम्. ४ आ.
१४ पांढरे गुलाब, ले. विश्वनाथ बी. वाणी, बी. ए., बी. टी. १ रु.
१५ तिंबू नाना, ले. चित्रकार र. वा. केळकर, ए. एम्.
१६ घरगुती उद्योगधंदे आणि शेतकरी, ले. श्री. दुर्गाताई जोशी ४ आणे
१७ पागलखाना, ले. श्री. दुर्गाताई जोशी १ रु.

प्रकाशक : दि प्रकाशमाला लि०, अमळनेर, पू. खा.

# १. पागलखाना

'राष्ट्रीय सरकारची वेडयांच्याकरितां नवी योजना' या शीर्षकाखाली मध्यवर्ती सरकारकडून एक मोठी रक्कम मंजूर झाल्याचें सरकारी पत्रकांत प्रसिद्ध झालें. नवभारत पागलखान्याची आवश्यकता या शीर्षकाचा एक विस्तृत लेखहि त्यामध्ये होता. त्यांत पुढील भयंकर बातमी होती. "सरकारी डॉक्टरांच्या असें लक्षांत आलें आहे की, मेंदूच्या रोगाची एक भयंकर साथ हिंदुस्थानांत निर्माण झाली आहे. दुर्भाग्य असें की, या विपरीत रोगाने नवभारताचे पहिले सर्वाधिकारी, अध्यक्ष नामदार भारतनंदन, आणि त्यांच्याच अष्टप्रधानमंडळांतील, सर्वप्रिय वीर सत्यशील, पूज्य श्री. सवितादेवी या तिघांना एकाएकीं पछाडलें. हे मध्यवर्ती मंत्रिमंडळांतील प्रमुख तीन बळी घेऊनच हा रोग थांबला नसून कांही प्रांताचे प्रंतप्रधान आणि सहकारी मंत्री हेहि वेडे झाले आहेत. सरकारी तज्ज्ञ डॉक्टर सुप्रसिद्ध नर्मदापुत्र यांच्या अभिप्रायावरून आत्यंतिक मानसिक श्रमाचा हा परिणाम आहे असें होतें.

स्वातंत्र्य संग्रामामध्ये, ज्यांनी अत्यंत कष्ट केले, व म्हणून राष्ट्रीय सरकार स्थापन होतांच, सर्व जबाबदारीच्या व मानाच्या जागांवर मोठ्या आशेने लोकसभेने ज्यांची नेमणूक केली, ते थोर व योग्य पुढारी आमच्या दुर्दैवाने या त्यांच्या हक्काच्या स्थानावर फार दिवस राहूं शकले नाहीत.

"एकाएकीं गेल्या आषाढी एकादशीच्या दिवशीं अमरपुरांतील पांडव टेकडीवरील न्यायमन्दिर या नांवाने प्रसिद्ध असलेल्या जुन्या राजवाड्यांत अष्टप्रधानमंडळ एका गंभीर प्रश्नाचा विचार करण्याकरितां बसले असतां, त्यांच्या मेंदूंत विकृति झाल्याचें नजरेस आलें. आणि म्हणून तेथेच त्यांना ठेवण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. सुप्रसिद्ध व तज्ञ डॉक्टरांच्या कडून उपाययोजना सुरू आहे. पण गुण येण्याची आशा दिसत नाही. पूर्ण विश्रांतीची व चांगल्या देखरेखीची जरूर असल्याने या उत्तम व हवेशीर अशा राजवाड्यांतच दवाखान्याची सोय केली आहे.

"या दुर्दैवी घटनेपासून ही वेडाची साथ भयंकर वेगाने प्रांतोप्रांतीं प्रसार पावत असल्याचें येणाऱ्या बातम्यांवरून दिसतें. म्हणून अशा सर्व रोग्यांच्या करितां, नवभारत पागलखान्याची योजना केली असून त्याकरितां जुना न्यायमन्दिर राजवाडा हा यापुढे उपयोगांत आणावयाचें ठरलें आहे.

"सुप्रसिद्ध भाई काहूर, भाई आझाद, भाई नारद आणि भगिनी सुमित्रादेवी ही समाजसत्तावादी पुढारी मंडळीहि याच रोगाच्या तावडींत सापडल्याने येथेच ठेवण्यांत आलीं आहेत. म्हणजे राजकीय वेड्यांच्याकरितां ही खास व्यवस्था करण्यांत आली आहे. तरीहि पण येथील जागा चांगली हवेशीर असल्याने याच रोगाचे इतर रोगीहि येथे घेण्यांत येतील.

"या रोगाचीं विशेष लक्षणें म्हणजे मनुष्य अत्यंत शहाणपणाची कृति दाखवितो. या वेड्यांशीं भाषण केलें असतां त्यावरून कोणालाही त्यांच्या वेडेपणाची शंका येत नाही. तरी पण तपासणींत त्यांचे मेंदू फार झिजले आहेत असें आढळून आल्यामुळे त्यांना सरसहा लोकांना भेटण्याची परवानगी मिळणार नाही. या बंदीबद्दल लोकांनी तसेंच त्यांच्या नातेवाईकांनीहि विषाद मानूं नये, कारण हे सारे नियम त्यांच्या प्रकृतिसुधारणेच्या दृष्टीने केले आहेत.

"या देशभक्तांना देशसेवेमुळेच हा दुर्धर रोग जडला असल्यामुळे, त्यांच्या दुखण्याची खास सोय करणें तसेंच त्यांच्या आजाराचा खर्च सोसणें हें राष्ट्रीय सरकार आपलें पवित्र कर्तव्य समजतें. जनतेला अशी विनंती आहे की, राष्ट्रीय कार्य करणाऱ्या इतर कोणालाहि हा रोग झाल्याची थोडीहि शंका येतांच या लोकांना जनतेने तात्रडतोब इकडे पाठवून देण्याची कृपा करावी. त्यांना मोफत औषधोपचार केले जातील. मेंदूच्या रोगाची वाढ फार भयंकर वेगाने होत असून अपेक्षेबाहेर वेडयांची भरती येथे करावी लागत आहे. कारण हा नवभारत पागलखाना मध्यवर्ती असून अखिल हिंदुस्थानांत एकच आहे, त्यामुळे सर्व प्रांतांतून येथेच रोगी येतील."

यानंतर प्रत्येक राष्ट्रीय प्रांताच्या बजेटांत या वेडयांच्याकरितां खास रकमा मंजूर झाल्याचीं सरकारी पत्रकें निघूं लागलीं.

प्रत्येक राष्ट्रीय समजल्या जाणाऱ्या वर्तमानपत्रांतच केवळ नव्हे तर इतर सर्व वर्तमानपत्रांतहि या विषयाला खास स्थान मिळूं लागलें. वेडयांच्या हालचालींसंबंधीं विलक्षण प्रकारचीं वर्णनें येऊं लागलीं.

असल्या प्रकारचे भयंकर मजकूर वाचून माझ्या हृदयाचें पाणी पाणी झालें. आणि कुणाला हें ऐकून दुःख व हळहळ वाटणार नाही? अखिल हिंदुस्थानलाच हा वेडाचा विषय अत्यंत काळजीचा वाटूं लागला.

मोठया कष्टाने स्वातंत्र्य मिळविलें. जवळ जवळ दोनशें वर्षें इंग्रजांच्या सत्तेखाली जर्जर झालेला भारत आता रामराज्य नांदेल या कल्पनेने जरा समाधान पावला होता. अजून सारें राज्ययंत्र सुव्यवस्थित असलें होतें असें नाही. पाकिस्तान व भाषावर प्रांतरचना झाली नव्हती. हिंदुस्थानच्या या दोन गटाचे प्रश्न समाधानकारक सुटलें होते असेंहि नाही. राज्यघटना कायदा पूर्णत्व पावून निर्दोष झाला नव्हता. अनेक दुरुस्त्यांची त्यांत गरज होती. परराष्ट्रीय संबंध निश्चित ठरले

नव्हते. परंतु तो कालावधीचा प्रश्न होता. स्वराज्यप्राप्तीनंतर लागलीच उत्तम व्यवस्थेची अपेक्षा करणें ही एक प्रकारें चूकच होय. थोडे दिवस तरी बेबंदशाही ही अपरिहार्यच होती.

विशाल भारताच्या एकीकरणाचा प्रश्न सोपा तर नाहीच पण अत्यंत जटिल आहे; मध्यवर्ती सत्ता बळकट होण्यावरच ही गोष्ट पुष्कळ अंशीं अवलंबून असते. अष्टप्रधानमंडळ व एक सर्वाधिकारी ही सध्याची सर्वसंमत व्यवस्था होती. परंतु समाजसत्तावादी लोकांना ती सर्वथा पसंत नव्हती. सामाजिक पुनर्घटनेच्या प्रश्नाचें नित्य घुसळण सुरू होतें. मजूर व कारखानदार यांचे प्रश्न अजून कटकटीचेच होते. वगैरे अनेक गोष्टी अपूर्ण होत्या. परंतु सर्वाधिकारी भारतनंदन, वीर सत्यशील आणि, योगिनीतुल्य सवितादेवी व इतरहि कांही मंडळी ही आमची राज्यधुरा वाहण्यास, समर्थ आहेत असा जनतेचा विश्वास होता. प्रत्येक प्रांताच्या कायदेमंडळामध्येहि अष्टप्रधान नियुक्त केले होते. व या प्रत्येक टिकाणीं जनतेच्या विश्वासास पात्र असलेले एक दोन तरी थोर राज्यकार्यधुरंधर लोक होतेच. परंतु चमत्कार असा की, नेमक्या याच नेत्यांच्या मधून वेडाच्या साथीने आपले बळी शोधून काढले. हें आश्चर्य आणि दुर्दैव नव्हे तर काय?

वेड लागलेले लोकधुरीण लो. टिळक आणि म. गांधी या दोघांच्याही संस्कृतींत मुरलेले होते. एकंदरींत नवभारताचे हे अत्यंत आवडते आणि योग्य पुढारी या दुष्ट मेंदूच्या रोगाचे बळी झाले ही गोष्ट जनतेच्या घोर चिंतेचा विषय झाली होती यांत नवल नाही.

माझ्यासारख्या लोकांच्या हृदयांतील खळबळ व दुःख तर या प्रसंगीं असह्नीय होतें. कारण स्वराज्याकरितां सोसाव्या लागणाऱ्या कष्टांचा योग्य वाटा न उचलतां, लढाया न मारतां, देशाकरितां कसली झीज न सोसतां स्वराज्याची वाटणी व सौख्य मात्र भोगणाऱ्या दत्तकाप्रमाणे ऐतावा वर्गांतील मी एक होतों.

परकीय सत्तेखाली असलेल्या कॉलेजमधील मी एक प्रोफेसर होतों. स्वराज्याकरितां प्रत्यक्ष असें कोणतेंही काम मी केलें नव्हतें. तीन तास शिकवून तीन त्रिक नऊशें रुपये पगार घ्यावा व खुशाल संसारांत गर्क रहावें हा माझा खाक्या होता. देशाकरितां कोणताही त्याग मी धैर्यानें केला नव्हता. मग मी गुलाम वृत्तीचा आणि आपलें कातडें बचावणारा स्वार्थीच नव्हे तर काय?

मी सुखांत होतों खरा, परंतु देशसेवेच्या कर्तव्याची टोचणी वारंवार मला बेचैन करून सोडी. माझ्या देशांतील थोर आणि पूज्य देशभक्तांच्या बद्दल मला वाटणारी कृतज्ञता, प्रेम आणि आदर हे व्यक्त करण्याची पहिली संधि मी घेईन, असें मनाशीं मी नित्य ठरवीत असें. यंदाचा पदवीदान समारंभ सर्वाधिकाऱ्यांच्या कडूनच करण्याचें आमच्या विद्यापीठानें ठरवलें होतें. परंतु या अनपेक्षित घटनेनें हे आमचे सर्व मनांतील मनोरे मनांतच ढासळले!

# २. राजकीय वेडे

सारा दिवस तळमळ आणि हळ हळ! मन अत्यंत उदास! वास्तविक मी मानसशास्त्राचा प्रोफेसर! मी माझ्या मनाचा मालक असायला पाहिजे होते, पण छे:! मला कांही विलक्षणच मनस्ताप होऊं लागला. मनांत आणि जनांत तोच विषय घेऊन मी चर्चा करूं लागलों. कांही सुचना. शेवटीं आम्ही कांही मंडळी मिळून, परवानगी काढून, काय वाटेल तें झालें तरी नवभारत पागलखाना पहावयाला जावयाचें ठरवलें, तेव्हा कोठे मला जरा बरें वाटलें. एकदाची परवानगीही मिळाली व लगेच रात्रीच्या गाडीने दुसरे दिवशीं सुट्टी असल्यामुळे भरतपुराहून निघणाऱ्या मेलने कांही मित्रमंडळी, सौभाग्यवती व मी असे मार्गस्थ झालों.

गाडींत रात्रभर मला पागलखान्याचींच स्वप्नें पडत होतीं. ज्याचा ध्यास लागतो त्याचीं स्वप्नें पडतात हें जरी खरें असलें तरीही त्या दिवसाचा एक स्वप्नसाक्षात्कार मला सांगितल्यावाचून राहवतच नाही. धावत्या गाडींत, थोड्या जागेंत आणि ओढ लागलेल्या मनः-स्थितींत वास्तविक स्वस्थ झोप लागली नव्हती. परंतु डोळ्यावर थोडी गुंगी आली होती. त्या तंद्रेंत मला एक दृश्य दिसलें. सुंदर वृक्षलतांनी वेढलेले, चारीही बाजूने एक प्रकारच्या खडबडीत पांढऱ्या दगडाचे चार घाट असलेलें आणि मोत्यासारख्या स्वच्छ पाण्याचें असें सुंदर

सरोवर मला दिसलें. त्यामध्यें मध्यम वयाचा, दणकट शरीराचा, शुभ्र गौरवर्णाचा, उंच, सुंदर चेहऱ्याचा आणि शांत तेजाचा असा एक विशेष पुरुष त्या सरोवरांत उभा राहून सूर्याला अर्घ्य देत असतांना मला दिसला. एका कोपऱ्यांत पांढरी रिकामी होडी, पाण्याच्या लहरीवर हालचाल करीत होती. आणि मध्यावर एक तरुण जलविहार करीत होता.

दुसरें दृश्य एका बाईचें म्हणजे तापसीचें दिसलें. श्वेतवस्त्रधारी, मुक्तकेशा, अंगावर एकही अलंकार किंवा सौभाग्य चिन्ह नसलेली अशी मध्यम वयाचीच तरतरीत बाई, मृगाजिनावर बसून जप करितांना मला दिसली. त्या स्वप्नमय रात्रींतील हीं एकाच स्वप्नांतील दोन दृश्यें माझ्या मानसमन्दिरांत मला सतत दिसतात. हें सांगण्याचें कारण असें की, पागलखान्यांत पोचल्यावर विस्तीर्ण पांडवटेकडीच्या पटारावर एका टिकाणीं तसेंच सरोवर व तशींच इतर सर्व दृश्यें मी पाहिलीं. अर्घ्य देत असलेला तो पुरुष म्हणजे सर्वाधिकारी भारतनंदन, पोहणारा तरुण म्हणजे धीर सत्यशील आणि तापसी म्हणजे सविता देवी. या देशभक्तांना मी पूर्वी पाहिलें नव्हतें. त्यांचीं जणू छायाचित्रेंच मला कुणीतरी स्वप्नांत दाखविलीं. क्षणभर जड शरीराला सोडून माझा उत्कंठित सूक्ष्मदेह तर हें पाहण्यास गेला नसेल ना? काय असेल तें असो, त्या तीन स्वप्नमूर्ति सद्‌गुण, शील आणि सत्त्व हीं ओतप्रोत भरलीं आहेत अशीं पुण्यशील माणसें वाटलीं. त्यांचें तें आल्हाददायी दर्शन झाल्यावर माझा आत्मा एक प्रकारें तृप्त झाल्या-सारखा मला वाटला. त्याच मूर्तींचें प्रत्यक्ष दर्शन झालेलें पाहून हा स्वप्नप्रसंग माझ्या इतका ध्यानांत राहिला आहे.

योग्य वेळीं आम्ही भरतपुरास पोचलों. परवाना जवळ होताच. मोटारी टेकडीच्या अगदी माथ्यावर जातात असें कळल्याने पांडव-टेकडीवर जाण्याकरितां मोटारीच केल्या होत्या. वर्षाऋतूने आताच कोठें

वनांत पदार्पण केलें होतें. तरीही डोंगर टेकडी वनश्रीने कशी मनोहारी दिसत होती. या टेकडीवरची सुंदर वनश्री पाहून पांडव वनवासांत असतांना बरेच दिवस येथे राहिले होते, असें मोटारवाला टेकडीची दंतकथा सांगत असतां म्हणाला.

वर जातांच परवाना पहारेवाल्यांना दाखविला. डॉक्टर अश्विनी-कुमार हे पागलखान्याचे प्रमुख होते. त्यांच्याकडे शिपाई परवाना घेऊन गेला. डॉक्टर येईपर्यंत आम्ही आसपासची शोभा पाहत होतों. टेकडीवर विस्तीर्ण पठार असून मध्यभागीं हा जुना राजवाडा एखाद्या देवमन्दिराप्रमाणे शोभत होता. या पवित्र ठिकाणीं बसून पूर्वी शिव-शर्मा राजा आपल्या प्रजेला येथे न्यायदान करीत असे व म्हणूनच हा 'न्यायमन्दिर राजवाडा' या नांवाने ओळखला जातो अशी याची ऐतिहासिक कथा होती. इंग्रजशाहीमध्ये बंगालच्या स्थानबद्ध राजबंदीं-च्याकरितां हा राजवाडा तुरुंग बनला होता. आता स्वराज्यांत पागल-खाना झाला. वनवासांत पांडवांच्या उपयोगी पडला! मनुष्याप्रमाणे स्थानेंही निरनिराळी स्थिति अनुभवतात म्हणावयाचें!

आमचे असे विचार चालले असतांनाच डॉक्टर आले व आमचें स्वागत करून, मुखमार्जन, चहा वगैरेचीही विचारपूस करून तें सारें उरकलें आहे असें कळतांच आंत घेऊन गेले.

दरवाज्यावर सशस्त्र पहारा होता. त्यामुळे पागलखान्यापेक्षा तुरुंगाचीच छाया त्याच्यावर जास्त पडली होती. राजवाड्याला बाहेरून उंच तट असून मध्ये राजवाडा होता. आंतही सुंदर झाडें व कृत्रिम बाग होती. ती ओलांडून गेल्यावर मध्ये एक मोठा चौक असून त्याच्या चारी बाजूला मोठाले सोपे होते. चारी कोपऱ्याला चार मोठ्याल्या संगमरवरी दगडाच्या सवत्सगाई उभ्या होत्या व त्या चौकांत आकाश निरभ्र असल्यामुळे सूर्याचीं कोवळीं किरणें पडलीं होतीं. तेथे मध्यावर बरेचसे तरुण हसत खिदळत थट्टामस्करी करीत बसले होते. दरवाज्याच्या

समोरच्या सोप्यांत मध्यभागीं एक मोठी कमान असून त्या कमानींत सिंहासनावर श्रीगोपालकृष्णाची उघडी मूर्ति गाईच्या पाठीवर हात टाकून उभी होती व त्या मूर्तीची एक तरुणी पूजा करीत बसली होती. आम्ही आंत गेलों त्याच वेळीं ती तरुणी आरतीचें ताट हातांत घेऊन आरती करीत उभी होती.

आरती सुरू होतांच कांही मध्यम वयाचे पुरुष आणि सारे तरुण तेथे येऊन खूप मोठ्याने कृष्णाची न म्हणतां दुर्गादेवीचीच आरती म्हणूं लागले. त्यांतील कांही ओळी माझ्या अजूनही लक्षांत राहिल्या आहेत. उदाहरणार्थ—

दुर्गे दुर्घटवारी आता अवतार !
अनाथ नाथे अंबे करुणा विस्तार !
त्रिभुवन भुवनीं भरली बघ असुरीमाया
देवांच्या रूपाने वावरती जगीं या
अक्कलेचे कांदेहि पडलों संमोही
त्या तूं दुष्टालागी झोडी लवलाही
वेडें बनवुनि आम्हा भिरवती ते शहाणे
पागलखानीं पडलों जग नच हें जाणे !

प्रसाद! प्रसाद! प्रसाद! तरुणांनी एकच आवाज केला. ती तरुणी हसत हसत त्यांना खिसमिसाची खिरापत वाटूं लागली.

कांही तरूणांनी मार्चिंग सुरू केलें. कुणी भारत व रामायण वाचण्यांत गढून गेले. चार पांच माणसांनी हातांत झाडू व केर भरण्याच्या बादल्या घेतल्या व केर काढून भरूं लागले.

डॉक्टर अश्विनीकुमार म्हणाले, “ अष्टप्रधानमंडळांतील लोक व सर्वाधिकारी वरच्या भागांत आहेत, तेथे आपण प्रथम जाऊं. कारण भारतनंदन मग ध्यानधारणेला बसतील. तुमची त्यांच्याशीं कांही बोलण्याची इच्छा असल्यास मग जुळणार नाही. ते स्नान करून आता वर येतील.”

आम्ही सर्व वर जाऊन गच्चीवरून पाहिलें तों, मला स्वप्नांत दिसलेला, तोच देखावा होता. ती अर्घ्य देत असलेली तेजस्वी शांत पुरुषाची मूर्ति आणि दुसरा पोहणारा तरुण! मी माझ्या मनांत आश्चर्यानें थक्कच झालों.

त्या गच्चीजवळच्याच एका दिवाणखान्याकडे बोट दाखवून डॉक्टर म्हणाले, "येथें सवितादेवींना ठेवलें आहे व त्यांच्या सोबतीला तुम्ही खाली पाहिलेली तरुणी सुमित्रादेवी याही येथेंच राहतात. शिवाय आश्रमाच्या परिचारिका असतातच."

आम्ही आंत डोकावून पाहिलें तों काय चमत्कार! गाडींत स्वप्नांत पाहिलेली ध्यानस्थ तापसी ती हीच हें मी तात्रडतोब ओळखलें. आम्ही गेलों तेव्हा जप आटपून त्या उठत होत्या. माळ वगैरे ठेऊन त्या टेबलावर पडलेलीं ताजीं वर्तमानपत्रें फोडूं लागल्या. त्या वेळीं डॉक्टरांनी आंत जाऊन त्यांना सांगितलें, "सवितादेवी, हे प्रो. चित्रगुप्त आणि इतर कांही मंडळी आली आहेत."

आम्ही सर्वांनी त्यांना सादर व सविनय नमस्कार केला. त्यांनी तसाच स्मितपूर्वक परत नमस्कार केला.

"आपणा सर्वांशीं ओळख करून घेण्याची त्यांची इच्छा आहे." येथेंच, भारतनंदनांना आणि सत्यशीलांना बोलावून घेतों म्हणून डॉक्टर गेले. या, बसा, म्हणून सवितादेवींनी आम्हाला बसावयास विनंती केली.

इतक्यांत डॉक्टर, भारतनंदन व सत्यशील आत आले. अगदी स्वाभाविकपणें, आम्ही सर्वांनी उठून त्यांना उत्थापन दिलें व नमस्कार केला. सर्व बसल्यावर डॉक्टरांनी माझी हे प्रोफेसर चित्रगुप्त, भरतपूरच्या टिळकविद्यापीटांत मानसशास्त्राचे प्रोफेसर अशी ओळख करून दिली.

सत्यशील, सवितादेवी आणि भारतनंदन या तिघांनीही माझ्याकडे एक अर्थपूर्ण नेत्रकटाक्ष फेकला व भारतनंदन हसून म्हणाले, "मग वेड्यांच्या मनांचें संशोधन करणार काय!" सर्वच थोडें हसलों.

"बरें आहे! नमस्कार" म्हणून भारतनंदन व सत्यशील उठून ध्यानधारणेला गेले.

"वरच्या मजल्यावरील सर्वच मंडळी योगशास्त्राची अभ्यासी आहेत." डॉक्टर म्हणाले व सवितादेवींचा निरोप घेऊन आम्ही खाली आलों.

या वेळीं तरुण लोकांचें मार्चिंग संपून त्यांची हातांत झेंडे घेऊन प्रभातफेरी सुरू झाली होती. 'आवो प्यारे भाइओ' हें कूचगीत सुरू होतें. सर्वांच्या पुढे हातांत झेंडा असलेल्या तरुणाकडे बोट दाखवून डॉक्टर म्हणाले, "हे आमचे सुभाषचंद्र बरें कां!"

सर्वांनी जरा चमकूनच त्या तरुणाकडे पाहिलें! झेंडाधारी युवक तोंडावळ्यांत, गुबगुबितपणांत आणि रंगांतही कांहीसा सुभाषचंद्रासारखा होता, हें खरें. परंतु सुभाषबाबूंच्याहून हा युवक बराच लहान होता. त्याच्या नसानसांत चैतन्य भरलें होतें. आणि डोळ्यांत एक विशेष प्रकारची आनंदाची चमक होती. मी कांही बोलणार इतक्यांत आमच्या बरोबरचे रावबहाद्दर चित्रे म्हणाले, "काय म्हणतां सुभाषचंद्रांचेंही डोकें फिरलें अं? फार वाईट गोष्ट झाली म्हणावयाची! म्हणूनच आम्हां प्रागतिकांचें म्हणणें असें की, राजकीय प्रगति आस्तेकदम चालू द्या पण टिळकांना हें आमचें म्हणणें मुळीच पटलें नाही. अविचाराने त्यांनी अनेक तरुणांना भडकविलें आणि माथेफिरू बनविलें!"

रावबहादुरांचें हें भाषण ऐकतांच एक युवक ओरडून म्हणाला, "पागल भाईनों! हें शहाण्या लोकांचें भाष्य ऐका! अरे भाई आझाद लो. टिळकांनंतर आपली पिढी सातवी की, आठवी रे?"

सर्व तरुण पोट धरून धरून हसूं लागले. भाई भीमसेन ओरडून म्हणाला, "अहो डॉक्टर! डॉक्टर! या शहाण्या लोकांना बाहेर जाऊं देऊं नका. पागलखान्यांत आमच्या वार्डातच ठेवा! सर्वांचीं डोकीं पाठीकडे फिरलीं आहेत. बहकलीं आहेत. पहा! पहा!"

पुन्हा प्रचंड हास्य! "भाई नारद, बहकलेले मेंदू हिमालयावरच्या बर्फांत सहा महिने पुरले म्हणजे सुधारतात असें आपलें वैद्यक म्हणतें. नाहीरे ?" एक भाई म्हणाला. हास्यांत आणखी भर पडली.

"डॉक्टर! जरा हळू बोला बरें. हे सर्व भाईलोक एखाद्याची टर उडवून त्याला त्राहीभगवान करून सोडतात. खरा सुभाष कोठला आला आहे ? या भाईलोकांनी नानाप्रकारचीं नांवें आपल्याला ठेवून घेतलीं आहेत. मन मानेल तसें ते वागतात. त्यांतल्यात्यांत हा भाई तर कांही विचारूं नका! सर्व भाईंचा तो नेता आहे. रात्रीं-दिवसा वाटेल त्या वेळीं यांची प्रभातफेरी चालते. दमतात तेव्हा निजतात."

भाई वेडयांच्याकडे वळून डॉक्टर म्हणाले, "अहो, म्हटलें कांही वेळ काळ पहात जा! थोडया वेळाने बारा वाजतील! बंद करा आता प्रभातफेरी!"

"डॉक्टर, आपल्या अकलेचे बारा वाजलेले दिसताहेत मला! दिसत नाही का हा प्रभातींचा चंद्र आणि ती शुक्राची चांदणी?" प्रेक्षकांपैकी शालीनदत्ताकडे आणि शैलजा वहिनीकडे बोट दाखवून वेडा सुभाष म्हणाला.

त्याच्या बोलण्याने सर्व हसलीं. पण बिचाऱ्या शैलजा वहिनी अगदी ओशाळया झाल्या.

भाई अवधूत म्हणाला, "अहो डॉक्टर, पहाटेचे चार वाजले आहेत आता. किती कोंबडे आरवताहेत. तुम्हाला ऐकूं नाही का येत?" असें म्हणून तो स्वतःच अगदी कलापूर्ण असा कोंबडयासारखा आरवूं लागला.

आम्हा सर्वांना तें पाहून हसूं आलें. इतक्यांत सोप्यांत महाभारताची पोथी वाचीत असलेल्या एका व्यक्तीने, "भाई काहूर, इकडे या बरें जरा सर्वजण!" म्हणून हाक मारली. त्याबरोबर सर्व भाई तिकडे जाऊन मुकाटयाने बसले.

भाई काद्रूरावर प्रभाव पाडणारी ही व्यक्ति कोण म्हणून मी जरा निरखून पाहिलें. परंतु कांही ओळख पटली नाही. ते मध्यम वयाचे गृहस्थ होते. रंग, निमगोरा, डोळे थोडे निळे व खोल, प्रकृति निकोप, पोषाख स्वच्छ आणि त्यांच्या हातांत महाभारताची पोथी होती. डोळयावरील चष्मा जरा एकीकडे करून शांतपणें त्यांनी आमचे-कडे पाहिलें.

आणखीही कांही कमीअधिक वयाचे लोक त्या आवारांत वावरत होते. डॉक्टर प्रत्येकाबद्दल कांही नवलविशेष सांगत होते. "महाभारताचे वाचक म्हणजे सनातनी दादा! ते एक माजी मंत्री होते."

दुसरे एक गृहस्थ निमगोरे, रेखीव, सुंदर व बांधेसूद शरीरयष्टी असलेले आरामखुर्चीवर हातांत एक सिगारेट धरून जणुं काय झोपलेच आहेत, असे पडले होते. परंतु मधूनच ते म्हणाले, "अरे भाईनो, आपण आता शिक्का मारलेले वेडे आहोंत, आपणाला वेडेपणाचें प्रदर्शन करण्याची कांही आवश्यकता नाही. बसा ना दादाजवळ जरा सूत काढीत. पागलांना शिष्टाचार पाळण्याची कांही गरज नाही. पाहिजे असेल तर पडा स्वस्थ माझ्यासारखे, म्हणजे दादा तुम्हांला बोलणार नाहीत."

"हे एक आजीव मंत्री होते. म्हणजे कोणची का पार्टी असेना ते मंत्रीपदावरच असायचे! पण हल्ली मात्र पागलखान्याचे मंत्री यांना भाई म्हणतात." त्यांच्याबद्दल डॉक्टरांनी सांगितलें.

"दुसरे एक उंच व एक टेंगणे हे औटघटकेचे मंत्री, असें भाई लोकांनी त्यांना नांव दिलें आहे." डॉक्टर म्हणाले.

आणखी एक संयुक्तप्रांतांतील मंत्री डॉक्टरांनी दाखविले. ते लग्नाडयांनी संपूर्ण नाहीत, म्हणून त्यांना अपूर्णानंद मंत्री म्हणतात, अशी त्यांनी माहिती पुरविली.

"खराटे घेऊन झाडीत आहेत ते सेनापति! मोऱ्या साफ करताहेत हे राष्ट्रसभाभंगी! या राजकीय थोर लोकांना अशीं कामें करावीं लागा-बींत ना? कर्मगति विचित्र खरी!" चित्रे म्हणाले.

"पण हीं कामें करण्यास पागलखान्यांत नोकर नाहीत का?" शैलजा वहिनींनी विचारलें.

डॉक्टर म्हणाले, "अहो, आहेत तर काय! पण हे राजकीय वेडे अगदी चमत्कारिक असतात. 'सर्व पागलखाना आमचा आम्ही साफ ठेवणार' हाच यांचा हट्ट! आणि 'हरिजनांनीच कां झाडावें?' या विषयावर व्याख्यानें देतात. आम्ही ऑफीसर लोकांनी काय म्हणावें यांना, सांगा?"

"ते एक मुंबई प्रांताचे फार मोठे पारशी पुढारी होते. 'माझी इकालपट्टी' म्हणून यांनी एक उत्तम ग्रंथ लिहिला आहे. आपण तो अवश्य वाचा. या थोर गृहस्थांनी मोठमोठया सरकारी योजना पैसे खाण्याकरितांच कशा करण्यांत येतात, याचाही एक इतिहास लिहिला आहे. कांही राष्ट्रीय लोकांनाही अप्रामाणिक ठरविलें आहे. हें सर्व वेडाच्या तारेंत त्यांनी केलें असा राष्ट्रसभेकडून निर्णय आला म्हणून त्यांना येथे धाडलें आहे."

"बोलतां बोलतां पागलखाना बंद करण्याची वेळ झाली" असें डॉक्टर म्हणाले. "आता बरोबर चार वाजतां पागलखाना उघडेल तेव्हा या."

आम्हीही भुकेले झालों असल्याने पांडव टेकडीवरच असलेल्या भीमसेन मुदपाकखान्यांत जाऊन सर्व व्यवस्था करून घेतली.

# ३. महिषासुरमर्दिनी

ठरल्याप्रमाणे आम्ही बरोबर चाराला पागलखान्याच्या दरवाजासमोर गेलों. डॉक्टरही हजरच होते. त्यांनी आम्हाला विचारलें, "सर्व पागलखाना पाहणें हें एका दिवसाचें काम नाही. कारण पागलखान्याचे सामाजिक, धार्मिक, राजकीय असे आम्ही विभाग केले आहेत. त्यांतही आपण रोग्यांची माहिती इच्छितां, त्यामुळे वेळ लागेल. नुसती धावती फेरी तुम्हाला करितां येईल. जाण्याची फारच घाई आहे काय?"

राजकीय वेड्यांची माहिती मिळवण्याविषयीं आम्ही सर्व सारखेच उत्सुक होतों. म्हणून, सविस्तर माहिती देऊनच आम्हाला पागलखाना दाखवा. सध्या रजा फार नसली तरी आम्ही पुन्हा येऊं, असें सर्व म्हणाले.

सकाळच्याच वार्डात आम्ही पुन्हा आलों. "आता प्रथम भाई लोकांच्यापासूनच सुरवात करितों." डॉक्टर म्हणाले. "हे भाई काहूर. पण यांनी आपलें नांव सुभाष ठेवलें आहे. यांच्यापैकी कोणी राम, कोणी जवाहीर, कोणी जीतेंद्र आणि कोणी भगतसिंह असे मधून मधून बनतात. व त्याप्रमाणे त्या त्या दिवशीं कृतीही सुरू करतात.

"जवाहीर झाले की त्या दिवशीं सारा दिवस स्टेटमेंट पत्रकें काढून त्यांची प्रसिद्धीकरितां ऑफिसमध्ये रवानगी होते. भगत बनेल तो बांब आणि कट यांवाचून बात बोलत नाही. जितेंद्रनाथ दास सारा दिवस उपाशीच पडून राहतात; तोंडांत पाणीही घालीत नाहीत. पोहणें व

आखाडे हें रोजचेंच आहे. त्याशिवाय 'पागलखाना गॅझेट' म्हणून एक पत्रक शिळाप्रेसवर ते प्रसिद्ध करितात. त्यांत आम्ही डॉक्टर लोक विशेषतः तुमच्यासारखे प्रेक्षक, यांच्याबद्दल खूपच विनोदी आणि मार्मिक लिहिलेलें असतें."

"खरें की काय?" आमच्यापैकी सर्वच उद्गारले. आमची आता खास कांही ना कांही तरी. टवाळी होणार असें सर्वांना वाटलें. एक काळेसे व अंगावर उपरणें घेतलेलें गृहस्थ कांही वन्य जातींना शिकवीत बसले होते. त्यांच्याकडे पाहून डॉक्टर म्हणाले, "ती एक वल्ली पहा! हे एका राष्ट्रीय शाळेचे आचार्य आहेत. या पागलखान्याला जवळ जवळ त्यांनी शाळागृहच बनविलें आहे. सारा दिवस त्यांचे निरनिराळे वर्ग चालतात. हा राजवाडा चांगला मोठा आहे म्हणून बरें.

"येथील नौकर व वन्यजाती यांचे हे वर्ग असतात. या वनांत राहणारे पुष्कळ वन्य शहाणे या वेडयाजवळ शिकण्यास येतात."

"वेडे झाले तरी पूर्वीचे ते थोर लोक आहेत ना! त्यांचें वेड-सुद्धा दुसऱ्यांना उपकारीच व्हावयाचें." आमच्या सौभाग्यवती म्हणाल्या.

डॉक्टर म्हणाले, "अहो तें खरें. परंतु हें शिक्षण देण्याशिवाय आणखी एक त्यांचा उद्योग असतो. तो म्हणजे या पहाडी लोकांचीं मूळचीं नांवें बदलून नवीं सुधारलेलीं नांवें ते सर्वांना देतात. तीं त्यांना स्वतःला पाठ करावयाला लावतात आणि कचेरींतील सर्व अधिकाऱ्यांनी त्या लोकांना या नव्या नांवाने हाक मारावें म्हणून आम्हाला एक विनंतीपत्रक असतें. उदाहरणार्थ, दगडीला दमयंती, केरूचें केशवचंद्र, भिक्याचें भद्रसेन, गुंडयाचें गोविंदा आणि रावण्याला रघुवीर अशीं नांवें त्यांनी दिलीं आहेत."

"एकंदरींत या वेडयांत नांवांचें बरेंच वेड दिसून येतें असें मला वाटतें." मी म्हणालों.

डॉक्टर म्हणाले, "ते सिगारेट पीत व आकाशाकडे पाहत उभे आहेत ते एक महाराष्ट्रांतील तरुण आय्. सी. एस्. आहेत. त्यांनी कामावर असतांना एक दिवस सट्टेबाजी करणाऱ्या लोकांच्या लबाडयाच वेडाच्या भरांत उघडकीस आणल्या होत्या, तेव्हापासून ते वेडे झाले म्हणतात."

ते आय्. सी. एस्. कोणाशीही बोलत नव्हते. परंतु त्यांचें सौंदर्य, गांभीर्य, व नेत्रांतील गूढता कांही विशेष आकर्षक होती. कोणाच्याही अस्तित्वाची थोडीही दखल न घेतां, ते कांही तरी गूढ विचारांत गढलेले दिसले.

भाई काहूराची नाडी पाहत असलेल्या एका पुरुषाकडे बोट दाखवून ते एक नामांकित डॉक्टर असल्याचें डॉक्टरांनी सांगितलें. अजूनही ते केवळ चेहरा पाहून सहजासहजीं एखाद्याचें अचूक निदान करितात.

आय्. सी. एस्च्या मुखावर जितकें गांभीर्य तितकेंच डॉक्टर-महाशयांच्या मुखावर चांचल्य मला दिसून आलें. त्यांना सबुरी कशी ती माहितीच नव्हती. आम्हा प्रेक्षकांनाच त्यांनी आपले रोगी समजून फाडफाड आमचे रोग सांगण्यास त्यांनी सुरवात केली.

कोणाला अपचन, कोणाला पंडुरोग, असें ते सांगत सुटले. शैलजा वहिनी आणि शालीनदत्ताला ते म्हणाले, "तुम्हा दोघांना फॅशनचा एकच रोग झालेला दिसतो आहे." सौभाग्यवतीली म्हणाले, "मुलांच्या चिंतेने तुम्ही फारच ग्रासलां आहांत बुवा! होईल की लौकरच एखादा मुलगा किंवा मुलगी कांही तरी! सोडून द्या चिंता सारी!"

शेवटी त्यांची धाड माझ्यावर आली. "काय हो! आमच्या वेडाचें गूढसंशोधन करण्याच्या रोगाने तुम्ही पछाडलेले दिसतां आहां! ज्ञानतंतु तीक्ष्ण आहेत! तुम्हांला कांही ही गोष्ट कठीण दिसत नाही. पण बुवाबाजी आणि नेतेगिरी यापासून दूर राहिलांत तर?"

मध्येच सीगारेट तोंडांत धरून ते कांही वेळ सचिंत उभे होते. मधूनमधून एकदोन वेळां आम्हांपैकी प्रत्येकाकडे आपली भेदक आणि शोधक दृष्टि फेकून त्यांनी पाहिलें. आणि नंतर भाई काहुराला हाक मारून, त्याला त्यांनी हळूच कांही तरी सांगितलें. भाईच्या हातावर टाळी दिली आणि माझ्याकडे पाहून दोघे खो: खो: हसत सुटले. छे: छे:, त्यांच्या त्या टर उडवणाऱ्या हास्याने मी तर अगदी अर्धमेला झालों.

इतक्यांत मळवट भरलेली ती कालची सुमित्राबाई आली, व भाई काहुराने तिला हळूच कांही तरी सांगितलें. तें ऐकल्यावर तिने माझ्याकडे एकवार डोळे फाडून पाहिलें व त्या दोघांच्या हास्यांत आपलेंही हास्य मिसळविलें.

डॉक्टर म्हणाले, "या बाईचें नांव सुमित्रा. पण ती आमच्या येथील महिषासुरमर्दिनी आहे. या बाईच्या मळवटापायीं रोज पागलखान्याला पावभर कुंकुवाचा खर्च करावा लागतो. एकेकाच्या वेडांचे प्रकारच कांही और आहेत. नित्य पहाटे चार वाजल्यापासून या बाईचा कार्यक्रम सुरू होतो. भूपाळ्या, प्रभातफेरी, स्नान व पूजा हे सर्व झाल्याबाचून ती कोणाशीं भाषण करणार नाही. तिला पूजेला विष्णुमूर्ति मिळेपर्यंत तिने अन्नसत्याग्रह केला होता.

"त्या विष्णुपूजेकरितां व त्याला लाखोल्या वाहण्याकरितां पागल खान्याच्या बागेचें ती एखादे दिवशीं वाटोळें करिते. त्यानंतर नित्यनियमाने सर्व वार्डांतून पाहणी करिते. कोठे व्यवस्थेंत कांही कमीपणा आढळल्यास माझ्यापासून सर्वांची खरडपट्टी काढते.

"एके दिवशीं या चंडिकेने, असा भयंकर त्रास दिला म्हणतां कांही विचारूं नका. आमच्या सर्व पागलखान्यावर तिची विलक्षण जरब आहे. तिच्यापुढे, या भाई लोकांच्यापुढे कसलेले नियम चालत नाहीत! या लोकांना पागलखान्यांत दाही दिशा मोकळ्या आहेत.

कोणीही पहारेकरी या लोकांना प्रतिबंध करूं शकत नाहीत. प्रतिबंध असे तेव्हा नित्य तंटे होत असत. म्हणून या कटकटी टाळण्याकरितां मी यांना सर्वत्र मुक्तद्वार ठेविलें आहे."

"अशा माणसांना तुम्ही बंदच कां नाही ठेवीत ?" शालीनदत्त मध्येच म्हणाला.

"अरे बापरे!" डॉक्टर एकदम उद्गारले, "अहो प्रोफेसरसाहेब, तुम्ही समजतां तरी काय! हा पागलखाना चालविणें म्हणजे काय तुमच्या कॉलेजचा एखादा वर्ग घेणें आहे की काय! व्याख्यान झोडलें की झालें! मागल्याच आठवड्यांतील गोष्ट आहे. पहाटेच उठून ही महांकाळी प्रभातफेरीला निघाली. म्हणे तिला स्त्रीवार्डांत जावयाचें होतें. साहाजिकच पहारेवाल्याने तिला प्रतिबंध केलान्. पागलखान्याचा गौळी त्याच वेळीं दुधादह्याच्या चर्व्या भरून येत होता. त्याला आंत घेतांच त्याच्या डोक्यावरील दह्यादुधाच्या चर्व्या हिने पहारेवाल्याच्या डोक्यावर ओतून, त्याला पंढरीचा विठोबा केलेन्. एक दिवस अशाच एका पहारेवाल्याच्या डोळयांत तिखट फेकून, त्याच्या किल्या घेऊन दार उघडून खुशाल चालती झाली. काय करणार सांगा!

"या राजकीय विभागामध्ये जरा कोणाच्या मताविरूद्ध गेलें की, हे भाई लोक संप, उपवास, सत्याग्रह पुकारून मोकळे होतात. कशा कोणाला ठाऊक पण या बातम्या ताबडतोब बाहेर फुटतात व अनेक वेड्यांचे नातेवाईक चौकशीला लोटतात. लोकमत बिघडतें. आंत व बाहेर हा असा त्रास आहे. आणखी दोन माणसें मी मदतीला मागितलीं आहेत, मिळतील तेव्हा खरीं.

"चार दिवसापूर्वी तर कहरच झाला. ही महांकाळी धार्मिक वार्डांत धसून तेथील लोकांना महार, भंगी, चांभार समजून, त्यांच्या उन्नतीचे मार्ग त्यांना सांगूं लागली. तुम्ही भंगी फार पवित्र आहांत, सर्व

गावाच्या सफाईकरितां आईसुद्धा इतके उपकार करीत नाही, वगैरे हिचें व्याख्यान सुरू असतां, वारंवार त्या धार्मिक लोकांना महार, भंगी, चांभार असें संबोधल्याने ते चिडले व भंगी उपमेने आपल्याला विटाळ झाला म्हणून स्नानें करण्याचा त्यांनी सपाटा सुरू केला आणि थोड्याच वेळांत पाण्याच्या सर्व टाक्या रिकाम्या करून टाकल्या.

"त्यांतच भाई लोक तेथे जाऊन पोचले. मग काय विचारतां, 'दे दान छुटे गिराण, स्नानानंतर दान' अशा आरोळ्या मारत साऱ्या पागलखान्याला ग्रहणाचा दिवस भासविला. थोड्याच वेळांत ग्रहणाची स्नानें सर्वत्र सुरू होऊन, सगळीकडच्या टाक्या कोरड्या! असा हा प्रकार आहे."

बोलतां बोलतां पागलखाना बंद झाला व आम्हाला पागलखाना पाहून जास्त रजा नसल्याने त्या दिवशीं परत जावें लागलें.

# ४. सुवासिनीचा मृत्यु

माझी कॉलेजमध्ये जाण्याची वेळ झाली होती. जेवण वगैरे आटोपून वर्गांत शिकविण्याचीं टिपणें मी पाहत बसलों होतों. इतक्यांत सौभाग्यवती हातांत 'नारद' वर्तमानपत्र घेऊन आली व "अहो, ही पाहिलीत का बातमी? नवभारत पागलखान्यामध्ये म्हणे सुवासिनीचा मृत्यू झाला!"

नारद पत्रांत नेहमी स्वराज्याच्या कारभारावर सडेतोड टीका येत असे. सौभाग्यवतीचें तें जरा आवडतें पत्र असे. रिकामपणामुळे ती हे सारे पेपर वाचीतही असे. पण ठळठळीत अक्षरांतील ती बातमी वाचून मला कसेंसेंच झालें! एकप्रकारें दुःखानेच ती बातमी मी लक्षपूर्वक वाचूं लागलों. पत्रांत पुढील मजकुराचा अग्रलेखच होता मुळी.

"विष्णुपूरचे सुप्रसिद्ध जाहागीरदार कै. वीर कृपाशंकर यांच्या एकुलत्या एक कन्या आणि वारस सुवासिनी यांनी वेडाचे भरांत भिंतीवर डोकें आपटून घेतल्यामुळे मृत्यु झाला. आवाज ऐकतांच नर्स धावून गेली. परंतु मेंदूला धक्का लागून तात्काळ प्राण गेला.

"केवळ दोनच वर्षे झालीं विष्णुपूरचेच इंग्लंडाहून पदवी घेऊन आलेले डॉक्टर काळेश्वर मिश्रा यांच्याशीं मृत सुवासिनीचा विवाह झाला होता. विवाहानंतर वीर कृपाशंकर यांना पुत्र नसल्याने, कन्याच वारस होऊन जवळ राहावी म्हणून काळेश्वर मिश्रांना त्यांनी दत्तक घेतलें होतें.

"परंतु ईश्वरी संकेत कांही निराळाच होता. दत्तविधानानंतर वीर कृपाशंकर यांचें एकएकीं डोकें फिरलें. लोकांत यासंबंधीं निरनिराळ्या चमत्कारिक बातम्या उठल्या आहेत. त्यांचे जावई श्रीमंत काळेश्वर यांनी त्यांना नवभारत पागलखान्यांत जाहागीरदार विभागांत ठेवलें होतें. परंतु वीर कृपाशंकर यांनी पागलखान्यांत गेल्यापासून अन्नपाणी अजीबात वर्ज्य केलें होतें. तरीही त्यांना कृत्रिमतेने अन्न घालण्यांत येत असे. परंतु या उपवासाच्या विसाव्या दिवशीं त्यांचा अंत झाला.

"त्या प्रसंगाला बरोबर आज वर्ष झालें. बरोबर त्याच दिवशीं नेमकी त्यांची प्रियकर कन्या त्यांच्याकडे गेली, हा एक विलक्षणच योगायोग होय. आपला प्रिय पिता गेल्यापासूनच सुवासिनीने हाय खाल्ली होती. थोडयाच दिवसांत मेंदूच्या त्याच दुष्ट रोगाने सुवासिनीलाही पछाडलें व पुन्हा त्यांनाही डॉ. काळेश्वरांनी प्रकृति सुधारण्याकरितां नवभारत पागलखान्यामध्येच नेऊन ठेविलें होतें. हा रोग आनुवंशिक असल्याचें नामांकित डॉक्टर नर्मदापुत्र यांचें म्हणणें आहे. शेवटीं या दुर्धर रोगाने तरुण सुवासिनीचा बळी घेतलेला पाहून कोणालाही हळहळच वाटेल.

"श्रीमंत काळेश्वरराव हेच आता जाहागिरीचे वारस होत. परंतु त्यांच्यावर हा दुःखाचा डोंगरच कोसळला आहे! आम्ही त्यांच्या दुःखांत समभागी आहोंत! ईश्वर मृताला उत्तम गति देवो!"

काय असेल तें असो, नारद पत्रांतील हा मजकूर वाचीत असतां, माझ्या नेत्रांतून खळखळ अश्रु वाहिले. वास्तविक सुवासिनीचा व माझा तसा दूरचासुद्धा कांही संबंध नव्हता. किंबहुना मी तिला पाहिली सुद्धा नव्हती. नाहीं म्हणावयाला एकदा भरतपूरला आलेल्या मुलींच्या टीममध्ये महाराणी लक्ष्मीबाई शील्ड मिळविणारी व पोहण्यांत

पहिली आलेली मुलगी म्हणून बक्षीस घेत असतांना मी ओझरती पाहिली होती. विष्णुपूरचे जाहागिरदार कृपाशंकर यांची मुलगी म्हणून गौरवपूर्वक तिचा उल्लेखही झाला होता.

कोमल, सुंदर आणि टवटवीत अशी ती गोड मुलगी स्मित करीत, अध्यक्षांना अभिवादन करून बक्षीस घेऊन परत जात असतां मी पाहिली होती.

मागल्यावेळीं जर पागलखाना पुरा पाहिला असता तर ती आम्हाला दिसली तरी असती अशी मला व सौभाग्यवतीलाही चुटपुट लागली.

सुवासिनी खरीच वेडी असेल काय असाही एक विचार माझ्या मनांत आला. नाही तरी पाहिलेल्या सर्वच वेडयांच्या संबंधीं मलाही शंका आली होती. कोणाच्याही डोळयांत मला वेडेपणाचें एकही चिन्ह दिसलें नव्हतें. पुन्हा एक वेळ आपण गेलेंच पाहिजे असें मी मनांत ठरविलें. व तासाची वेळ झाली म्हणून मी वर्गांत गेलों.

सुवासिनीच्या मृत्यूनंतर एक सव्वा महिन्याचीच गोष्ट असेल, स्वराज्य पत्राचा राणी नागिणी खास अंक माझ्या हातांत पडला. व मला आश्चर्याचा धक्काच बसला. कारण, नागिणी हें नांव कृपाशंकर जाहागिरीचे वारस श्रीमंत काळेश्वर, मृत वेडी सुवासिनीचे पति, यांच्या नूतन पत्नीचें होतें. लग्नाच्या विविध फोटोंनी हा अंक सजला होता.

त्याच पत्रांत काळेश्वरपंतांनी आपल्या मृत पत्नीच्या स्मरणार्थ एक दवाखाना सुरू केल्याचेंही वर्णन होतें. राष्ट्रीय सरकारने कृपाशंकर जाहागिरीच्या वारसांना राजा व राणी असा नवा किताब दिला होता, त्यासंबंधीं अभिनंदनही केलें होतें.

जाहागिरीच्या औरस वारसाच्या काळजीने सुवासिनीच्या मृत्यूनंतर हा विवाह करावा लागला, असें विवाहाचें समर्थनही त्यांत केलें होतें.

राणी नागिणी यांचें चरित्रही त्याच पत्रांत आलें होतें. त्यावरून कॉलेजपासून इंग्लंडपर्यंत राणी नागिणी या काळेश्वरपंतांच्या सहाध्यायिनी होत्या असें दिसलें. विष्णुपुरामध्येच राणी नागिणींचा दवाखानाही उघडला होता. त्याच दवाखान्याला देणगी देऊन सुवासिनी दवाखाना असें नांव दिलें होतें.

हें सारें वाचीत असतां पुन्हा माझ्या मनाला धक्का बसला. वास्तविक एक पत्नी मरतांच लागलीच दुसरें लग्न होणें या नित्याच्याच दिसणाऱ्या गोष्टी होत. मग त्याबद्दल इतकें आजच कां वाटावें ! तीच गोष्ट काय, पण पागलखान्यासंबंधीं कोठे कांहीही ऐकलें तरी मला कांही तरी अंत:संवेदना होतच. मग त्याचें काय कारण असेल तें असो. ते तेजस्वी भारतनंदन सर्वाधिकारी, तापसी सवितादेवी आणि ते वीर सत्यशील यांच्या बाबतींतील माझा स्वप्नसाक्षात्कार माझ्या हृदयावर जणूं कोरला होता.

त्याचप्रमाणे, दुसरे विलक्षण वेडे, रुबाबदार माजी मंत्री, सेनापति, ती मळवटधारी महांकाळी, भाई काहूरप्रमुख व भाईची ती टोळी आणि त्यांच्या तारुण्यसुलभ मजा, ते गूढ-गंभीर आय. सी. एस्., विशेषत: ते भेदक दृष्टीने माझ्याकडे रोखून पाहणारे डॉक्टर व त्यांचें हास्याच्या लाटा उसळविणारें हास्य हीं सारीं माझें मन आपल्या-कडे ओढून घेत होतीं. हे लोक खरेच वेडे आहेत कां ! हा प्रश्न पुन: पुन: मनांत उत्पन्न होत होता. सर्व पागलखाना पाहणें झालें नव्हतें. त्यांत आणखी कोण कशीं असतील वगैरे विचाराने माझ्या हृदयांत काहूर उठत असे.

किती दिवस मनाची ही रुखरुख मी सहन करणार ! शेवटीं मला एक युक्ति सुचली अथवा वस्तुस्थितीच तशी निर्माण झाली म्हटलें तरी चालेल.

मी प्रिन्सिपालना कळविलें कीं, माझें डोकें हल्ली तासन्तास भ्रमण करीत राहतें. मेंदूच्या रोगाचा मला थोडा संशय येत आहे. म्हणून तावडतोब अमरपुरास जाऊन मेंदूतज्ज्ञ डॉ. नर्मदापुत्र यांना तावडतोब प्रकृति दाखवून यावें अशी माझी इच्छा आहे. तरी आठ दिवसांची मला रजा मिळावी. उत्तराची वाट पाहत बसलों. सौभाग्यवतीलासुद्धा माझी काळजी वाटूं लागली होती. ती म्हणे, "ती वेडी तुम्हाला व मला दोघांनाही वेड लावणार असें दिसतें आहे. एक वेळ आपली प्रकृति तपासलीच पाहिजे. बाकी तुम्ही कांही म्हणा, या वेडयांच्या आणि पागलखाना प्रकरणांत कांही तरी गूढ असलें पाहिजे. नारद पत्रांत या बाबतींत नेहमी चमत्कारिक बातम्या येतात."

आमचें असें बोलणें चाललें आहे तोंच एकदाचें उत्तर आलें. पण प्रिन्सिपालनी मला प्रत्यक्षच बोलावलें. त्याप्रमाणे मी गेलों. माझ्या प्रकृतीची प्रथम त्यांनी विशेष विचारपूस केली. व अमरपूरला जाण्याला मला परवानगीही मिळाली. परंतु केवळ चारच दिवस मिळाली. प्रिन्सिपालनी मला त्याचें कारणही सांगितलें.

ते म्हणाले, "हें पहा प्रोफेसर चित्रगुप्त, मानसशास्त्राच्या प्रोफेसरने मनाचें कसें अगदी खंबीर असलें पाहिजे! तुमच्यासारख्या दणकट प्रोफेसरला काय झालें आहे मेंदूचे रोग व्हावयाला! तसा संशयसुद्धा मनांत आणूं नका. निष्कारण कांही तरी कल्पना मनांत आणून भिऊं नका. मी तुम्हाला स्पष्टच सांगतों की, माझ्यामतें त्या नवभारत पागखान्यामुळे अमरपूरचेंच नव्हे तर सर्वत्रच वातावरण बिघडलेलें मला दिसत आहे व म्हणूनच मी तुम्हाला दोन दिवसांपेक्षा जास्त रजा देऊं इच्छित नाही."

मिळाली तितकीच रजा पदरांत पाडून घेण्याचें मी ठरविलें. घासाघीस घालीत बसलों नाही व तावडतोब अमरपूरला जाण्याची

तयारी केली. या वेळीं माझ्याबरोबर इतर कोणी असावें अशी माझी इच्छा नव्हती म्हणून मी कोणालाही कळविलें नाही. परंतु सौभाग्यवती थोडीच आल्यावाचून राहणार होती! तरी पण मी तिलाही स्वच्छ सांगितलें की, "बाई ग, तूं एकटीच येण्याची मेहरबानी कर! नाही तर लीलाबाई, शीलाबाई, असें आपलें भगिनीमंडळच गोळा करीत बसशील तर मला चालणार नाही! आधीच बजावतों की तसें परवडत नसेल तर तूं आपली मैत्रिणींच्या बरोबरच जाण्याची सोय कर."

सौभाग्यवती माझ्या म्हणण्याला कबूल झाली व मागील वेळे-प्रमाणे रात्रीच्याच गाडीने जावयाचें आम्ही ठरविलें. सकाळीं योग्य वेळीं अमरपुरास जाऊन पोचलों.

या वेळीं मी असें ठरविलें की, इकडे तिकडे कुठे न उतरतां खुद्द डॉक्टरांच्या घरींच उतरावयाचें. तसें करण्यांत माझा कांही हेतु होता.

मी जाणत होतों की हें माझें असें करणें सभ्यपणाचें नसून, विनाकारण दुसऱ्याला त्रास देण्याचें होत आहे. तरी डॉक्टरांच्या चांगु-लपणाचा फाजील फायदा मी घेतलाच. जरा सलगी दाखवून त्यांच्याच घरीं मी उतरलों. पण आनंदाची गोष्ट ही की, डॉक्टर एक अत्यंत सज्जन आणि सरळ मनुष्य मला वाटले. मी त्यांच्या घरीं उतरण्यांत कांही विचित्र केलें, असें त्यांना भासलेंसुद्धा नसावें असें दिसलें. उलट पागलखान्याबद्दल व त्यांच्याबद्दल मी इतका आपलेपणा व प्रेम दाखविलें याचेंच त्यांनी कौतुक केलें. पुन्हा केंव्हाही आता दुसरीकडे उतरावयाचें नाही असें त्यांनी आणखी मला बजावलें. त्यांच्या पत्नी उषावतीही चांगल्याच दिसल्या. सौभाग्यवतीचें त्यांनी, माझें डॉक्टरांनी केलें तसेंच स्वागत केलें. पागलखाना दुपारीं पहावयाला जावयाचें असें ठरलें.

# ५. मी वेडी आहे काय ?

सुमारें साडेतीन वाजतां चहा वगैरे घेऊन आम्ही डॉक्टरांच्या बरोबर पागलखाना पाहण्यास निघालों. आज डॉक्टरांनी आम्हाला प्रथम स्त्रीविभागामध्ये नेलें. 'न्यायमन्दिर' राजवाड्याचा तो भाग 'राज्ञीमन्दिर' म्हणूनच प्रसिद्ध होता. ही जागा बरीच मोठी असून, स्त्रियांच्या सर्व तऱ्हेच्या सुखसोयी त्या जागेंत होत्या. स्नानगृह, शृंगारगृह, क्रोधगृह, शयनगृह वगैरे निरनिराळीं नांवेंही त्याला होतीं. त्याचप्रमाणे तुळशी-आंगण, क्रीडांगण, नृत्यांगण, अशीं निरनिराळीं अंगणें आणि पाकशाळा, भोजनशाळा, गायनशाळा, वगैरे निरनिराळ्या नांवांच्या जागा असून, बेताचें पाणी असलेलें एक जलक्रीडासरोवरही होतें.

मध्यभागीं थोडी बेटासारखी जागा असून, त्याच्या एका खडकावर एका बाईचा दगडी पुतळा उभा केला आहे, आणि तिच्या हातांतील दगडी घागरीमधून ती त्या सरोवरांत पाणी ओतीत आहे असा देखावा तेथे होता. सरोवरांत त्यांतूनच पाणी सोडलें जात असे. बहुधा जुन्या ठिकाणीं गायमुख असतें. पण येथे ही थोडी कल्पक रचना दिसली.

वरील भाग पाहणें झाल्यावर वेड्या स्त्रिया असलेल्या जागीं आम्ही गेलों. हेंही एक दुसरें तुळशीचें अंगणच असून मध्यभागीं एक मोठें वृंदावन असून, त्यावर बालकृष्ण, तरुण कृष्ण, शिष्टाई करणारा कृष्ण अशीं चित्रें

कोरलीं होतीं. एका ठिकाणीं लोखंडी खांबाला झोपाळाही टांगला होता. दोन सोप्यांत पाळणेही टांगले होते. मात्र ते आधुनिक होते. आंगणाच्या चारी बाजूंच्या सोप्यांत स्त्रियांना बसण्याकरितां कोठे बिछायती, तर कोठे टेबलें, खुर्च्या, कोचें अशी व्यवस्था होती. त्याचप्रमाणे पेटी, पियानो, सतार, फिड्ल आणि पुस्तकें अशीं करमणुकीचीं अनेक साधनेंही तेथे होतीं. परंतु तेथील स्त्रियांना यांपैकी कशाचाही उपयोग करण्याची इच्छा किंवा बुद्धि असावी असें दिसलें नाही.

आम्हाला तें सर्व दृश्य पुरुषांच्या विभागापेक्षा फार निराळें, भेसूर आणि अंगावर काटा आणणारें भासलें. बहुतेक स्त्रिया कृश, निस्तेज, चमत्कारिक डोळयांच्या व भानरहित दिसल्या. फार काय, आपल्या शरीरावरील वस्त्रही नीटनेटकें आहे की नाही याची जाणीव फारच थोडया स्त्रियांना दिसली. आम्ही तेथे गेलों असून उभे होतों याची दखल तर प्रथम त्यांच्यापैकी एकीलाही दिसली नाही. त्या प्रत्येकीचे कांही ना कांही तरी मानसिक व्यापार मात्र त्यांच्या निरनिराळ्या कृतींवरून व हावभावावरून दिसत होते.

एका सोप्यांत एक बाई एका कचकाडयाच्या बाळाला खरें मूल समजून, पाट ताटली मांडून, खरा भात घेऊन, भरवीत बसली होती. तोंडाने बडबड सुरू होती, "काऊ चीऊ या ग या! बाळाचा भात खा ग खा! फार भूक लागली माझ्या बाळाला! अरेरे, कसा मुटुमुटू भात जातो आहे पण!" असें म्हणून कुस्करून कुस्करून ती त्या बाळाला भात भरवीत होती. सारा भात खाली सांडतो आहे, हें तिच्या लक्षांतही येत नव्हतें. सर्व भात संपला तेव्हा तिचा तो कार्यक्रम संपला.

नंतर ती बाळाला पाणी पाजूं लागली. पाणीही जेव्हा खाली सांडलें तेव्हा ती म्हणाली, "नको माझ्या छकुल्याला पाणी! उठा तर मग! जाई, जा ग बाळाचें तोंड धुवून आण बरें!" जवळच उभ्या

असलेल्या परिचारिकेने बाळाला तोंड धुवून परत आणून दिलें. नंतर कपडे, काजळ, तीट वगैरे आणण्याविषयीं जाईला सांगितलें. जाईने तें सारें आणून दिलें. ते कपडे चढवून तीट व काजळही तिने त्याला घातलें आणि "कसा माझा राजा दिसतो! बघ ग जाई!" हें म्हणत असतां आनंद जणूं तिच्या चेहऱ्यावर नाचत होता. पण इतक्यांत तिने "माझा राजा तो" म्हणून त्याचा मुका घेतला. या प्रेमस्पर्शाच्या वेळीं मात्र तिला सजीवतेची अनुभूति आली नाही; व स्पर्शज्ञानाने तिला जाणीव दिली की, हें तिचें बाळ नसून कचकड्याचें बाळ आहे; त्याबरोबर तिने भयंकर किंकाळी फोडली! व "देवा, हें नाही माझें छकुलें! जाई, का ग मला फसवलेंस? जा, जा! आणून दे माझा अरुण! अग, मी वेडी नाही ग. तुला खरेंच सांगतें. बोल, कुठे आहे माझा राजा ?

"त्या प्रेमाबाईनी नेला का घरीं त्यांच्या ? मी साफ सांगतें, अं मला नाही हें सहन होणार! नाही, ती लाघवी पूतना ऐकावयाची नाही. जाऊं नको रे अरुणा! अरुण! अरुण!" ती सारखी आक्रोश करूं लागली. दुसऱ्याही कांही वेड्या तिच्याभोवतीं जमल्या व "कुठे गेला अरुण?" म्हणून विचारूं लागल्या. तिच्या डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा सुरू होत्या.

पुत्राकरितां भुकेलेला तो तिचा आर्तस्वर, आमच्यापैकी कोणालाही ऐकवेना! सौभाग्यवती तर अगदी ओक्साबोक्शीं रडत होती. डॉक्टरांनी डोळे पुसून जाईला सांगितलें, "जा बाई, वसुमतीबाईना बिछान्यावर नेऊन निजव."

"कुणाच्या कोण या बाई!" मी चौकशी केली.

"काय सांगूं तुम्हाला! हल्लीच्या मंत्रिमंडळांतील एका मंत्र्यांची ती धर्मपत्नी आहे. स्वराज्य कार्याच्या नांवाने नित्य घरांत येतां येतां, एका विदुषीबाईनी तिच्या नवऱ्याशींच लग्न लावल्याने, वसुमतीबाईना संतापाच्या भरांत वेड लागलें." डॉक्टर दुःखित अंतःकरणाने म्हणाले.

"तर मग 'नारद' पत्रांत आलेली ती सारी बातमी खरीच आहे म्हणावयाची!" सौभाग्यवती म्हणाली. व लागलीच मलाही ती टोचून म्हणाली, "हें तुमचें सहशिक्षण, सहवासोत्तर प्रेम व स्वराज्याकरितां स्त्रियांचें सहकार्य बरें का? ह्याचकरितां मी तुम्हाला सांगत असतें की, कॉलेजमध्ये तरुणींना घेत जाऊं नका म्हणून! पण माझं कोण ऐकतंय."

भलत्या वेळीं व लोकांच्या समोर मला सौभाग्यवतीने बोललेलें आवडत नसे. मीही जरा त्रासूनच म्हणालों, "अग, पण कॉलेजमध्ये मुली घेणें न घेणें हें माझ्या का हातचें आहे? आणि कांग्रेसमध्ये तरी मी कधी चुकून कामाला गेलों होतों का?"

"कांही नाही. तुमचें पुरुषांचें अंगच असतें असल्या गोष्टींत! वास्तविक तुम्ही उघड निषेध करावयाला पाहिजे होता या गोष्टींचा? पण तें धैर्य तुमच्या अंगांत नसण्याचें कारण तरी काय?" सौभाग्यवती माझ्याकडे थोडेंही लक्ष न देतां म्हणाली.

तें करुण दृश्य न पाहवल्यामुळेच ती असें बोलत होती हें मी जाणलें व डॉक्टरांच्याही लक्षांत ती गोष्ट आली.

"प्रो. चित्रगुप्त, स्त्रियांच्या कोमल मनाला अशा गोष्टी सहन होणें अशक्य होतें. कमलाबाईच्या मनावर या सर्व गोष्टींचा फार परिणाम झालेला दिसतो आहे. चला, पाहिजे तर आपण परत जाऊं!" हिच्या डोक्यावर कांही परिणाम होऊं नये म्हणून डॉक्टर म्हणाले.

पण सौभाग्यवती परत जाण्यास कबूल होईना. आपण रागांत बोललों त्याचा हा असा परिणाम झालेला पाहून ती जपून वागूं लागली.

त्या दुर्दैवी मातृहृदयाच्या यातना पाहून आम्ही सर्व सारखेच खिन्न झालों होतों. वसुमतीबाईचें मूल त्यांच्या प्रेमाबाई सवतीजवळच असल्याने हा सारा शोक त्यांना होत होता.

आम्ही वरील मनस्थितींत उभे असतां दुसरीच एक वेडी एकदम येऊन सौभाग्यवतीमध्ये आपल्या एखाद्या मैत्रिणीचें साम्य

पाहून की काय न कळे, सौभाग्यवतीच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाली, "सुमित्रे, खरंच का ग मी वेडी आहे." ती तरुणी हिला आपली अगदी जिवलग मैत्रिण समजली! कारण, अगदी गळ्यांत हात घालून ती बोलत होती. "अग, त्या दोघांनी मला वेडी ठरवली आहे हो!" बोलतां बोलतां तिचा कंठ भरून आला व डोळ्यांतून आश्रुपूर लोटला. सौभाग्यवतीच्या अगदी खांद्यावर मान टाकून हें सारें चाललें होतें.

सौभाग्यवती वरील प्रकाराने थोडी घाबरली यांत शका नाही; परंतु भ्याली असें म्हणतां येणार नाही. कारण या सार्‍या स्त्रियांच्या मुखावर वेडेपणापेक्षाही कारुण्याचीच छटा जास्त होती. त्यांना 'वेडया म्हणण्यापेक्षा दुःखाने भ्रमलेल्या म्हणणेंच जास्त शोभेल!

"अग, मुळीसुद्धा तूं वेडी नाहीस हो! कोण म्हणतें तुला वेड लागलें म्हणून? पण तूं रडूं नकोस. डोळे पूस बरें!" बिलकुल न भितां पूर्ण साहानुभूति दाखवीत ती म्हणाली.

तरुण वेडी जास्तच रडूं लागली व सौभाग्यवतीही अगदी सख्या बहिणीप्रमाणे 'उगी, उगी' करीत तिच्या पाठीवर हात फिरवूं लागली. दुःखावेग जरा कमी होतांच तरुण वेडी म्हणाली, "सुमित्रे, अग त्या दोघांनी मला वेडी ठरवून त्या नवभारत पागलखान्यांत पाठवा-वयाचें ठरवलें आहे! आपणच अनीतीने वागून शिक्षा मला करितात. शोभतें तरी का ग त्यांना हें! चांगली बी. ए., एम्. ए. झाली आहे बया! स्त्री वारसाचे कायदे समजून घेण्याकरितां म्हणून घरांत बुसली. आता तीं दोघें मिळून पुस्तक लिहिणार आहेत म्हणे एक!

"माझ्यासारख्या निरपराध स्त्रियांना संसारावरून उठवून, दुसऱ्याचा संसार आपण लुबाडणें हीच का ग समाजसुधारणा म्हणतात ती?" बोलतां बोलतां तिचा स्वर चढला. ती पुन्हा म्हणाली, "अग, ती चांगली इंग्लंडाहून शिकून आली आहे हो! दुसऱ्याचे नवरे बिघडवून आपण लाटावयाचे हाच ना त्या शिक्षणाचा उपयोग? म्हणे बायकांना

पुष्कळ शिक्षण द्या ! हेंच ना करावयाचें शिकवून ? बोलना ग तूं ति
चांगली एक दिवस ! बोलशील ना, सांग माझ्याकरितां ?"

"हो, बोलेन बरें का ! तूं प्रथम डोळे पूस !" तिच्या मैत्रि कल्पनेशीं सौभाग्यवती अगदी पूर्णत्वाने समरस झालेली दिसली. आश्वासनाने तरुण वेडीला थोडें समाधान वाटलेलें दिसलें.

शांत झाल्यावर आपल्या मुलीची तिला आठवण झालेली दिसल

"अग, उषा उठली वाटतें." पाळण्याकडे जरा कानोसा घेत म्हणाली व तीरासारखी धावत जाऊन कचकडयाचीं बाळें निजवलेल्य एका पाळण्याजवळ जाऊन, त्याला झोके देत सुटली. तोंडाने अंगा गीत म्हणण्याचासुद्धा सपाटा सुरू केलान् तिने—

( चाल–मज फिरफिरुनी छळसि कां ? )

"किती मधु मधु हें वदसि तूं
चिमुकले ग बाले !
तूं कुठे शिकशी हें ?
ही गूढ भाषा ! शैशवीं ह्या
तूं देवबाला की काव्यप्रतिभा !
ग ! प्रेमगौरी ! वा स्फूर्तिलहरी देवी !
गोड वाणी, खोल पाणी !
बाले गुणिले छकुले !"

सर्व वार्ड एकदम शांत झाला ! इतका तिचा आवाज मधुर, गो आणि मार्दवयुक्त होता. आम्हालाही जाववेना !

"म्हणा हो, म्हणा सुमतीबाई तुमचा तो उषेचा पाळणा, म्हणा आम्हाला भारीच ऐकावासा वाटतोय् तो ! ती पहा पाळण्यांत उषासुद्ध हसते आहे आणि म्हणते आहे, 'आई, गाणें म्हण ग मला !' " सर्व स्त्रिया त्या पाळण्याभोवतीं जमल्या व म्हणाल्या.

"अगबाई, खरेंच की! म्हणतें बरें का आई आपल्या छकुलीला गाणें!" पाळण्यावर वाकून त्या बाळाकडे पहात ती म्हणाली.

पुन्हा गाणें सुरूं झालें.

( चाल—अंगाईगीत )

बाळे जो जो म ! ॥ध्रु० ॥
प्रतिमा तूं, दुसरी गौरीची ।
　　खाणच आनंदाची ॥ १ ॥
चोख, मुठी चोख, लडिवाळे ।
　　ईशें अमृत भरलें ! ॥ २ ॥
हास गडे हास, झोपेंत ।
　　सुंदर स्वप्नें बघत ॥ ३ ॥
उडती केस तुझे, भुरभूर ।
　　वाटे मज हुरहूर ॥ ४ ॥
विलसें हें हास्य, दे सौख्य !
　　बसते झोके देत ॥ ५ ॥

सर्वच वेड्या चारी बाजूने पाळण्याच्या दोऱ्या धरून सुमतीबाईच्या बरोबर गाणीं म्हणत सुटल्या. जणु काय तो बारशाचाच दिवस होता! पहिल्या अरुणच्या आई व सुमतीबाई पण त्यांच्यांत येऊन मिसळल्या होत्या.

या वेळीं त्या सर्व आनंद आणि वात्सल्य या दोन भावांनी ओतप्रोत भरल्या होत्या!

आम्हालाही तेथून पाय काढण्यास ती संधि बरी वाटली व आम्ही तेथून निसटलों.

"या स्त्रियांना या बाहुल्या कोणी आणून दिल्या येथे डॉक्टर!" सौभाग्यवतीने विचारलें.

डॉक्टर म्हणाले, "अहो काय करूं! या स्त्रियांना आपल्या मुला-बाळांच्याकरितां होत असलेल्या यातना आता तुम्ही पाहिल्यात ना! माझ्याने तें नित्य बघवेना! त्यांचें दुःख कमी करण्यास म्हणून मी हा उपाय केला. शिवाय ही कल्पना सुचण्यास एक गमतीचें कारणही घडलें. तें म्हणजे: एक दिवस आमची माली आपल्या बाहुलीला कडेवर घेऊन आली होती माझ्याबरोबर! येथें वसुमतीबाईंनी हें पाहतांच-त्या धावतच तिच्याजवळ आल्या आणि तिच्या हातांतील बाळ हिसकावून म्हणाल्या, 'कुठे ग नेलें होतेंस माझ्या अरुणाला इतका वेळ, तुला हजारदा सांगतें ना बाहेर नेऊं नको म्हणून? रस्त्यांत पाडावयाचें आहे वाटतें त्याला!' झालें, इकडे माली भोकाड पसरून बसली, माझी बाहुली घेतली म्हणून! सारे उद्योग सोडून, तिला एक आणि या बायांना दोन चार अशीं बाळें आणून दिलीं मी आधी!

"त्या दिवसापासून माली मात्र माझ्याबरोबर दवाखान्यांत येण्याचें नांव घेत नाही. यावरून मूल हें स्त्रियांच्या मानसमन्दिरांतील आधिदैवत आहे असें दिसतें. कायहो मानसशास्त्रज्ञ, खरें ना?"

"कबूल करणेंच भाग आहे." मी म्हणालों.

"निःसंशय या वेड्यांच्या दुःखमय आयुष्यांत तुम्ही क्षणमात्र का होईना, आनंद दिलांत." सौभाग्यवती म्हणाली.

लहान मुलींचें बाहुलीशीं खेळणें हें जरी रोजचेंच दृश्य असलें तरी त्या मोठाल्या स्त्रिया, त्या बाळांना खेळवतांना आम्हाला थोडेंसें हसूं आल्यावाचून राहिलें नाही. परंतु हें शोकांत नाटक होतें.

पागलखाना बंद होण्याची वेळ झाल्यामुळे आम्हाला मग घरींच जावें लागलें.

# ६. गिता

सकाळीं साडेसाताची वेळ होती. पागलखान्याचें मोठें दार नुकतेंच नोकरांनी उघडलें होतें. अजून सर्व नोकर पुरते कामावरही आले नव्हते. या नव्या नोकरीवर नवीनच आल्याने मला जरा जास्त उत्साह वाटत होता. आणि म्हणून कामाच्या ठरलेल्या वेळा सोडून किती तरी जास्त वेळां मी पागलखान्यांत ये जा करीत असे.

मी दुसऱ्यांदा पागलखाना पाहण्यास आल्यापासून डॉक्टर आणि मी चांगलेच मित्र बनलों. इतकें की, आम्हाला आता एकत्रच राहावें असें वाटूं लागलें व म्हणून मानसशास्त्राचा एक तज्ज्ञ मदतनीस या नात्याने डॉक्टरांनी मला सरकारकडून इकडेच मागून घेतलें.

सरकारनेही त्याप्रमाणे माझी ह्या नव्या कामावर बदली केली. शिवाय पगारही दहा रुपयांनी वाढला. मानसशास्त्र या माझ्या आवडत्या विषयाच्या दृष्टीने मला हें नवें काम अधिक आवडलें. कारण या वेडयांचीं मनें हें एक माझें प्रयोगालयच झालें. तरीही डॉक्टरांची मैत्री हें सर्वांत मोठें कारण होतें. सौभाग्यवतीही मानसशास्त्रांतील माझी एक शिष्या बनली. प्रत्येक वेडीची हकीगत हळूहळू मोठया युक्तीने त्यांच्या निरनिराळ्या उत्कट भावनांच्या तंत्राने तिने काढून घेतली आणि ती सारी लिहून काढली. आणि शिवाय ह्या वेडया कोण, त्यांची परिस्थिति, वेडाचीं कारणें, त्यांचे नातेवाईक व

नातेवाईकांचा वेड लागण्याशीं संबंध वगैरे गोष्टींची बारीक सारीक सर्व माहिती ती मिळवूं लागली. सर्वांत विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे कृपाशंकर जाहागीरदारांची मयत कन्या सुवासिनी हिची एक रोज-निशीही तिने मिळविली. या सर्वांचा एक मोटा ग्रंथ लिहिण्याचेंही तिच्या मनांत आलें. अर्थातच मला व डॉक्टरांना या सर्वांचा अत्यंत उपयोग होऊं लागला. थोडक्यांत म्हणजे स्त्रियांच्या मानसमन्दिराचें एक विशाल दालन मला सापडलें. असो!

पागलखान्याचें दार उघडतांच एक दरबारी किंवा सरकारी बंद मोटार जोरानेच पागलखान्यांत घुसली. लगेच शिपायाने परिचय-चिठी आणली. ती पहातांना माझ्या लक्षांत आलें की, भारतनंदनांना वेड लागल्यामुळें जे नवे सर्वाधिकारी लोकसभेने निवडले तेच खुद्द आले आहेत.

शक्य तितक्या आदराने मी त्यांना उतरून घेतलें. आंत कांही स्त्रिया होत्या, पण त्या बाहेर येईनात, म्हणून मी पाहिजे असल्यास एकीकडे बसण्याची सोय करतों म्हणून सांगितलें. परंतु सध्या आतच राहूं देत, असें सर्वाधिकारी इंद्रसेन म्हणाले. मी फोन करून लगेच डॉक्टरांना बोलावून घेतलें व आम्ही सर्व कचेरींत गेलों.

"हे माझे नवे मदतनीस मानसशास्त्रज्ञ प्रो. चित्रगुप्त." डॉक्टरांनी माझी ओळख करून दिली.

"बरें आहे, त्यांना सर्व आपलें तंत्र समजून द्या!" तंत्र शब्दावर जोर देऊन सर्वाधिकारी म्हणाले.

डॉक्टरांनी होकार दिला.

सर्वाधिकारी म्हणाले, "हें पहा डॉक्टर, मला परत जाण्याची अत्यंत घाई आहे. इकडे अनंत काम आणि तिकडे याचवेळीं सुनेत्रा —माझी धर्मपत्नी—हिला एकाएकीं ह्या वेडाचा झटका आला; आणि नर्मदापुत्रांच्या सांगण्यावरून ती लौकर सुधारण्याचें कांही चिन्ह दिसत

नाही! मला तर मिनिटाची सुद्धा फुरसत नाही. शेवटीं तुमच्याशिवाय हें विश्वासाचें काम आणखी कोणावर टाकूं? म्हणून येथे ठेवण्यास स्वतः घेऊन आलों.

"माझ्यावर हा अत्यंत दुःखाचा प्रसंग आला आहे! ती सारखी रडतच बसते, हट्ट करिते. विलक्षण संशय तिला माझ्याबद्दल येतात. आणि दुर्दैव असें की, तिच्या सहवासाने तिची दासीही वेडी बनली आहे. त्यांतही ती भयंकर बेफाम आहे! इतकी की, तिला कधी कधी मारझोडही करावी लागते. तिलाही बरोबर आणली आहे. दोघींचीही फार काळजी घ्या, हेंच माझें सांगणें, दुसरें काय! पैशाकडे बिलकूल पाहण्याचें कारण नाही. व्यवस्था उत्तम ठेवा. पत्नीसंबंधीं ही फार मोठी चिंता मला निर्माण झाली."

बोलतां बोलतां त्यांना गहिवर आला असें वाटलें. कारण ते बराच वेळ डोळ्यावर हातरुमाल धरून स्वस्थ बसले होते. नंतर एकदम म्हणाले.

"ठीक आहे. ईश्वरी इच्छा! सध्या तिच्या हिताकरितां मला सर्व मोह आवरला पाहिजे! चला, रोगी आपल्या ताब्यांत घ्या." असें म्हणून ते उठून मोटारीकडे गेले. आम्हीही गेलोंच.

मोटारीचें दार उघडतांच एका रूपमती सुंदर स्त्रीला म्हणाले, "सुनेत्रे खाली उतर. तुझी प्रकृति डॉक्टरांना दाखवावयाची आहे."

सुनेत्रा! खरोखर अत्यंत कमनीय नेत्र होते तिचे. परंतु ते विशाल डोळे या वेळीं पाण्याने डबडबले होते. किती तरी वेळ रडल्यासारखे ते लाल झाले असून, थोडे सुजलेही होते.

"असें निष्ठुर होऊं नका! मला का फसवतां! हा दवाखाना नाही. हा पागलखाना, कारागृह आहे. मी तुम्हाला यापुढे कधीही अडथळा करणार नाही. मला माझ्या घरीं राहूं द्या! माझीं लहान मुलें, सुधा, सुधीर!...." त्या हळूहळ बोलत होत्या.

"चूप!" इंद्रसेन म्हणाले. व त्यांनी त्यांना एकप्रकारें खालीच ओढलें. आंत बसलेल्या आणखी एका सुंदर स्त्रीनेही त्यांना थोडें खाली ढकललेंच. पुढे बसलेली त्यांची दासी गीता ही आधीच खाली उतरली होती.

"मालतीबाई! तुम्ही काय म्हणून बाईसाहेबांच्या अंगाला हात लावलात?" ती त्या आंतील बाईला म्हणाली.

"गप्प बैस ग, गीता! खबरदार, जास्त बोलशील तर!" तिलाही इंद्रसेन म्हणाले.

सुनेत्रेजवळ ती दासी आली व तिने तिचा हात धरला आणि अगदी प्रेमळपणाने म्हणाली, "बाईसाहेब! तुम्हाला बरें व्हावयाचें आहे ना?"

"बरें मग?"

"डॉक्टरांना नको का दाखवावयाला! मी तर आहे तुमच्या-बरोबर. मग कां बरं घाबरतां! चला!"

सुनेत्रेने पतीचा हात सोडला व गीतेच्या खांद्यावर मान टाकून त्या ओक्साबोक्शीं रडूं लागल्या; "गीता, मला जगांतून उठवलें ग! हा पागलखाना आहे, तुला माहित नाही! वेडे!"

दुसरी बाई मोटारींतच होती तरी इंद्रसेनांनी मोटारीचें दार लावलें; व आम्ही सर्व तपासण्याच्या खोलींत जाऊं लागलों. पण मोटारीचें दार थाडकन लागतांच, 'सुधा! सुधीर!' म्हणत सुनेत्रा मोठयाने किंचाळली व ताबडतोब बेशुद्ध होऊन पडली.

परिचारिका धावल्या, आम्ही दोघांनीही त्यांना सावरलें. पण त्यांना शुद्ध नव्हती. इंद्रसेन म्हणाले, "हें पहा तुम्ही बिलकूल घाबरूं नका. तिला नेहमीचीच फीटची सवय आहे. होईल आता सावध! बरें आहे! नमस्कार! ती सावध होण्यापूर्वीच आम्ही जातों म्हणजे पुन्हा तिला वाईट वाटावयाला नको." असें म्हणून मोटारला त्यांनी इशारा दिलाव

मोटार निघून गेलीही. मी मात्र आश्चर्याने थक्कच झालों! डॉक्टरांना मात्र फारसें आश्चर्य वाटल्याचें दिसलें नाही.

सुनेत्रेची नाडी हातांत घेऊन ते बसले होते. त्या बिचाऱ्या गीतेचा जीव अगदीच उडून गेला. बाईसाहेब! बाईसाहेब! करूनच ती सारखी मालकिणीला हाक मारीत होती.

सुमारें दीड तासाने सुनेत्रेने आपले विशाल डोळे उघडले व ती सभोवार पाहूं लागली. परंतु मुद्रा कावरीबावरीच असून ज्ञानतंतूची जागृति त्यांत दिसत नव्हती! त्यांच्या डोळ्यांना पाणी लावून व ते पुसून प्रेमळ स्वराने ते म्हणाले, "ताई, आता बरें वाटतें ना!"

आपलेपणाचा तो आवाज ऐकून सुनेत्रा त्यांच्याकडे मान वळवून निरखून पाहूं लागली. आणि जरा वेळाने जणू काय ओळख पटावी त्याप्रमाणे म्हणाली, "दादा! तूं केव्हा आलास रे!"

डाक्टर म्हणाले, "मी येथेच आहे ताई, तुझ्याजवळ. काय पाहिजे तुला? थोडें पाणी पितेस का? म्हणजे तुला बरें वाटेल."

"हो, पिते. दे!" सुनेत्रा म्हणाली. मी चटकन् पाणी घेऊन तिला पाजूं लागलों! पोटांत थोडें पाणी गेलें! ओठ अगदीच कोरडे पडले होते, तेही ओले झाले. डोक्यावर बर्फाची पिशवी होतीच. हात-रुमालाने त्यांचें तोंड मी पुसत असतां माझ्याकडेही तिने निरखून पाहणें सुरू केलें. नंतर जणू काय खात्री पटल्याप्रमाणे ती म्हणाली, "भाई तूं पण आलास?"

मला कांहीच बोलूं न देतां, डॉक्टरांनीच सांगितलें, "होय ताई, तोही येथेच आहे. सुनेत्रेचें समाधान झाल्यासारखें दिसलें. पण पुन्हा त्यांच्या नेत्रावर झापड येऊं लागली.

तें पाहून गीता मात्र रडूं लागली व घाबरून म्हणाली, "बाई-साहेब, हे दादासाब अनू भाईसाब न्हैती हो. डागतरसाब हैती!"

आम्ही दोघांनी तिला 'चूप! चूप!' केलें. व सुनेत्राबाईंना बाहेर सोप्यांत घेऊन आलों. "त्यांना श्रमाची ग्लानी आली आहे. त्या थोडया वेळाने जाग्या होतील! घाबरूं नको! शिवाय आम्ही त्यांचे भाऊ नाही म्हणूनही सांगूं नको! नाही तर त्यांना वाईट वाटून प्रकृति जास्त बिघडेल." डॉक्टरांनी गीतेला सांगितलें.

इतक्यांत चार पांच वेडया तेथे आल्या व विचारूं लागल्या. "डॉक्टर, तुम्ही आज सकाळींच का आलांत! आणखी वेडया आणल्यात का?"

डॉक्टरांनी कपाळाला हात लावला आणि म्हणाले, "होय, आणल्या आहेत! तुम्ही कमी आहांत ना! हेंच माझें नशीब दिसतें आहे."

सुमती वेडी म्हणाली, "आज तुम्हाला पण वेड लागलें होय!"

ह्या वेडयांचे हावभाव व विचित्र बडबड ऐकून, गीता टकमका त्यांच्याकडे पाहूं लागली. तोंच एक वेडी आली व तिला मिठी मारून म्हणूं लागली. जने, केव्हा आलीस ग पंढरीहून! आखाडी झाली ना! आण कुंकूं! बुक्का! डाळ! अग विठोबाचा प्रसाद!"

गीता घाबरून, "अग दूर हो, दूर हो! मी नाही बाई तुझी जना! डागतरसाब! आहो या काय समद्या अवा येडया हैती काय! अरं देवा! अन् आमचं मालक कुठं हैती!"

मी म्हणालों, "तूं आपल्या बाईसाहेबांना सावध करीत होतीस तेव्हाच ते निघून गेले. आता तुम्हा दोघींना येथेच राहावयाचें आहे. कांही दिवसांनी साहेब तुम्हा दोघींना नेण्यास येतील."

गीता मटकन् खालीच बसली, "बाईसाहेब तुम्ही म्हणालांत तसं खरंच किहो घडून आलं! दुष्टांनी दावा साधला हो साधला आपला. मालतीबाई! तुझा डाव तूं पुरा केलास अं! साताजन्माच्या वैरिणी, कुठं तरी आता हें पाप फेडशील! भली देशभक्तीण आलीस

ग बया! दिनरात इतक्या करितांच येत होतीस काय तरी! अग तुझं लक्षण मी कवाच वळखलं होत! भोळ्या माझ्या बाईसाहेब! त्यांच्यासारख्या माउलीला संसारावरून उठवून आता त्यांच्या जागीं तूं मालकीण होणार व्हय! चांगली श्रीमंताची शिकली सवरलेली व्हतीस! तुला का दुसरा नवरा मिळत नव्हता!"

वरीलप्रमाणे ती आपल्याशीच सारखी बडबडत बसली तेव्हा मी तिला समजून सांगितलें, "हें बघ गीताबाई! उगीच आता आजाऱ्यांच्या खोलीजवळ तूं कांही बडबडत बसूं नको! त्यांना त्रास होईल. तूं कांहीं भिऊं नको! तुम्हा दोघींनाही येथे कांही त्रास होणार नाही. तुझं नांव गांव अजून लिहून घ्यावयाचें आहे. म्हणून तूं या शिपायाबरोबर आमच्या कचेरींत जा, व कारकून विचारील त्याला आपलें नांव, गाव सांग!"

माझें हें बोलणें ऐकून गीता एकदम चिडली. आणि म्हणाली, "डागदरसाब, तुम्ही बऱ्या बोलाने सत्य सांगा की, बाईसाहेबास्नी अन् मला तुम्ही येडया म्हणून ठेऊन घेतल्यात् काय! त्या मालतीबाईला अन् आमच्या मालकाला तुमी बी सामील आहां काय? मग माझ्या-सारखी वाईट बाई नाही अं. मी तुमास्नी बजावतें बगा अगुदर!"

मी तरी काय उत्तर देणार! मी तिला पुन्हा सांगितलें की, "आम्हाला तुझी मालतीची भानगड कांही माहीत नाही. तुझ्या मालकांनी तुला वेडी ठरविली आहे, आम्ही नाही. समजलीस? जा आता कचेरींत! नाही तर काय! उगीचच कशाला येथे कटकट? जारे रामसिंग! क्लार्कलाच येथे बोलाव!" शिपाई क्लार्कला घेऊन आला व मी तिला पुन्हा सांगितलें की, "तुझा पत्ता आणि नांव, गाव सांग यांना!"

तिच्या रागाला आता मात्र सीमा राहिली नाही. ती चक्कच म्हणाली, "पक्क समजलं. तुमी त्या सोनेरी टोळींतीलच मानूस हैती! म्हणे नांव, गाव अन् पत्ता सांग. अशा वाटेच्या चोराला कांही ही गीता

कधी आपलं नांव, गाव सांगनार नाही, ध्यानांत धर! कशापाई माझा पत्ता मागतां हो तुमी? मला येडं करून माणसांतून उठवलंस, अन् आता काय माझ्या दादल्याला अन् लेकराबाळांना येडं करायचा विचार हाय व्हय तुझा? माज्या मालकांनी आमी दोघी येड्या म्हनूनशान् सांगितलं काय? अरे, पण दीड शहाण्या! तुझी अक्कल कुठं केळी खायला गेली होती? डागदर हैस की चांगला तूं!"

ती अगदीच एकेरीवर येऊन बोलत आहेसें पाहून, मीही पण जरा दरडावूनच तिला म्हणालों, "तुला एकदा सांगितलें ना की, गडबड करूं नकोस म्हणून? अगोदर बाहेर जा आणि नांव, गाव सांग मुकाट्याने! नाही तर, जबरदस्तीनं बाहेर न्यावें लागेल तुला, समजलं?"

"बाहेर काढनार व्हय मला तूं! कोण समजतोस रे तूं मला गोमाजी कापशा? माझ्या बाईसाहेबापासून एक क्षणभरही दूर जाणार नाही मी. काय समजलास? माझं नांव पाहिजे व्हय तुला? बरं है! घे तर टिपून. **मरीआई गीता** आहे माझं नांव. तुम्हां सर्वांचे एक दिवस धिंडवडे काढीन तवाच राहीन!" गीता संतापून म्हणाली.

गीतेचें काम फारच कठीण आहे असें जाणून मीच नमतें घ्यावयाचें ठरवलें. पण इतक्यांत सुमित्रा किंचाळली, "गीता!"

त्याबरोबर गीता तीरासारखी धावली.

"काय बाईसाहेब, काय म्हणतां? ही पहा बरं, मी तुमास्नी धरून बसले आहें." असें म्हणून ती सुमित्रेच्या अंगावर हात टाकून बसली.

मी व डॉक्टर तेथेच होतों!

सुमित्रेला ताप चढूं लागला. या वेळीं तिने आम्हां दोघांकडे पाहिलेंसुद्धा नाही. ती गीतेशींच बोलूं लागली. "गीते, ऐक ग, ऐक! तीं दोघें बघ, कुजबुजताहेत! मला वेडी ठरविण्याचा त्यांचा बेत चालला आहे हो! तीं पहा! तीं पहा! परस्परांच्या हातावर टाळ्या

दिल्या त्यांनी ! झाला ! झाला ! नक्की बेत झाला ग त्यांचा ! विकट हसताहेत ! कांही तरी राक्षसी बेत दिसतोय् बघ त्यांचा ! कारस्थान नक्की ठरलं बरं !

"जेव्हा तेव्हा माझं डोकं फिरलं म्हणतात ग ! काय हें भलतेंच बोलणें तरी, देवा ! मला का हें समजत नाही? सारा दिवस ती नट्टापट्टा करून येते. पावडरीला नी पाठीवरच्या शेपटयालाच भुललांत ना ! ते तिचे रंगेल डोळे ! अशा कुठे कुलस्त्रिया बघतात का ग गीता !

"सोडा, सोडा हो मला ! दार उघडा ! कोंडू नका हो मला. तीं पहा माझीं मुलें, 'आई, आई' करून घरभर मला भिरीभिरी शोधताहेत. सुधा ! सुधीर !..." सुमित्रा उठून धाऊं लागली.

गीता दीनवाणी रडूं लागली व म्हणाली, "देवा, कायरे हा प्रसंग ! मायलेकरांची ताटातूट झाली ना रे ! डागदरसाब, पाया पडते हो मी तुमच्या. रागलोभ विसरा आणि या सज्जन माउलीला बरी करा हो !"

छे: छे: आता आमच्या दोघांच्यानेसुद्धा बघवेना तें हृदयाचें पिळवटणें. आमच्या डोळयांतूनही खळखळ अश्रु वाहूं लागले ! पण गीतेचा आमच्यावरचा राग मात्र त्यामुळे गेला.

# ७. भविष्य खरें ठरलें

दिवसेंदिवस पागलखान्याची संख्या बेसुमार वाढत चालली. आणि गंमत ही की, या वेडयांपैकी बऱ्याच स्त्रिया व कांही पुरुष सोडले तर राहिलेल्या मोठया संख्येमध्ये खरे वेडे, किंवा घातपात करणारे वेडे, असे फार थोडे होते, असें डॉक्टर व मी–आम्हा दोघांचेंही स्पष्ट मत होतें. परंतु, पहावें तों दर मासिक तपासणींत डॉ. नर्मदापुत्र, सर्वच वेडयांच्या प्रकृति, जास्तच बिघडल्याचें नमूद करीत. ते मेंदूतज्ज्ञ, परदेशांतून शिकून आलेले आणि सर्वांत वरचे डॉक्टर असल्याने आमच्या मतांचा कांहीच उपयोग होत नसे.

'नारद' साप्ताहिकांत या बाबतींत नेहमीं टीका येत असे. यावरून माझा तर असा पक्का ग्रह होत चालला होता की, राक्षसी वृत्तीच्या व दुष्ट माणसांच्या सुखाच्या मार्गांत आड येणारीं आणि हीन कारस्थानें उघडकीस आणण्यास धजणारीं माणसें यांना दडपून ठेवण्याकरितां हा पागलखाना सुरू करण्यांत आला असावा. हें एक कपट-कारस्थान आहे. 'पागलखाना' की 'बंदीगृह' अशा शिर्षकाखाली 'नारद' पत्रांत एक लेखही आला होता.

इकडे पागलखान्याच्या खर्चाचा प्रश्न सोडवणें दिवसेंदिवस अत्यंत बिकट होत चाललें होतें. देशभक्त वेडयांच्याकरितां सरकार

वाटेल तितका खर्च सोसण्यास तयार आहे असा गाजावाजा तर खूपच झाला होता. परंतु प्रत्यक्ष परिस्थिति मात्र अगदी उलट होती. आरोग्यमंत्र्यांचें 'काटकसर करा' हें आमच्या मागणीला ठरलेलें उत्तर असे. खर्चाची व्यवस्था हा एक आमचा पेचप्रश्नच होऊन बसला होता. एकदा तर आरोग्यमंत्र्यांनी आमच्या मागणीला असें उत्तर पाठविलें की, 'ज्यांचे मेंदू आता कामांतून गेले आहेत असे लोक, मग ते कितीही मोठे असोत, त्यांच्याकरितां चैनीचे खर्च चालविणें ही राष्ट्रीय पैशाची निवळ उधळपट्टीच होय! केवळ जिवंत जीव जगविण्यापुरताच हा प्रश्न आहे. म्हणून या खर्चाच्या बाबतींत वारंवार लिहून त्रास देऊं नये.'

निर्दयपणाचा हा मासला एखाद्या अतितर दुष्ट स्वभावाचा द्योतक होय यांत शंका नाही. फारच थोडे लोक इतके भयंकर निर्दय सापडतील हें खरें. पण आम्ही करावयाचें काय, हा प्रश्न कसा सुटणार? पागलखान्यांत असलेल्या थोर देशभक्तांना किमपि दुःख होऊं नये याकरितां आम्ही दोघे अत्यंत काळजी घेत होतों; आमचें तें कर्तव्यच होतें. परंतु आमचा नाइलाज होऊं लागला.

शेवटीं एके दिवशीं, धैर्य करून सारे भाई लोक, मरीआई गीता, आणि दुर्गादेवी इतके वेडे चांगले बरे झाले म्हणून आम्ही सोडून दिले. हेतु हा की, त्यांचे येथे हाल होऊं नयेत. त्याशिवाय, येथील खरी स्थिति त्यांच्या नातेवाइकांना घरीं कळावी. कारण त्यांच्या नातेवाईकांना येथे भेटूं देण्याबद्दल आम्हाला सक्त मनाई करण्यांत आली होती.

सोडलेले सर्व लोक किंबहुना राजकीय विभागांतील सर्वच लोक व आम्ही दोघे यांच्यांत आता परकीयता कशी ती नव्हतीच. जनतेला व मंत्रिमंडळाला आमची मैत्री अज्ञात होती हें खरें; परंतु खरी वस्तुस्थिति अशी होती की, भाई व आम्ही दोघे मिळून परस्पर सहकार्याने एका

मोठ्या राजकीय कटाचा शोध लावून व मिळतील तेवढे पुरावे गोळा करून, एक मोठी केस जनताजनार्दनापुढे मांडण्याकरितां तयार करण्याची खटपट करीत होतों. त्या दृष्टीने पाहिलें तर कांही लोकांना मुक्त करणें अगदी जरूर होतें. त्याप्रमाणे आम्ही सुरवात केली.

तो संक्रांतीचा दिवस होता. सुट्टीचाच दिवस असल्याने मीही पण पागलखान्यासाठी थंडीकरितां कांही ब्लँकेटें वगैरे खरेदी करावयाचीं होतीं म्हणून स्वदेशी बाजारांत चाललों होतों. पहातों तों मधल्या चौरस्त्यावर विजेच्या दिव्याच्या चौथऱ्यावर दुर्गादेवी व्याख्यान देत होती. मी गेलों तेव्हा व्याख्यानाला नुकतीच सुरवात झाली होती.

टपोरशंख, लंबोदर आणि अवधूत हे तिघे रस्त्यांतील येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना व्याख्यानाला चला म्हणून खुशाल ढकलीत ढकलीत चौथऱ्याजवळ आणून उभे करीत होते. मळवटधारी तर त्या दोघीही होत्या. पण एक शांत देवता दिसत होती आणि दुसरी मूर्तिमंत कडकलक्ष्मी बनली होती. गळ्यांत एक कवड्यांची माळही पण तिने कोठून तरी मिळवून घातली होती. तशा त्या वेषाने तीही पण स्त्रियांना आणून बसवीत होती. आज संक्रांतीचाच दिवस असल्याने बाजारांत लोकही पण रस्त्याने बरेच जात येत होते.

पाहतां पाहतांच तेथे अफाट गर्दी झाली. यांनी हा काय प्रकार आरंभला आहे हें पाहण्याकरितां मीही पण जाऊन पाहूं लागलों.

दुर्गादेवी म्हणाली,

"बंधुभगिनींनो! माझें म्हणणें नीट लक्ष देऊन ऐका! नाही तर मागाहून पश्चात्ताप करण्याचा प्रसंग येईल. बायानों! काल रात्रीं माझ्या स्वप्नांत कोपलेली संक्रांत आली व तिने मला असा दृष्टांत दिला की, 'जा, गावांत जाऊन जनतेला बजावून सांग की, हिंदमाता कष्टी आहे; स्वराज्य मिळालें तरी पापी लोक नष्ट झाले नाहीत. ते चांगल्या लोकांचीं सोंगें घेऊन जनतेला फसवीत

आहेत. जे लोक तुम्हाला देशभक्त वाटतात ते लोक वास्तविक देशद्रोही आहेत. स्वदेशी मालाच्या पाट्या दुकानावर लावून सर्वत्र दुकानांत मात्र परदेशी मालच भरला आहे. खोटे 'स्वदेशी' छाप तयार करून ते प्रत्येक वस्तूंच्या वर लावले आहेत. एवढेंच नव्हे तर देशद्रोही लोक परकीयांना फितूर होऊन, ते त्यांचा स्वस्त माल स्वत: खरेदी करतात व त्यावर 'स्वदेशी' असा छाप मारून महाग विकीत आहेत. जनतेची सर्रास लूट त्यांनी राजरोस चालविली आहे.

"अशा चोरून परदेशी माल विकून नफेबाजी मिळविणाऱ्या लोकांनी बऱ्या बोलांनी, तो परदेशी माल तावडतोब बाहेर काढून त्याची सर्वांसमक्ष होळी केली पाहिजे. तसें त्यांनी न केल्यास आज दुपारीं नक्की बारा वाजतां त्यांच्या दुकानांतील परदेशी माल जळूं लागेल, दुकान पेटेल व सर्व सत्यानाश होईल.

"लोक हो! मी हा तुम्हांला इशारा देत आहें. आपण माझ्यावर विश्वास ठेवा! नाही तर, परिणाम बरा होणार नाही. देवता कोपली आहे! ईश्वर कोपला आहे! निष्कारण प्राणहानि होईल! गोष्ट चुकणार नाही! करितां लौकर परदेशी माल बाहेर काढा!"

मला कळलें की, आम्ही सोडलेले हे वेडे सकाळपासून घरींसुद्धा न जातां रस्तोरस्तीं हाच धंदा करीत हिंडत आहेत. मात्र या टोळीमध्ये भाई काहूर, भाई भीमसेन, भाई आझाद व भाई नारद हे मात्र कोठेही दिसले नाहीत.

लोकांनी दुर्गादेवीला तावडतोब ओळखलें. कारण स्वातंत्र्य-संग्रामांतील एक प्रमुख सेनानी म्हणून ती सर्व प्रांतभरच नव्हे, तर अखिल हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यांत चांगली सुपरिचित होती. पुष्कळ प्रसंगीं तिचा गौरव करितांना लोकांनी रणशूर लक्ष्मीची उपमा तिला दिली होती. गोरगरीब, संकटग्रस्त अशांची तर ती एक प्रेमळ व कनवाळू

माताच होती. त्याहूनही विशेष म्हणजे, ती अत्यंत शीलवान् , सत्यवादिनी आणि सदाचारी होती. त्यामुळे जनहृदयांत तिला देवतेचें स्थान प्राप्त झालें होतें.

एक गोष्ट मात्र तिची जरा विचित्रच होती. आणि ती म्हणजे ती विधवा असूनही भलें मोठें कुंकू लावून हिंडत असे. त्यामुळे ती कांही सनातनी टवाळ टीकाकार व पुष्कळ स्त्रिया यांच्या टीकेचा विषयच होऊन बसली. तथापि तीही गोष्ट लोकांच्या आता परिचयाचीच झाली होती. त्यामुळे एकप्रकारें सर्वांना ती फार दिवसांनी दिसल्यामुळे, लोकांनी प्रेमानेच तिचें स्वागत केलें. 'कसें काय सुमित्रादेवी, बरें आहे ना!' वगैरे विचारपूस केली. 'रणरागिणी' या गुणामुळे पुष्कळ लोक, भाई लोकांप्रमाणे तिला दुर्गादेवीही म्हणत असत. शेवटीं तिला, देशाचेंच वेड लागलें, अशी सर्व लोकांची समजूत होती. • तिच्या त्या वेळच्या स्थितीबद्दल सर्वांना वाईट वाटत असे. ती आज त्यांना बऱ्याच दिवसांनंतर भेटल्यामुळे, जो तो तिची प्रेमाने चौकशी करून, घरीं बोलावूं लागला. परंतु, दुर्गादेवी त्यांना म्हणायची, "सुखदुःखाच्या गोष्टी बोलावयाला आज वेळच नाही.· आपल्या नगरावर आगीची आपत्ति येणार आहे. त्याचा आधी तुम्ही सर्व मिळून विचार करा! देवीने मला दृष्टांत दिला आहे, तें कधीही खोटें होणार नाही!" संक्रांतीदेवी कोपली आहे, असें एकसारखें ती सर्वांना सांगत चालली होती. कोठे क्षणभरसुद्धा थांबत नव्हती.

मरीआई गीता व ते तिघे—लंबोदर, अवधूत आणि ढपोरशंख—तिचें म्हणणें अधिक ओरडून लोकांना सांगत. त्यांत ती मरीआई तर कांही विचारावयालाच नको! ती म्हणे, "बघा! दुर्गादेवीचें ऐका! नाही तर देवी तुम्हाला शाप देईल व त्यामुळे तुमचें वाटोळें होईल! तुमचा सत्यानाश होईल!" असे पदरचे दहा पांच शब्द घालून लोकांना सांगे.

लोकांचा मोठा थोरला घोळकाही त्यांच्याबरोबर चालत होता. एका अर्थी त्यांचें तें त्या दिवशीं परदेशी मालावरील पिकेटिंगच चाललें होतें म्हटलें तरी चालेल. कारण त्या दोघींचा तो विचित्र पोषाक आणि मरीआईची ती अभद्र वाचा याने खरोखरीच पुष्कळ लोकांना परदेशी माल घ्यावयाला धीर होईना.

व्यापारी या प्रकाराने फार चिडले. परदेशी दुकानदारांच्या 'मेरी बाजारां'त जाऊनही त्यांनी तोच प्रकार केला. तेथे मात्र तीन मोठाल्या दुकानांत, भाई काहूर, भाई नारद आणि भाई आह्लाद हे तिघेही त्यांना दिसले. परंतु, या पांचांना पाहतांच, ते तेथून निघून गेले. मीही वेड्यासारखा 'आता या प्रकरणाचा शेवट तरी काय होणार?' या चिंतेने गुपचूप त्यांच्या मागून चाललों होतों.

बारा वाजतां बहुतेक सर्व लोक दुकानें बंद करून, सणाचा दिवस व विक्रीही होईना म्हणून घरीं गेले. दुर्गादेवी व इतर लोक सुटल्याची खुद्द त्यांच्या घरीं तर दादही नव्हती. साडेबाराच्या सुमाराला मात्र दुर्गादेवी त्या चौघांना जेवण्यासाठी घरीं घेऊन गेली. मी मग तेथून परतलों व पागलखान्यांत पांडव टेकडीवर न जातां, उशीर झाला म्हणून एका चांगल्याशा हॉटेलमध्ये जेवायला गेलों.

माझें जेवण होऊन पानसुपारी खायला मी टेबलावर बसतों न बसतों तोंच, रस्त्यांत लोकांचा आरडाओरडा सुरू झाली 'की, कापड-बाजारांत आगीचा डोंब उठला आहे! 'मेरी बाजारां'स दुकानांच्या खिडक्यांतून लोटच्यालोट बाहेर पडताहेत! भविष्य खरें झालें.

कसली संक्रांत आणि कसलं काय! आगीच्या बंबाच्या कर्कश आवाजांनी सारें अमरपूर घुमूं लागलें. पाणी पुरवतां पुरवतां नगर-पालिकेच्या लोकांच्या नाकीं नऊ आले. त्यांतही नगराध्यक्ष नवग्रह मंत्रिमंडळाबरोबरच एका वनश्रीच्या अरण्यांत पार्टी होती म्हणून तिकडे गेले होते.

पाणी लौकर येईना. संकटग्रस्त लोक नगरपालिकेला व नवग्रह मंत्रिमंडळाला शिव्याशाप देऊं लागले. सर्वत्र हलकल्लोळ झाला! विश्वास ठेवणारे आणि न ठेवणारे, शहाणे व वेडे, सर्वच बोलूं लागले. "त्या मरीआईचें व दुर्गादेवीचें भविष्य खरें झालें! दुर्गादेवीला खरोखरच साक्षात्कार झाला असला पाहिजे. कापडाचे दुकानदार निश्चित् पापी असले पाहिजेत. असें ज्याच्या जें तोंडाला येईल, तें तो बोलूं लागला.

दुर्गादेवी, मरीआई व ते तिघे भाई, पुन्हा लोकांना सामान काढण्यास अविश्रांत मदत करूं लागले. लोकांचें पुष्कळ नुकसान झालें. कांहींचीं दुकानें तर अगदी जळून खाक झालीं. 'इंदमाता बाजारां'त मात्र आग थोडी आटोक्यांत होती. तेथेच दुर्गादेवी व इतर मदत करीत होते. 'मेरीबाजार' त्याला लागूनच होता.

अशा गर्दीच्या वेळीं बुद्धीशीं वैर असलेला दपोरशंख मात्र काळवेळ न पाहतां, पुढील गाणें घोळून घोळून व तालासुरावर म्हणूं लागला. इतकेंच नव्हे तर फिदी फिदी हसत, बाजाराच्या या टोकापासून तों त्या टोकापर्यंत गाणें म्हणत हिंडत होता.

(चालः—शिंग फुंकीत चाले पाण्याचा इंग्रजी बंब)

शंख फुंकित चाले इंग्रजी आगीचा बंब ॥ ध्रु. ॥

आग लावी आतून, पाणी ओती वरून
नट नाटकी करितो गुंग ॥१॥

नफा घेता पिळून, नोटा गेल्या जळून
आली होती ना नेत्रांत धुंद ॥२॥

पापें आलीं फळून, बसा मुग गिळून
फुटला नस्याच्या पापाचा बंब ॥३॥

नीति गेली ढळून धन गेलें पळून
होता निशेंत सतत दंग ॥४॥

वारे देशभक्ता! घेसी दारूभक्ता
बनलेला तूं पक्काचि गुंड ॥५॥

नवी काढी शक्कल, लढविली अक्कल
बाबा त्याचीच नक्कल झाली ॥६॥

होळी परदेशीची झाली, झाली खाशी
खेळ करूनि राखेचा रंग ॥७॥

या ढपोरशंखाच्या मूर्खपणाचा परिणाम अत्यंत वाईट झाला. एक युरोपियन आणि दोन तीन देशी व्यापारी चवताळून एकदम त्यांच्या अंगावर गेले, आणि "यांनीच सर्वांनी मिळून आगा लावल्या आहेत. पकडा त्याला, कुठें गेले बाकीचे. सकाळपासून जसे कांही प्लेगाखारखे शिरले आहेत नगरांत. लाखो रुपयांचें आमचें नुकसान केलें यांनी! संक्रांत संचारली होती नाही कां तुमच्या अंगांत!" असें म्हणून ढपोरशंखाला पकडून त्यांनी एका मोटारींत कोंबलें, व चल पागलखान्यांत जन्मभर तुला पुरून टाकतों, असें ते म्हणाले.

ढपोरशंखाला वाटलें आता आपल्याला एकट्यालाच परत जावें लागणार म्हणून तो सांगू लागला की, आम्ही पांच जण आहोंत ना, मला एकट्यालाच का नेतां! ते पहा, त्या तिथे तुमचंच सामान उचलताहेत! असें म्हणून तो मूर्ख अवधूत, लंबोदर, मरीआई, दुर्गादेवी म्हणून सर्वांना हांका मारीत सुटला.

त्या लोकांना आयतेच सर्व सापडले. दुर्गादेवीला पकडावयाला ते दोघे देशी व्यापारी दचकले, कचरले व लाजेनें लांब गेले. ती बिचारी आपल्याला सूचना देत असतांही आपण ऐकलें नाही. आता उलट तिलाच वेडी म्हणून पकडण्याची त्यांना लाज वाटली. परंतु आपण

पसार होऊन दुसऱ्या एका बोहरी व जपानी व्यापाऱ्याला सांगून तिला त्या सर्वांच्याबरोबर पागलखान्यांत पोचविण्याची व्यवस्था केली.

मीही पण तावडतोब मोटार करून पागलखान्यांत आलों. तेथे पाहतों तों आमच्यापुढेच सर्व भाई लोकांना लॉरींत घालून आमच्या आधीच आणलें होतें.

मी पुढे होऊन सांगितलें की, हे लोक वेडे नाहीत, सबब आम्ही यांना ठेवून घ्यावयाला तयार नाही. शिवाय सरकार यांना फुकट पोसावयाला तयार नाही. माणशीं पंचवीस रुपयांप्रमाणे तीन महिन्यांचे पैसे प्रथम देत असाल तर ठेवूं. नाही तर साफ ठेवणार नाही. डॉक्टरांनी पण तसेंच सांगितलें.

हे लोक आग लावीत असतांना आम्ही पकडले आहेत. वाटेल तितके साक्षीदार आमच्याजवळ आहेत. व्यापारी म्हणूं लागले. आम्ही भाई लोकांच्याकडे पाहिलें तों ते चुपचाप बसले होते. पण वेडया-सारख्या मुक्याच्या खुणा मात्र करीत होते. अर्थातच ते वेडे नाहीत असें म्हणण्याची सोय राहिली नाही. तरी पण सर्वांचे तीन महिन्याचे आगाऊ पैसे घेऊन मग आम्ही त्यांना परत घेतलें.

अशा रीतीने आम्ही सुधारलेले म्हणून पाठविलेले सारे वेडे, एका दिवसाच्या आंत जसेच्या तसेच आमच्याकडे परत आले! फरक इतकाच की, पैसे मात्र त्यांच्याकरितां आम्ही घेऊं शकलों!

परंतु हे वेडे सोडल्याबद्दल सरकार व लोक या दोघांचाही टपका आमच्यावर आला.

# ८. पापग्रह मंत्रिमंडळ

मागील प्रकार घडल्यानंतर आठ दिवसांनी 'नारद' साप्ताहिकाने 'नवग्रह मंत्रिमंडळाचें राजकारण' या शीर्षकाचा एक खास अंक काढला. त्या दिवशीं रविवार होता. अमरपुरांत एक नवीनच दृश्य त्या दिवशीं दिसलें आणि तें म्हणजे ज्या रस्त्यांत पहाल त्या रस्त्यावर भाई काहुराने निर्माण केलेल्या पुण्यपथकांच्या स्वयंसेवकांनी नारद साप्ताहिकाने प्रसिद्ध केलेला 'नवग्रह मंत्रिमंडळाचें राजकारण' या खास अंकाच्या विक्रीचा सपाटा चालविला होता. अमरपुरांतील साऱ्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांनी पुण्यपथकाचे बिल्ले लावलेले दिसत होते. त्या सेवकांनी जणू काय ही मोहीमच काढली होती.

भाई काहुराला वेड लागल्यापासून, व तो पागलखान्यांत पडल्यापासून लोक पुण्यपथक संघटनेचें नांवही जवळजवळ विसरून गेले होते. आज एकाएकीं पुण्यपथकाचें पेव फुटलेलें पाहून लोक आश्चर्याने थक्कच झाले! जिकडे पहाल तिकडे भगवी टोपी आणि खाकी पँट व शर्ट या गणवेषाची गर्दी.

आधीच नारदपत्र टीकाकार साप्ताहिक म्हणून प्रसिद्ध होतें. त्यांतही ती टीका अधिकारारूढ नवग्रह मंत्रिमंडळाविरुद्ध. मग काय विचारतां! शत्रु व मित्र सर्वांनीच तो अंक विकत घेतला. एक दृश्य पुण्यपथकाचें आणि दुसरें दृश्य प्रत्येकाच्या हातांत दिसत असलेल्या साप्ताहिकाचें!

नारद साप्ताहिकाच्या मुखपृष्ठावर प्रत्यक्ष नारद हें पत्र आकाशांतून खाली फेकताहेत व लोक झेलताहेत हा एक देखावा असून दुसऱ्या देखाव्यांत, नवग्रहमंत्रिमंडळाचा वेडयाचा शिक्का, वाटेल त्याच्या कपाळाला चिकटवीत असलेले स्वराज्यांतील शुभ्र खादीच्या गणवेषांतील लष्करी आधिकारी दाखविले होते. आंतील पानावर, एका मोठया तुरुंगांत पहिले सर्वाधिकारी भारतनंदन, सवितादेवी, वीर सत्यशील आणि पागलखान्यांत पडलेले इतर सर्व भाई आणि वेडे मंत्री होते.

तिसऱ्या एका चित्रांत, साध्वींचा छळ या जाड शिर्षकाखाली, स्वातंत्र्य युद्धांतील प्रमुख सेनानी आणि हीन, दीन वेषांतील गृहदेवतांच्या कपाळावर वेडयाचे शिक्के चिकटवीत असलेल्या समाजसेविका होत्या. अशीं आणखीही नाना तऱ्हेचीं नवग्रह मंत्रिमंडळाच्या राजकारणावर प्रकाश पाडणारीं चित्रें होतीं. नवग्रह मंत्रिमंडळाचें राजकारण हा मुख्य अग्रलेख पुढीलप्रमाणे होता.

"यूरोपखंडांत यादवी सुरू होऊन सर्वच राजसत्ता हादरल्या' कित्येक तर रसातळाला जाऊन नामशेष झाल्या. उरलेल्या दुर्बळ झाल्या. नाईलाजाने इंग्रजांनाही असमर्थ परिस्थितींत भारताला स्वायत्त वसाहतीचें स्वराज्य देणें भाग झालें, अथवा स्वातंत्र्याकरितां जवळजवळ साठ वर्षे लढत असलेल्या कांग्रेसने आपला स्वराज्याचा जन्मसिद्ध हक्क बजावला. वडिलांची पुण्याई फळाला आली! एका अर्थी शांतींतूनच ही क्रांति झाली. अनेकांनी ह्या स्वराज्याच्या श्रेयाची वाटणी करून घेतली.

"पण राष्ट्राच्या शीलशुद्धीवाचून हें स्वराज्य आता पचेल कसें आणि राहील कसें हा गंभीर प्रश्न राष्ट्रापुढे आहे.

"स्वराज्याचें सुंदर शिखर समोर दिसूं लागतांच सत्तालोलुप, संधिसाधु राष्ट्रकार्याला जोराने सरसावले हें ठीकच झालें. १९३० नंतर

३२, ४०, ४१ सालीं गांधीयुगांत लोकप्रियता सवंग मिळूं लागली आणि जेल म्हणजे केवळ थारेपालट व प्रसिद्धि, नोकऱ्या, निवडणुकी, याकरितां दाखविण्यास एक दाखला होऊन बसला तेव्हाही अशाच देशभक्तीचा दर्या उफाळला होता. जेलजत्रेची भरमसाट भरती होत होती. परंतु थोर परीक्षक महात्मा गांधींनी सत्त्वाच्या सोन्याच्या नव्या नव्या कसोटया लावण्याला सुरवात करितांच नकली नाणें कवडीकिंमतीचें ठरलें.

"परंतु महत्त्वाकांक्षी धूर्त लोकांनी यापासून धडा घेतला. याचा अर्थ त्यांच्यांत ढोंगधत्तुरे कमी झाले असें नव्हे, तर लोकशाहीचें प्रधानतत्त्व जें बहुमत तें येनकेनप्रकारेण आपल्या काबूंत आणण्याचा त्यांनी कसून प्रयत्न केला. आणि जात्यांत घातले तरी सगळे गणंग एकत्र येऊन त्यांचे वजनदार गोटे झाले. शेवटीं तेच गोटे प्रत्यक्ष लोकशाहीचा कपाळमोक्ष करण्यास समर्थ झाले.

"शांतींतूनच क्रांती लाभल्याने जबाबदारीच्या जाणीवेपेक्षा कांही लोकांची भोगाची भूकच न भूतो न भविष्यति अशी वाढली.

"वास्तविक अनेक वर्षे स्वराज्याला पारखे झालेल्या भारतांत लायक माणसें हीं बोटावर मोजण्याइतकींच होतीं, व आहेत. देशसेवा हा परराज्यांत खुशीचा सवदा असल्याने सर्वसामान्य असा बहुजन-समाज आपला सुखाचा जीव दुःखांत लोटण्यास सहसा तयार होत नाही. मनुष्यस्वभावाला धरूनच या साऱ्या गोष्टी आहेत. मात्र याचा परिणाम निश्चयाने असा होतो की, खरीं राजकार्यधुरंधर अशीं दहा पांचच माणसें असून बाकीच्या देशभक्तांच्या जमावांत कांही भोळे भाबडे भक्त सोडले तर उरलेला सर्व भरणा हा संधिसाधू, धूर्त, स्वार्थी आणि महत्त्वाकांक्षी लोकांचाच असतो.

"१९३५ चा राज्यघटना कायदा हिंदुस्थानावर बळेंच लादला म्हणून कांग्रेसने निवडणुकी लढवावयाच्या असें ठरविलें. कांग्रेसने

एकमताने लढविलेल्या पहिल्या वहिल्या निवडणुकी अर्थातच अत्यंत चुरशीच्या व धामधुमीच्या झाल्या. परंतु त्यामध्ये खरे राष्ट्रनिष्ठ लोक अगदीच थोडे असून, संधिसाधु आणि झटपट रंगारी, खादी वेषाने बनलेल्या देशभक्तांचाच बहुतेक भरणा होता.

"परकीय सत्तेने स्वत:करितां पोसलेली हीन आणि देशद्रोही भांडवलशाही व बुद्धिशाही आता देशभक्तीच्या नव्या वेशभूषेने, समाजांत मिरवूं लागली. नव्या निवडणुकींत, राष्ट्रीय उमेदवार म्हणून उभे राहण्यास, जे लोक लायक ठरले ते म्हणजे, सट्टेबाजीने संपत्ति साठवलेले सरकारी नोकरींत देशद्रोह करून गब्बर झालेले, रावसाहेब, खांसाहेब, आणि सरकारी नोकरांची हाजी करून बहादूर ठरलेल्या लोकांचे ऐदी-नारायण वारस; तसेंच जहागिरदाऱ्या आणि जमीनदाऱ्या राखण्या-करितां ज्यांनी केवळ पापाचेच पुरुषार्थ करून दाखविले, आणि स्वार्था-करितां देशाचें सत्व बाजार भावाने विकून टाकलें असे सारे लोक, निवडणुकीला लागणारा पाण्यासारखा पैसा खर्च करूं शकतात म्हणून योग्य आणि लायक अधिकारी समजले गेले. उपरिनिर्दिष्ट लोकांत सर्वच असे होते असें मात्र नव्हे. बरीं वाईट माणसें सर्वत्र असतात, तसेच त्यांतही भले होतेच. ते बहुसंख्य नसल्याने निरुपयोगी झाले, इतकेंच सांगण्याचा हेतु.

"तिसरा वर्ग केवळ लबाडयांवरच उपजीविका चालविणारा बहुरूपी, किंवा गरजपुरता वाटेल तो पार्ट करणाऱ्या नाटक्यांचा, शीलभ्रष्ट नीतिनाशक लोकांचा होता. या पोटभरू लोकांना सत्य, तत्व, ध्येय, पंथ यांपैकी एकाचेंही बंधन नसल्याने हरकाम करण्यांत त्यांचा हातखंडा असतो. यांचा कोणीही उपयोग करून घेऊं शकतो. तसाच कांग्रेसनेही त्यांचा उपयोग करून घेतला व निवडणुकीचा बार उडाला.

"जाति, धर्म, पंथ, पक्षच काय परंतु लो. टिळक, म. गांधी, यांचीं नांवें व पोषाक, आणि प्रत्यक्ष ईश्वर अशीं सर्वांचींच भांडवलें करून

पुष्कळांनी आपलें नकली नाणें, बाजारभावांत पटवून दिलें व दक्षिणा-उपटल्या. इतकेंच नव्हे तर राष्ट्रीय पक्ष या सुंदर नांवाने आपल्या जाहिरातीही त्यांनी फडकावल्या. कोणताही पक्ष अधिकारारूढ असेपर्यंत, पैशाला मिळणारें हें राखीव सैन्यच होय.

" वरील तिघांच्या पासंगासही पुरणार नाही, अगदीच अल्प-संख्यांक, असा खरा देशभक्तांचा राजकार्यधुरंधुरांचा एक गट जरूर होता. परंतु अर्थातच यांचेंही नशीब बहुसंख्य लोकांच्याच हातांत असणार!

"त्या स्वार्थत्यागी आणि शीलवान लोकांना जनता जाणत होती, म्हणून पहिल्या प्रांतिक स्वायत्तेंत त्यांना त्यांचीं योग्य स्थानें देणें भागच होते. परंतु बहुसंख्य सत्ताभिलाषी लोकांना त्यांच्या सत्य, धर्म, शील, शिस्त, नीति आणि धर्म या गोष्टी जाचक होऊं लागल्या.

"बहुसंख्य स्वार्थी लोकांनी अर्थातच आपल्या मार्गातील हे काटे काढण्याकरितां, त्यांच्याविरुद्ध, देशद्रोहाचे, नालायकीचे, कट उभारून पाहिले; परंतु विस्तवाशी खेळ खेळल्याप्रमाणें, सत्यशील लोकांशींच कपटाचारण केल्याने त्यांचीं सर्व कारस्थानें व कपटनाटकें उघडकीला येऊन, त्यांची अब्रू धुळीस मिळाली.

या धड्यापासून धूर्त लोकांनी आणखी एक नवा धडा घेतला आणि सर्व स्वार्थी लोकांची एक लिमिटेड कंपनी बनविली. आणि वाटेल तीं कारस्थानें करून हुकमी बहुमत निर्माण केलें. या बहुसंख्य लोकांचा संबंध मात्र देशांतील खरी बहुसंख्य जी सामान्य जनता तिच्याशी काडीचाही नव्हता.

"त्यानंतर आणखी एका कपटनाटकाचा एक नवा प्रयोग सुरू करून स्वार्थाकरितां आड येणाऱ्या सज्जन लोकांच्या पीडा काढण्याचें ठरविलें. ती युक्ति म्हणजे, जीं जीं माणसें स्वार्थाआड येतील त्यांना वेडे ठरवून जगांतून उठविण्याचा प्रयत्न करावयाचा. प्रचारखातें निर्माण करून

जारीने प्रचार केल्यावर त्यांत यांना थोडेंबहुत यश मिळूं लागलें. कोणी त्यांचें दुष्कृत्य उघडकीस आणलें म्हणजे त्या माणसाविरुद्ध तो आजकाल भ्रमिष्ट झाला आहे, त्याचें डोकें फिरलें व तो म्हातारा झाला आहे, शिवाय बुद्धि कमी झाल्याने आमच्याबद्दल वाईट बोलतो, किंवा आजारी आहे वगैरे भुमका उठवून त्याच्याखालीं आपलीं काळीं कृत्यें लपविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

"प्रांतिक स्वायत्ततेच्या औट घटकेच्या राज्यांत स्वार्थी लिमिटेड कंपनीने याचे प्रयोग सुरू केले. परंतु पुन्हा म. गांधींनी कांग्रेसचे सर्वाधिकारी बनून शुद्धिसत्रांत कांहींना जेल, तर कांहींना दिल्ली असे मार्ग दाखविले. पुन्हा स्वराज्याचा दुसरा हप्ता म्हणजे मध्यवर्ती सत्ता व वसाहतीचें स्वराज्य मिळतांच मागील अर्धवट राहिलेला प्रयोग पुन्हा सुरू करून प्रत्यक्ष पागलखाने निर्माण करून सज्जनांना कोंडून आपल्या असुरी लालसा ते पूर्ण करीत आहेत, असें आमचें स्पष्ट मत आहे.

"नवग्रह मंत्रीमंडळाचें राजकारण तें हेंच! भारताचे पहिले सर्वाधिकारी अध्यक्ष भारतनंदन व तसेच दुसरे थोर लोक, भारतनंदनांच्या आठ प्रधानांतील कांही मंत्री यांना वेडे ठरवून, पागलखान्यांत म्हणजे कैदेंत टाकून आपण सुखाने असुरी लालसा पुऱ्या करूं अशी नवग्रह मंत्रिमंडळाची समजूत झाली आहे असें दिसतें. आपल्या दुष्ट कृतीने अल्पावधींतच नवग्रह मंत्रिमंडळ हें नांव त्यांनी कमावलें यावरून जनता त्यांना पुरी ओळखते हें त्यांनी समजून घ्यावें.

"नवग्रह किंवा पापग्रह मंत्रिमंडळाची देशसेवा पुढीलप्रमाणें आहे. अधिकारारूढ होतांच त्यांनी केलेलें पहिलें काम म्हणजे सर्व प्रांताप्रांतांत आपल्यासारख्या समान शीलाच्या दिखाऊ व नाटकी देशभक्तांना शोधून स्वार्थी लिमिटेड कंपनींत भागीदार करावयाचें. याकरितां एक मध्यवर्ती दौरा आखण्यांत आला होता.

"दौऱ्यामध्ये प्रांताप्रांतांतील लोकांनी, आपल्याला थैल्या, मानपत्रें द्याव्या म्हणून त्यांनी पगारी एजंट, आडते नेमून प्रचार करून मानपत्रें घेण्याचा सपाटा सुरू केला. शक्य होईल तेथे स्वतःचे पुतळे उभारणें, नांवाचे चीर बसविणें, फोटोचें उद्‌घाटन करणें, मोठमोठाल्या मिरवणुकी, मेजवान्या, पानसुपाऱ्या जनतेच्या खर्चानें घेणें हा त्यांचा महत्त्वाचा कार्यक्रम असे.

"सुंदर छापील मानपत्रें एक आण्यांत सुद्धा मिळावीं म्हणून खास सरकारी आश्रयाने एक कंपनीच स्थापिली होती. अर्थात् हा व्यवहार गुप्त! त्यांच्या स्मित हास्याचें, वाकड्या नजरेचे, नटवेपणाचे फोटो देशी परदेशी पत्रांत नित्य येण्याच्या योजना आखल्या असून फोटोग्राफर त्यांच्याबरोबरच असतो. त्यांच्या गुणवर्णनपर काव्यें व वर्णनें लिहिण्याकरितां, चरित्रें प्रसिद्ध करण्याकरितां बेकार वकील, कवी व कादंबरीकार पोटाला लावले होते.

"यथा राजा तथा प्रजा या न्यायाने मध्यवर्ती अखिल भारतीय मंत्रिमंडळाच्या या दौऱ्याप्रमाणेंच प्रांतपति, जिल्हापति, तालुकापति व सर्कलपति आपले आपले दौरे आखून खेड्यांतील दौऱ्यांच्याकरितां तर मानपत्राचे वाचकही दौऱ्याबरोबरच सरकारी खर्चानें नेत. कारण तीं तयार मानपत्रें, खेडुतांना योग्य रीतीनें वाचतां येत नसत. आपण होऊन हे सर्व प्रकार करणारांना वशिल्याच्या नोकऱ्या, बोर्डांतून नॉमिनेशनें, पदव्या मिळवणें, सुलभ होई म्हणून खर्च, व झीज सोसून नगरवासी व खेडुतही हे समारंभ करीत असत. प्रांतातर्फे, जिल्ह्यातर्फे, तालुक्यातर्फे इतकेंच नव्हे तर, पेठा आणि कुटुंबातर्फेही मानपत्रें देण्यांत येत आहेत. हें सर्व करणारे लोक, देशाचा, लोकसभेचा गौरव करितात म्हणून त्या लोकांच्या चांगूलपणाची, त्यागाची, देशभक्तीची, तारीफ होण्याची राष्ट्रीय पत्रांमधून व्यवस्था होई.

"प्रतिपक्षावर टीका करण्याकरितां, सज्जनांना व थोरांना बदनाम करण्याकरितां बेछूट, पैशाकरितां व भोगाकरितां शीलही विकण्यास तयार असणारे स्त्रीपुरुष हातांत धरून त्यांना संपादक बनवून हें कार्य केलें जाई.

"स्त्रीसुधारणा करण्याकरितां, व देशांत प्रजा जास्त वाढूं नये म्हणून महिलामंडळें स्थापिलीं असून त्यांच्यातर्फे संततिनियमनाचा जोराचा प्रचार करण्यात येत आहे. घटस्फोटाचा कायदा पास झालाच आहे. मुदतीच्या लग्नाची सुधारणा सुरू आहे. याप्रमाणे पापग्रह मंडळाचें राजकारण किंवा राष्ट्रकार्य सुरू आहे.

"पहिल्या अष्टप्रधानमंडळाने तयार केलेल्या राष्ट्रसंवर्धनाच्या मोठाल्या योजना दोषास्पद म्हणून रद्द ठरविल्या आहेत, व नवीन आपल्या बापाच्या योजना तयार करण्याकरितां कमिटया नेमल्या आहेत.

"स्वराज्यसंग्रामाच्या मंथनामधून महत्त्वाकांक्षेची ही मादक दारू प्रथम निघाली. ती पिऊन मत्त होउन कांही मानवराक्षसांनी मानपान, पैसा व विषयवासना या गोष्टी तृप्त करण्याकरितां आपल्या सुपीक मेंदूतून या योजना बाहेर काढल्या आहेत.

"जनताजनार्दनाला करावयाचा हा डाव कांहीअंशीं सफल झाला असें म्हणावें लागेल. परंतु ही राक्षसीमहत्वाकांक्षा नाटकाच्या रात्रींइतकीच अल्पकाल टिकेल हें नवग्रह मंत्रिमंडळाला आम्ही बजावूं इच्छितों.

"सध्या इतकेंच पुरें. जनताजनार्दनाच्या ईश्वरी न्यायासनापुढे अपराधी लोकांना लौकरच जाब द्यावा लागेल."

# १. दडपशाहीचा वरवंटा

मागील प्रकरणांत नारद साप्ताहिकाने नवग्रह मंत्रिमंडळाचें राजकारण हा खास अंक प्रसिद्ध करून त्याचा किती प्रचंड प्रचार केला यासंबंधीं मी लिहिलेंच आहे. त्याचा परिणाम जो व्हावयाचा तोच झाला. कणिकनीतीने चालणारी कोणतीही राजसत्ता दाखविलेल्या दोषांचीं कारणें किंवा स्पष्टीकरणें कधीच देत नसत नाही. कारण कारणें नसतातच. कपट किंवा दडपशाही दोनच दोन त्यांचे मार्ग!

अशा लोकांना कणिकनीति पाठच असते. आपल्या देशांतील कणिकनीतीसारखीच पाश्चात्यांमधील मॅकीव्हेलीचीं राजनीतिसूत्रेंही मंत्रिमंडळाने पचविलीं होतीं. "लोकांच्या प्रीतीपेक्षा लोकांवर दरारा असणेंच अधिक सुरक्षित. कारण सामान्यत: लोक हे कृतघ्न, चंचल, खोटे, भ्याड आणि लोभी असतात. ज्यांवर त्यांचें प्रेम असतें त्यांचें नुकसान करण्याची लोकांना दिक्कत वाटत नाही. पण ज्यांना ते भितात त्यांच्या मात्र ते कधीही वाटेला जात नाहीत." ही मॅकीव्हेलीची नीतीच पापग्रह मंत्रिमंडळाला अधिक खरी वाटली. नारद साप्ताहिकांतील टीका वाचून नवग्रह मंत्रिमंडळ खळबळून गेलें. लोकांतही प्रचंड खळबळ उडाली होती. ती नष्ट करणें जरूरच होतें.

लागलीच नारद साप्ताहिकावर जप्ति वारंट नेऊन, त्याचीं पाळें मुळें खणून व संपादकाला राजद्रोहाच्या कलमाखाली ताबडतोब सात

वर्षांची शिक्षा देऊन, सर्वत्र दरारा बसविण्याकरितां मुद्रणकायदा जारी केला. प्रत्येक कॉलेजांत गुप्तपत्रकें जाऊन पुण्यपथकाच्या सभासदाला जबर दंड, कॉलेजमधून हद्दपारी, या शिक्षा जारी करण्यास कळविण्यांत आलें. आणि सर्वत्र सी. आय. डी. खातें पसरविण्यांत आलें. कोणतीही राजसत्ता आपल्याविरूद्ध जाणारांना असेंच शासन करतें हें उघडच आहे.

परंतु आरोपांना योग्य उत्तर न देतांच जेव्हा दडपशाही करण्यांत येते तेव्हा ती राजसत्ता पूर्णपणें अन्यायी आणि अपराधी आहे. याचा हा तिचा कबुलीजबाबच होय. जनताही ही गोष्ट तात्काळ समजते. असल्या राजसत्तेबद्दल लोकांत अनादर अप्रीति, चीड येणें या स्वाभाविक क्रिया घडतात. परंतु त्याबरोबरच सज्जनांनाही गिळून टाकणारी ही महाभयंकर राजसत्ता आहे असा दुष्टांचा दराराही पण त्याबरोबरच निर्माण होतो.

सामान्य लोक असल्या अन्यायी राक्षसाचें निवारण करण्यास असमर्थ होतात. त्यांना तें शासन करणें शक्यच नसतें. त्यांच्या जीवनाचीच फिकीर त्यांना येऊन पडते. मग अशा स्थितींत त्यांना आदर वाटणाऱ्या लोकांच्याकरितां त्यांना कांही करतां येत नाही. याबद्दल त्या जनतेला दोष देणें योग्य होणार नाही.

ज्यांना थोर कार्याकरितां आणि महान तत्वांच्याकरितां अन्याय व कष्ट सहन करावे लागतात त्यांना साहाजिकच असें वाटतें की, ज्या जनतेकरितां मी हें सारें करितों तिला त्याचें कांहीच वाटूं नये का !

संघशक्ति हें एकच सामान्य लोकांचें किंवा सर्वसाधारण जनतेचें बळ होय. तें बळ निर्माण करण्यालाही एखादा नेता लागतोच. तेंच महान कार्य, नवभारतातील नव्या पिढीने, म्हणजे भाई काहुराने व इतर भाईंनी अंगावर घेतलें. हें भावी आशेचें सुचिन्हच होतें.

नवग्रह मंत्रिमंडळाने ही गोष्ट ओळखली होती, आणि म्हणूनच जेथे संशय येईल तेथे भाई लोकांना पकडण्याची त्यांनी पराकाष्टा चालविली.

दुसरें नवें राजकारण जें मंत्रिमंडळाने हातांत घेतलें, तें म्हणजे सरसहा आपल्या राक्षसीमहत्वाकांक्षेच्या आड येणाऱ्यांना वाटेल त्या अमंगल मार्गाने बदनाम करणें. कोणी देशद्रोही, तर कोणी राजद्रोही, आणि अनितीमान असे आरोप ठेवून वारंवार वर्तमानपत्रांत, मासिकांत प्रचार करणें व त्यांना न्यायाच्या कोर्टांत खेचून त्रास देणें.

अत्यंत थोर, विद्वान, शीलवान व सज्जन माणसांच्याकरितां मात्र हे उपाय त्यांना अपुरेच पडले व म्हणून श्रेष्ठतम माणसांना वेडे ठरवून त्यांच्याबद्दल वरून मोठी सहानुभूति दाखवून आंतून मात्र नाश करण्याच्या युक्त्या ते लढवीत असत.

पांडवांना लाक्षागृहांत जाळून टाकण्याचें कारस्थान करून, वरून ते जळून मेल्याबद्दल शोक करून दाखविणारा धृतराष्ट्र आणि दुर्योधन यांनाच त्यांनी गुरु केलें होतें.

अन्याय स्वदेशी असला तरी त्याचा नाशच केला पाहिजे. तो करणाऱ्याला शासन केलेंच पाहिजे, ही वृत्ति तरुण भारतांत जागृत झाली. जेथे ही वृत्ति नसेल तेथे ती उत्पन्न केली पाहिजे असा मीही पण कृतनिश्चय केला.

सत्कृत्याच्या केवळ निश्चयानेसुद्धा मनाला किती उच्चतम आनंदाची प्राप्ति होते याचा अनुभव मी त्या रात्रीं निजतांना घेतला.

# १०. कुसंगतीचें फळ

त्या दिवशीं डॉक्टर सर्व दिवसभर अत्यंत उदास दिसले. कांही फार मोठा मनःताप त्यांना होत आहे असें मला भासलें. म्हणून मी रात्रीं जेवण झाल्यावर त्यांच्या घरीं गेलों तों ते आपल्या कचेरीच्या खोलींत एकटेच सचिंत असे दिव्यापुढे बसले होते.

" डॉक्टर आज सकाळपासून तुम्हाला कांही होत आहे कां ! " खोलींत जातांच मी प्रश्न केला.

" अरे, केव्हा आलांत तुम्ही! या, बसा." मी खुर्चीवर बसतांच ते म्हणाले.

" होय खरें आहे चित्रगुप्त, मला आज बिलकुल बरें वाटत नाही. कारण ज्याला कुसंगतीचें फळ म्हणून म्हणतात तें मी आज भोगतों आहें. पण आज ही शिक्षा मला असहनीय झाली आहे. मी तुम्हाला आपण होऊन हें सर्व सांगणारच होतों, आणि तुमच्यावाचून माझें हें दुःख सांगावयाला दुसरी जागा तरी कोठे आहे चित्रगुप्त !

" तुम्हाला माहितच आहे की पागलखान्याच्या खर्चाची चिंता मला रात्रंदिवस, प्रतिक्षणाला जाळीत आहे. याकरितां मी काल पंत-प्रधान आणि आरोग्यमंत्री यांना भेटून प्रांताच्याकडून येणारा पैसा जमेस धरून सुद्धा खर्चाची तोंडमिळवणी होत नाही. आता काट-कसरीला जागा नाही. वगैरे सर्व खरें आहे तें सांगितलें.

"त्यावर त्या निर्दयांनी असें उत्तर दिलें की, 'ज्या मेंदूची आता जगाला कांही गरज नाही, त्यांच्याकरितां जास्त पैसा खर्च करणें म्हणजे ही प्रजेच्या पैशाची उधळपट्टी आहे. म्हणून केवळ जीव जगण्यापुरतेंच अन्न देत जा त्यांना! नाही तर तिकिटें लावून त्यांच्या अभागी जीवनाचें प्रदर्शन करा. मी सुद्धा पाहण्यास येईन. नाही तरी सर्व जनतेसमोर, राजकारणाच्या ऐवजी, पोथ्यापुराणें वाचीत बसलेले, मला एकदां त्यांना पाहण्याची फार इच्छा आहे.

"उठल्या बसल्या सत्य अहिंसेची मीमांसा आणि शीलाचें महत्त्व बडबडत बसून दुसऱ्याच्या सुखाच्या आड येणारांना आज आमच्या दयाधर्मावर जगावें लागत आहे, हें पाहून एक वेळ डोळ्याचें पारणें फेडण्यास आम्ही फार उत्सुक आहोंत. मरेतोंपर्यंत आता हिंदु धर्म, आर्यांची संस्कृति, देवराष्ट्राची नीति वगैरे मनपसंत राजनीतीचा काथ्याकूट करीत बसा म्हणावें!

"हें पहा डॉक्टर, आमचें म्हणणें तुम्हाला पटलेलें तुमच्या चेहऱ्या- वरून मला दिसत नाही. म्हणून तुम्ही म्हणाल तर भारतनंदन, त्या चढेल सवितादेवी आणि सुमित्रादेवी व ते समतेचे व मानवतेचे वेड डोक्यांत घेतलेले सर्व उद्दाम भाई आमची माफी मागून लिहून देत असतील, आणि आमच्या राजकारणांत धर्मनीतीची लुडबुड न करितां आपल्या घरीं सुखाने खाऊन आमचा पुरस्कार आणि जयजयकार करण्यास तयार असतील तर त्यांना आम्ही क्षमा करण्यास व सोडण्यास अजूनही तयार आहों.

"त्यांची योग्यता व लोकांतील वजन याची आम्हाला जाणीव आणि गरज आहे. आमच्याबद्दल चार भले शब्द बोलण्यास व लिहि- ण्यास ते तयार असतील तर आमची बदनामी किती तरी पटीने कमी होणार आहे. पहा प्रयत्न करून! वेडया वाचकांचा प्रश्न हा राज- कारणाच्या दृष्टीने अगदीच गौण असून ती खर्चाची बाब अगदी गौण

आहे. ज्या स्थितींत त्यांना तेथे ठेवणारे त्यांचे नातेवाईक पैसा देतील तसेंच त्यांना राहिलें पाहिजे. ती व्यक्तिविषयक बाब आहे.' इतकें बोलून हीही करून ते विकट हसले!

"माझ्याच्याने ते शब्द ऐकवेनात! मी संतापून निघून आलों. पण आता पुढे काय! त्यांच्या खास परवानगीवाचून एकाही माणसाला बरा झाला या सबबीवर सोडण्याची आपल्याला परवानगी नाही. म्हणजे आपला पागलखाना हा राजबंदींचा जेल आहे.

"काटकसरीच्या नांवाखाली थोर, निरपराधी व देशाचा मौल्यवान खजीना अशा जीवांना, उपाशी ठेवून, हालहाल करून, मारण्याचा या असुरांचा पक्का निश्चय झाला आहे. हा केवढा निर्वाणीचा प्रसंग त्यांनी आपल्यावर आणला आहे सांगा!

"मला सगळयांत जें वाईट वाटत आहे तें त्या हतभागिनी स्त्रियांच्याबद्दल! आपल्या स्वैराचाराकरितां, त्या बिचाऱ्यांचा छळ छळ करून या कर्म चांडाळांनी खरोखरच त्यांना कायमचें वेडें केलें. त्यांची व त्यांच्या पोराबाळांची ताटातूट करून दुसऱ्यांच्या दयेशिवाय साधें जीवन जगण्यासही त्या बिचाऱ्या निष्पाप साध्वी असमर्थ आहेत."

बोलतां बोलतां डॉक्टरांचा कंठ भरून येऊन, डोळे पाण्याने काठोकाठ भरले.

सदैव आनंदी, शांत आणि गंभीर डॉक्टरांना इतके शोकाकुल आणि डोळयांत अश्रु आलेले, निराश असे आज प्रथमच मी पाहिलें. पैशाकरितां कांही मार्ग शोधून काढा असें पुन्हा ते म्हणाले. मला त्यांचें कपट कारस्थान उघड होतांच जर मी या नोकरीचा राजीनामा दिला असता तर मला या यातना झाल्या नसत्या. परंतु एकाच विचाराने वारंवार मी राजीनाम्यापासून परावृत्त झालों आणि तो म्हणजे पैसा देऊन उलटया काळजाचे वाटेल तितके लोक या कामाकरितां हे दैत्य मिळवूं शकतील ही माझी खात्री होती व मग या थोरांच्या

हालाला सीमा राहिली नसती! तथापि कितीही चांगल्या हेतूने मी या कामावर राहिलों असलों तरी कुसंगतीचें फळ मला भोवल्यावाचून कसें सुटणार!

डॉक्टरांची ही सारी चिंता साधार होती. परंतु हें सर्व ऐकत असतां मी निश्चयपूर्वक एका निर्णयाला येऊन पोचलों व डॉक्टरांना म्हणालों, "डॉक्टर, मला वाटतें क्रांतीचा क्षण जवळ जवळ येत चालला आहे. फक्त तो क्षण एखाद्या मंगल मुहूर्ताचीच काय तो वाट पहात असावा. मला आणि तुम्हालाच काय परंतु प्रत्यक्ष ईश्वरालासुद्धा ही स्वार्थी निर्दयता, आणि हा सज्जनांचा छळ असह्य झाला आहे. म्हणूनच आपसांतील यादवीने सर्व युरोपिअन राष्ट्रें भराभर दुराचाराने आमहत्या करीत आहेत.

"ईश्वरी न्यायदानाचा नियोजित दिवस नजीकच असावा अशी मला मनोमन साक्ष वाटते. उशीर काय तो आपण उभे राहण्याचा आहे. बंडाचीं निशाणें रोवलीं गेलीं आहेत. परंतु तुम्ही नी मी आणि असेच असंख्य चिरडले जाणारे लोक वीर वृत्तीने सर्व अन्यायाचा आणि अनीतीचा शेवट करण्याच्या निश्चयाने रणांगणांत उभे राहिले पाहिजेत इतकाच उशीर आहे. ईश्वरी इशारा झाला आहे. मग आपणाकडून विलंब नको.

"भाई काहुराने व आझादाने पुण्यपथकाची तयारी जवळजवळ पूर्ण करीत आणली आहे.

"स्वातंत्र्य युद्ध परकीयांशीं पुकारलें होतें. स्वजनांशीं कसें लढावें याचें उत्तर श्रीकृष्णाने गीतेच्या अठराव्या अध्यायांत सांगितलें. स्वजन किंवा परजन असोत ते मानवतेचे वैरी असतील तर त्यांचा नाश करणें हें शूरांचें कर्तव्य होय. हेंच त्याचें सार!

"डॉक्टर क्षमा करा! पण पैशाची सोय करून आपण कोणाही दीन अनाथाचें किंवा सज्जनाचें रक्षण करूं शकणार नाही काय? तेव्हा

दुष्टवृत्ति मानवराक्षसच त्याकरितां नाहीसे करावे लागतील."

"चित्रगुप्त तुमच्यासारखा मानसशास्त्राचा प्रोफेसरही जर असा भावनेच्या भरांत भरमसाट विधानें करूं लागला तर मग या प्रश्नाचा शक्यतेला धरून आणखी कोण विचार करूं शकेल हेंच मला समजत नाही. एका सर्वसत्ताधारी पक्षाला केवळ नाहीसें करावें म्हटलें की, ती गोष्ट शक्य कोटींत येईल असें समजणें, राजकारणावर व्याख्यानें देणें नव्हे, असें म्हणावेसें मला वाटतें? राग मानूं नका." डॉक्टर म्हणाले.

"डॉक्टर! तुम्ही चिडलां आहांत, त्रस्त झालां आहांत, आणि एक सरकारी नोकर आहांत. त्या दृष्टीने तुमचें म्हणणें कांही अंशीं खरें आहे हें मी कबूल करितों. परंतु तें सर्वथा खरें नाही. मी मानसशास्त्राचा अभ्यासू आहे, हेंही खरें. परंतु डॉक्टर मानसशास्त्राच्या अभ्यासूने केवळ मनाचें शास्त्रच सांगावयाचें असेल तर हा विषय अभ्यासांतून आजीबात गाळलेला काय वाईट?" असें मी विचारलें.

मी पुढे म्हणालों, "माझें तर असें म्हणणें आहे की, कोणत्याही विषयाचा अभ्यास म्हणजे पृथःकरण करणें, छेदन करणें व गुणधर्म सांगणें ही त्या विषयाची केवळ प्राथमिक ओळख होय. त्याचें विषयप्रवेशापलिकडे महत्त्व नाही.

"मानसशास्त्रज्ञांचें खरें काम म्हणजे मानसशास्त्रज्ञाने मानवाच्या मानस मंदिरांतील प्रचंड दिव्यशक्ति कोणच्या, त्या कशा उपयोगांत आणावयाच्या आणि कशा प्राप्त करून घ्यावयाच्या हें सांगितलें पाहिजे. हा माझा अधिकार आणि कर्तव्य मला पार पाडलें पाहिजे.

"डॉक्टर, मी तुम्हाला विश्वास देतों, नव्हे हमी घेतों की ज्यांचा लढा सत्याकरितां आहे, न्यायाकरितां आहे आणि सज्जनांचें रक्षण करण्याकरितां आहे, त्यांचा विजय निश्चित आहे, त्याबद्दल कोणाला कचरण्याचें, शंका घेण्याचें, किंवा विचार करण्याचें कारण

ाही, इतकें आत्मसामर्थ्य, सत्याच्या व न्यायाच्या कैवाऱ्याजवळ
सतेंच मुळीं. हाच माझा मानसशास्त्राचा शोध किंवा जगाला
शेकवावयाचा संदेश होय.

"दुसरा प्रश्न प्रतिपक्षाच्या बलाबलाचा होय. त्याचाही अंदाज
ी काढला आहे. कारण आमचें नवग्रह मंत्रिमंडळ हें पापग्रह
ंत्रिमंडळ आहे असें लोक उघड उघड बोलूं लागले आहेत. त्यांनी
ुप्त पोलिसांच्या देशभर पसरलेल्या अफाट जाळ्याचा हा उघड अर्थ
ाहे की, त्यांच्या हृदयांत भीतीने धडकी भरली आहे.

"जर या प्रचंड सामर्थ्याच्या बळावर इंग्रज साम्राज्याशीं लढ-
यास आणि ती असुरशाही उलथून पाडण्यास आम्ही समर्थ ठरलों
ार, ह्या नीच, भित्र्या आणि सुखलोलुप मंत्रिमंडळाला पदभ्रष्ट
करण्यास आम्ही तितकेच समर्थ आहोंत.

"जेव्हा आम्हाला पराजय येतो तेव्हा आमच्या शीलामध्येच
ांही तरी घोटाळा झाला आहे हें आम्ही ओळखलें पाहिजे. आणि म्हणून
ामच्या राष्ट्राचे थोर पुढारी, आणि मुत्सद्दी म. गांधी, वारंवार कांग्रेस-
ध्ये शुद्धीचे प्रयोग करीत असतात. ज्या राष्ट्राजवळ प्रभु श्रीकृष्णा-
ारखा सद्गुरु आहे त्या राष्ट्रांतील कोणालाही दुःखाचे आणि आपत्तीचे
ोंडे गळ्यांत बांधून आत्महत्या करण्याचें हॅम्लेटसारखें कारण नाही.

"म्हणून डॉक्टर तुम्ही आता ही चिंता सोडा व आता निजा.
ाई काहुराच्या पुण्यपथकाची जवळ जवळ सर्व तयारी झाली आहे.
ेकरच तुम्हाला कळेल."

# ११. माझी मुलाखत

इतकें दिवस एका शांत जागीं कॉलेजांतील मुलांना एक तासभर व्याख्यान देऊन फार मोठें काम झालें असें वाटणारा मी अन्यायाची तिडीक असह्य झाल्यामुळे काल डाक्टरांच्याजवळ एखाद्या वीराप्रमाणें बोलून तर गेलों. परंतु मंत्रिमंडळ बदलणें ही कांही सहज गोष्ट नव्हे, ही गोष्ट जबाबदारीचा विचार करितांच मनाला जाचूं लागली. त्यांतून मार्ग काढण्याकरितां म्हणून मी आज सर्वाधिकारी भारतनंदन, सविता-देवी, वीर सत्यशील व भाई काहूर यांच्याजवळ विचारविनिमय करावयाचें ठरविलें. त्याप्रमाणें पागलखान्यांतील त्यांच्या निवासांत गेलों.

आतापर्यंत या मध्यवर्ती अष्टप्रधानमंडळांत मी कधी फारसा मिसळलों नव्हतों. मोठया माणसांच्या संबंधीं जो स्वाभाविक संकोच व भीति असते ती मला या वरच्या तीन मंडळीच्या बद्दल वाटत असे. वास्तविक तसें पाहिलें तर हीं तीन्ही माणसें अत्यंत खुल्या मनाचीं होतीं. मोठेपणाचा किंवा अभिमानाचा लेशही त्यांच्या ठिकाणीं नव्हता. परंतु आपण होऊन मात्र ते आमच्यांत येऊन मिसळत नसत. वेळ प्रसंग पडेल तेव्हा डॉक्टर त्यांच्याशीं पुष्कळ बोलत बसत परंतु मी काम होतांच निघून जात असें.

भाई काहुर व इतर भाई, दुर्गादेवी, वगैरे लोकांचा त्यांच्याशीं पुष्कळ वेळां विचारविनिमय होई. कांही प्रांताचे मंत्रीही त्यांच्याकडे

मधून मधून जात असत. बहुतेक वेळां जेव्हा जेव्हा पाहणीच्या निमित्ताने मला त्यांच्या तिघांच्या निवासांत जाण्याचा प्रसंग येई तेव्हा तेव्हा, हे तिघेही लोक कांही तरी गंभीरपणें लिहितांना आढळत. त्यांना लागणारीं पुस्तकें आम्ही पुरवीत होतों. त्यावरून त्या तिघांचाही कांही तरी गंभीर विषय असावेत असें मला वाटे व म्हणून कामापेक्षा जास्त वेळ घेण्याचें मी कधी धैर्य केलें नाही. आजचाच हा पहिला दिवस होता.

पहिल्या प्रथम, वीर सत्यशील, सवितादेवी, भाई काहुर व आपण अशा सर्वांशीं कांही विचारविनिमय करण्याची माझी इच्छा मी त्यांना कळविली. त्यांनी परवानगी देतांच मी त्या तिघांना बोलावलें.

सर्व बसल्यावर भारतनंदनांनी सुरवात केली, "काय विचारावयाचें आहे! कराना सुरवात! आज कांही नवलविशेष घडलें वाटतें!" स्मितपूर्वक ते म्हणाले.

मी नम्रपणें मंत्रिमंडळाचा तो उदास निरोप, नारद साप्ताहिकाचा तो खास अंक, त्याचा प्रचार, त्यानंतरची दडपशाही व इतर सर्व हकीगत सांगितली. आणि नंतर हें मंत्रिमंडळ उलथून टाकण्याचाच यावर आता एकमेव उपाय असल्याचें सांगितलें. या बाबतींत आपलें मार्गदर्शन आणि सल्ला आम्हाला पाहिजे हा भेटीचा मुख्य हेतूही कळविला.

"असं! म्हणजे आता आम्हा वेडयांच्या पासून एक शहाणें मंत्रिमंडळ उडवून लावायला तुम्ही शिकणार असेंच की नाही! आणि या उद्योगांत आमच्याप्रमाणेंच वेडें होऊन पडण्याचा प्रसंग आला तर?" जरासें हसून भारतनंदनांनीं विचारलें.

"मनाची सर्व तयारी केली आहे. सर्व प्रकारच्या त्यागाला आणि भोगाला जमेस धरूनच हा निश्चय ठरविला आहे." मी म्हणालों.

भारतनंदन म्हणाले, "ठीक! पण यासंबंधीं तुम्ही केलेली तयारी व त्याकरितां लागणारे संघटन यासंबंधीं काय व्यवस्था केली आहे ती तर कांहीच सांगितली नाहीत!"

मी म्हणालों, "भाई काहुरांनी व दुर्गादेवींनी आपणांस सर्व सांगितलें असें मला कळलें म्हणून त्याकरितां जास्त वेळ घेतला नाही. आणि आपली संमती मिळाल्यावाचून आम्हीही निश्चित तयारी करावी तरी कशी ?"

भारतनंदन म्हणाले, "भाई काहुराने व दुर्गादेवीने माझी परवानगी मिळवण्याचें कार्य आता तुमच्यावर सोपविलेलें दिसतें आहे. कसें काय काहुर! मी बरोबर ताडलेंना."

वास्तविक मी विचारलें, हा योगायोग होता. तरी पण त्यांचा तर्कही बरोबर होता. काहुर कांही न बोलतां हसला. कारण त्याच्या प्रयत्नाला पोषक अशीच माझी ही मागणी होती,

भारतनंदन नंतर म्हणाले, "असं पहा चित्रगुप्त! तुमची आणि भाई काहुराची योजना अमलांत येणें फारसें कठीण नाही. कदाचित तुम्ही ठरविलेल्या त्या विशिष्ट दिवशीं तो प्रयोग तुम्ही करूंही शकाल आणि तो प्रयोग फसल्यास सर्व प्रकारच्या आपत्तीला तोंड देण्याची तुमची तयारी पण आहे, हें सारें ठीक.

"परंतु ही जरी प्रत्यक्ष राज्यक्रांति नसली तरीही देशाच्या मध्यवर्ती सत्तेची ही उलथापालथ आहे. सर्व प्रांत म्हणजेच अखिल भारतांतील जनतेचा याच्याशीं संबंध आहे; जनता स्थिर राहील. तुम्ही करणाऱ्या उलथापालथीशीं अधिकारलोभ, राज्यलोभ यासारख्या क्षुद्र भावना नाहीत ना, तुम्ही केलें तें जनतेच्या हिताकरितांच केलें अशी जनतेची खात्री पटविण्यासारखे भरभक्कम पुरावे तुमच्याजवळ आहेत काय?

"दुसरी महत्त्वाची गोष्ट आजचें प्रधानमंडळ तुम्ही समजतां तसें खरेंच अपराधी आहे, यासंबंधींचे प्रत्यक्ष कागदोपत्री पुरावे, असें कांही साधन की ज्यामुळे किंवा जें दाखविलें असतां जनतेची खात्री पटेल असें कांही साधन तुमच्याजवळ आहे काय! जनता त्यांना चहात नाही. नवग्रह मंत्रिमंडळ म्हणते, व करवाढीबद्दल कुरकुर करते असल्या लहानसाहान गोष्टीवर जाऊं नका.

"मुत्सद्यांचें खरें चांगलें किंवा खरें वाईट यापासून सामान्य जनता दहाकोस दूर असते प्रत्यक्ष मदतीच्या दृष्टीने जनतेचा तुम्हाला कांही उपयोग नसतो तसाच प्रत्यक्ष त्रासही नसतो. परंतु असल्या मोठ्या कृत्याला जनतेच्या संमतीची अवश्य जरूर असते. जनतेचें न्यायालय हें पवित्र असतें. तेथे समतोल धारवाडी काट्याने योग्य आणि खरा न्याय मिळाला पाहिजे. तेव्हा तुम्ही ज्यांना अपराधी म्हणणार किंवा ठरविणार त्यांच्याविरुद्ध ते खरोखर अपराधी आहेत अशा संबंधीं, जनतेच्या न्यायाधीशासमोर मांडण्यासारखे, घोर अपराध व त्यांची यादी या गोष्टी तुमच्याजवळ आहेत काय !

"तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे आपली आंतरराष्ट्रीय परिस्थिति. याच्या इतकें महत्व कशालाच नाही. ज्या यूरोपांतील यादवीमुळे, तुम्ही हें स्वराज्य मिळवूं शकलांत तें तुमच्याकडे—आतासुद्धा कायमचें तुमच्याकडे—असावें अशी इंग्रजांची मनःस्थिति झाली असेल अशी तुमची कल्पना असेल तर ती अगदी चूक आहे. जरा संधि मिळतांच ते काय किंवा जर्मनी, जपान, रशिया आणि अमेरिकासारखे अनेक बोके टपून बसले आहेत हें तुम्ही सतत ध्यानांत ठेऊन वागावयाला पाहिजे. जवळ जवळ दोन शतकें तुमच्या रक्ताची इंग्रजांना चटक लागली आहे, हें विसरूं नका. अहो त्यांचीं भुतेंसुद्धा तुम्हाला येऊन छळतील याद राखा. अशा परिस्थितींत आपल्या मध्यवर्ती सत्तेचा खेळखंडोबा करणें हें उचित होणार नाही. मग त्यामध्ये आमच्यासारखे हजारो जीव पागलखान्यांत दुःख भोगीत पडले तरी हरकत नाही. त्याकरितां काहुर सांगतो आहे त्याप्रमाणांत तुमची लष्करी सत्ता तुम्हाला अनुकूल आहे की नाही याची फार कसून खात्री करून घ्या. लष्करी खात्रीसंबंधी वीर सत्यशीलच सारें सांगण्यास आधिकारी आहेत आणि म्हणून मी या बाबतींत त्यांनाच प्रश्न विचारण्यास सांगतों."

इतकें म्हणून भारतनंदन स्वस्थ बसले. अणुं दुसऱ्यांना

बोलण्याला त्यांनी ती संधि दिली. थोर लोक असेच उदार असतात असें माझ्या मनांत आलें.

एका अर्थी माझ्यासारख्या प्रोफेसराला हे राजकारणी मुत्सद्याचे प्रश्न घाबरून टाकण्यासारखेच होते. तरी पण, हे प्रश्न विचारणाऱ्या भारतनंदनांच्या दक्षता, धोरण, औदार्य, मुद्देसूदपणा विचारीपणा इत्यादि गुणांबद्दल त्यांच्याविषयीच्या माझ्या प्रेमांत, विश्वासांत आणि आदरांत कितीतरी पटीने भर पडली.

वीर सत्यशील यांच्याकडे अष्टप्रधानमंडळांत लष्करी खातें होतें हें मला माहित होतें. परंतु त्यांच्याबद्दल त्यांच्या हाताखालील मुख्य लष्करी अधिकारी सेनापति धर्मपालसींग की जे १९१४ व १९४१ या दोन्हीही महायुद्धांत, ब्रिटिशांच्या शत्रूंना जेरीस आणून हमखास विजयी होणाऱ्या हिंदी सैनापतींमध्ये प्रमुख होते त्यांना आणि सर्व लष्करी खात्यांत, वीर सत्यशीलांच्या बद्दल, किती उच्च दर्जाचें प्रेम, विश्वास आणि आदर होता याचा मी या कारस्थानामध्ये प्रत्यक्ष अनुभवच घेतल्याने त्यांच्याबद्दल माझें अंतःकरण आदराने आणि प्रेमाने जणु वाहून जात असे. ते आता बोलणार म्हणून मी विनम्रपणें, त्यांच्याकडे पाहूं लागलों.

वीर सत्यशील हे स्वभावतःच ऐटदार आणि दुसऱ्यावर रुबाब पाडणारे होते. त्यांनीच सुरवात केली.

वीर सत्यशील म्हणाले, "जरूर पडल्यास एखाद्या ठिकाणाहून लष्करी मदत विश्वासाने मिळेल अशी कांही खटपट आपण केली आहे काय? केली असल्यास तुमच्या इशाऱ्याबरोबर बंदोबस्त करील असा एखादा लष्करी अधिकारी व तुम्ही मित्र आहांत काय? आणि त्याबद्दल तुमची खात्री आहे काय? तुम्ही त्याच्याबद्दल कांही अंदाज बांधले आहेत काय?"

या वेळीं मी घाबरलों नाही. कारण अशीच कांही तयारी माझ्या-जवळ होती. मी माझ्या कोटांतून एक लहानशी डबी काढली. ती बंदच

होती. मी उठून ती वीर सत्यशील यांच्या हातांत देत म्हणालों. "लष्करी अधिकारी धर्मपालसिंग यांच्याशीं माझी मैत्री आहे. प्रस्तुत विषयाच्या बाबतींत मी त्यांच्याशीं अनेकवेळां विचारविनिमय केला. काल भाई काहुराचें व माझें बोलणें झाल्यावर आमचा पक्का निश्चय त्यांना कळविला. त्यांनी मला ही डबी फक्त आपल्याजवळ देण्यास सांगितलें आहे." इतकें बोलून मी स्वस्थ राहिलों.

वीर सत्यशील यांनी डबी हातांत घेतली मात्र, आश्चर्य, आनंद आणि विश्वास हे तिन्हीही भाव एकदम जणूं त्यांच्या डोळ्यांनी व चेहऱ्यावर उमटलेल्या कांही रंगांनी व्यक्त केले. माझ्याकडे पाहून ते एकदम उद्गारले, " शाबास !"

हे शब्द उच्चारीत असतांनाच त्यांनी ती डबी उघडून आंतील वस्तुही पाहिली व त्यांनी जणूं संशयातीत झालों अशी मुद्रा केली.

"ठीक आहे. याहून जास्त कांही विचारण्याची मला गरज नाही" ते म्हणाले.

एक मोठें काम झाल्याने त्यांतही ज्या व्यक्तीबद्दल माझ्या मनांत नितांत आदर आहे त्या व्यक्तीकडून शाबासकी मिळाल्यामुळे मला जणु मूठभर मांस आलें आणि मी कांही मोठा पराक्रम केला असें वाटलें. वास्तविक ती वस्तु म्हणजे एक खुणेची आंगठी होती. ती मला मिळण्याचें कारण वीर सत्यशील यांचें थोर चारित्र्य हेंच होय. पण, अशी माझी मनोमन साक्ष असतांना माझा गर्व आपलीच लुडबुड करूं लागला. हाच तो मनुष्यस्वभाव.

ज्यांच्या सल्ल्याची मला गरज वाटत होती, तें तिसरें माणूस म्हणजे पूज्य सवितादेवी. यांच्याकडे मी थोर तपस्विनीपेक्षांही मातृत्व-भावानेच जास्त बघत असें. त्या जरी मितभाषी, गंभीर आणि थोर वाटत असत तरीही त्यांचे सुनेत्र हे नेहमी पावित्र्य आणि मातृभाव यांनीच सदैव भरलेले असत. मात्र त्या न्यायनिष्ठुर माता असाव्यात असा माझ्या मनावर त्यांचा परिणाम झाला होता.

"सवितादेवी आता तुमची पाळी आहे. तुम्हाला कांही विचारा वयाचें असल्यास आणि सूचना द्यावयाच्या असल्यास विचारा."

भाई काहुर, दुर्गादेवी आणि मी तिघांनी एकाच वेळीं सविता· देवीकडे पाहिलें. त्याही हसून म्हणाल्या, "चित्रगुप्त सत्याकरितां आणि न्यायाकरितां इतकें सोसण्यास तयार झाल्यावर आपण त्यांना मदत केलीच पाहिजे. आणि म्हणून, नवे सर्वाधिकारी, इंद्रसेन, मधुभाष व त्यांचे इतर सहकारी यांच्या शीलभ्रष्टतेसंबंधीं आणि लाचलुचपतीसंबंधीं माझ्या खात्याकडे आलेल्या तक्रारी, आणि त्यानंतर गुप्त पोलिसांनी केलेली चौकशी यासंबंधीं, नंबरासहित सरकारी कागदपत्राच्या नकला मी स्मरणाने बहुतेक बरोबर लिहून काढल्या आहेत. आणि त्या सर्व वर्तमान मंत्र्यांचे अपराध सिद्ध करण्यास पुरेशा आहेत. हें लिखाण मी जनतेची खात्री करण्याकरितां, आणि मध्यवर्ती कायदेमंडळापुढे मांड· ण्याकरितां त्यांच्या स्वाधीन करण्यास तयार आहे."

भाई काहूर आनंदाने आणि घाईने म्हणाला, "सवितादेवी अगदी आमच्या मनाप्रमाणेंच करतील अशी माझी खात्री होती."

"मातृप्रेमाला शोभेसेंच त्यांनी केलें." माझ्या मुखांतून शब्द बाहेर पडले.

जवळ जवळ माझ्या प्रश्नाचीं सर्वच महत्त्वाचीं उत्तरें तुम्ही दिल्यासारखींच आहेत.

ठीक आहे. परंतु आज रात्रभर विचार करून उद्यां निश्चित काय तें सांगेन.

झालें. इतक्या उत्तम तऱ्हेनें माझी मुलाखत व काम होईल याची मला थोडीही कल्पना नव्हती. आता ईश्वरालाच हें कार्य लौकर होण्याची घाई वाटत आहे; म्हणून हें सर्व जमून येत आहे; असें मला वाटलें व आनंदाने आम्ही सर्व उठलों.

# १२. लोकमत

मी मोठ्या आनंदाने, सर्वाधिकारी व इतर सर्वांचा माझ्या कल्पनेला पूर्ण पाठिंबा आहे हें सांगण्याकरितां, थोडयाशा विजयी अभिमानानेच, डॉक्टरांच्याकडे गेलों होतों. परंतु एखाद्या वेळीं कल्पनेच्या बाहेरच माणसाचा हिरमोड होतो म्हणतात तें कांही खोटें नाही.

मी गेलों त्यावेळीं डॉक्टर कालच्याच दुःखित चेहऱ्याने बसले होते. मी कांही बोलण्याच्या पूर्वीच माझ्यापुढे कांही कागद टाकीत म्हणाले, हें घ्या, कुसंगतीचें आणखी फळ! तुमचा आणि माझा दोघांचाही बळी घेतला त्या दुष्टांनी शेवटीं!"

"तें राहूं द्या. मी आधी तुम्हाला आनंदाची बातमी सांगतों!" मी म्हणालों.

"छेः छेः, तें आधी वाचा! मग दुसरं काय असेल तें आनंदाचें ऐकूं."

हें आनंदाचें वर्तमान ऐकण्याइतकी डाक्टरांची मनःस्थिति सध्या नसल्याने, त्यांनी हातांत दिलेले कागद मी मुकाट्याने घेऊन, ते वाचण्याकरितां परत घरीं निघून गेलों.

घरीं येऊन पाहतों तों दुसरें तिसरें कांहीच नसून, गांवांतील लोक पागलखान्यासंबंधीं काय बोलत असतात तें नीट ऐकून, परत आम्हास कळविण्यासाठी जो माणूस नेमला होता, त्याने पाठविलेला रिपोर्ट होता.

रिपोर्टर आपल्या रिपोर्टांत म्हणतो—

"पूज्य डॉक्टर!

स. न. वि. वि. आजकाल गावांत पागलखाना व तुम्ही म्हणजे डॉक्टर आणि नवग्रह मंत्रिमंडळ यांच्यासंबंधीं, भयंकर आणि चमत्कारिक बातम्यांचें जणु पेवच फुटलें आहे. प्रत्येक ठिकाणीं ऐकलेले मासले मुद्दाम तुमच्या अवलोकनार्थ पाठवीत आहें.

"सामान्य माणसें : 'काय हो! नवभारत पागलखाना तुम्ही कधी पाहिला आहे का? तेथे म्हणे शहाणीं माणसेंच वेडीं केलीं आहेत!' दुसरा, 'होय, साऱ्या गावभर या बातम्या फुटल्या आहेत ह्या! तेथे कोणी दोन डॉक्टर आहेत ना त्यांचेंच म्हणे हें कृत्य! बेकारी असली म्हणून काय झालं हो! दुसऱ्याला वेडं करून आपलं पोट भरावं का माणसानी! चांगलीं औषधें देऊन लोकांना बरें करण्याऐवजी त्यांना तसेंच वेडं करून ठेवणारे हे का डॉक्टर, की राक्षस! काय म्हणावें तरी काय ह्या प्रकाराला? आपण तर आता ठरवलंच, जीव गेला तरी बेहेत्तर पण डॉक्टरांचा उंबरठा म्हणून चढावयाचा नाही. करतां काय त्यांनी वेडं ठरवलं म्हणजे?'

"वकिलांची बाररूम : 'काय हो जसानी, नवभारत पागलखान्या-संबंधीं लोकांत भयंकर खळबळ माजली आहे! तें म्हणे एक भयंकर राजकीय गूढ आहे. वेडयांच्या ऐवजी देशांतील अत्यंत शहाणे आणि थोर लोकच तेथे ठेवण्यांत आले आहेत; आणि म्हणूनच मला वाटतें अगदी नातेवाईकांनासुद्धा त्यांच्या भेटी सरसहा मिळत नाहीत.'

"श्री. आगे, 'असं कां! पण फुकट जेवावयला तर घालतात ना? मग आम्हालाही घेऊन चला म्हणावं तेथे. म्हणजे या पक्षकारांची वाट पहावयाला तरी नको.'

"कामा : 'मी तर असें ऐकतों की, त्या गूढाच्या मुळाशीं ते दोघे डॉक्टर आहेत. त्या दोघांच्यावरच वारंट काढा म्हणजे बरेंच काम

मिळेल आपल्याला. त्या प्रकरणांत नवग्रह मंत्रिमंडळाचें कारस्थान आहे. त्याचा अर्थ, आपण थोडें डोकें चालवलें तर पैशाचे ते आपले नऊ झरेच आहेत असें समजा. ते आमच्या विलासपुरचे हे म्हणत होते कीं, प्रत्यक्ष मंत्रि होण्यापेक्षाही मंत्र्यांच्यावर तोहमती आणणें हेंच जास्त फायदेशीर असतें. पुष्कळ राजकारणी लोकांचा हाच एक जीवनाचा धंदा असतो. मागे प्रांतिक स्वायत्ततेंत जबलपुरकरच्या साईडचे पुष्कळ लोक यावरच सावरले म्हणतात. बाकी सर्वत्रच असे लोक पुष्कळ असतात म्हणा.'

"कॉलेज वसतीगृह : श्री. देव, 'भाई धर्माधिकारी! नवभारत पागलखान्यासंबंधीं नित्य विलक्षण बातम्या बाहेर पडत आहेत. नवग्रह मंत्रिमंडळाचा तो राजकीय तुरुंग आहे म्हणतात. पण हें जर खरें असेल, तर आपण या गोष्टीची उपेक्षा करितां उपयोग नाही. स्वराज्यांतील या विषवल्ली असल्यामुळे त्या वेळींच उपटल्या पाहिजेत. गोष्ट तर उघड दिसत आहे, की भाई काहूर, नारद, आझाद, ती दुर्गादेवी, यांना बरे झाले म्हणून सोडून दिल्यानंतर, लागलीच पुनः पागलखान्यांत नेण्यांत आलें, याचा अर्थ काय? यांत कांही तरी गूढ खास आहे!'

"शीलमीत्र, 'हा एक राजकीय कट वाटतो! आणि ते दोघे डॉक्टरही त्यांत सामील असले पाहिजेत. दोनच कां! प्रथम इतक्या लोकांना वेडे असल्याबद्दलचीं सर्टिफिकेटें, दाखले देणारे आणखीही कित्येक डॉक्टर या कटांत असले पाहिजेत.'

"राममन्दिरांत पुराणानंतर : तुकाराम बुवा, 'काय हो शास्त्रीबुवा, मी असें ऐकतों की, जे खरे देशभक्त आहेत त्यांनाच पागलखान्यांत कोंडलें आहे म्हणे नवग्रह मंत्रिमंडळाने. मला वाटतें की, या संकटनिवारणार्थ आपण कांही जप वगैरे सुरू करावा. कारण देशभक्तांवर तेथील डॉक्टर फार अन्याय करताहेत म्हणे.'

"शास्त्रीबुवा, 'ठीक आहे, करूं या. मला सारा शीलभ्रष्ट, धर्महीन लोकांचा स्वार्थाचा डाव दिसत आहे. दुष्टांच्या हातीं राजसत्ता जाणें यासारखें पाप दुसरें नाही. यांत सर्वाला कारण लोभ.'

"पेन्शनर : 'तुम्ही म्हणतां हें खरें आहे. अहो, एका जुन्या राष्ट्र-भक्ताने केवळ आपल्या परममित्राला मंत्रिपद देण्याकरितां, एका प्रांताच्या पंतप्रधानाला वेड लावल्याचें याच प्रकरणांत मला नक्की माहीत आहे. तुम्हाला ठाऊक नाही इतकेंच काय तें. फार मोठालीं रहस्यें या पागलखान्यांत दडलीं आहेत.

"नागपूरच्या एका वकीलाने म्हणे एका भोळ्या सावकाराची सारी इस्टेटच वकील फीकरितां दिली असें लिहून घेतलें. व त्याला अन्नाला मोताद केलें. तो सावकार अन्न अन्न करीत दारोदार जातो व ही सारी हकीगत सांगतो. हें वकीलाला कळतांच, वकीलाने सावकार वेडा असून, त्याने आपल्या जवळच्या चाळीस हजारच्या नोटा पूर आलेल्या ओढ्यांत टाकल्या. असें सर्वत्र जाहीर केलें.

"दुसरें उदाहरण त्या 'नवमतवाद' मासिकाच्या संपादकांचें पहा कसें आहे तें : छापखान्यांत उपसंपादिका म्हणून नोकर ठेवलेल्या एका छटेल, रंगेल व शिकलेल्या पोरीशीं स्वैराचार करून, नंतर पाप उघडकीला येण्याच्या भीतीने तिच्याशीं लग्न केलें. व पहिल्या बायकोला वेडी ठरवून पागलखान्यांत पोचविलें. येवढयाकरितांच त्यांनी आधी कांही दिवस 'नवमतवाद' या नांवाचें मासिक काढलें होतें.'

"विठोबा मास्तर म्हणाले, 'सगळयांत त्या देवशास्त्री धर्म-भास्कराची कशी विचित्र गोष्ट आहे पहा! एका विधवेला शास्त्राधार दाखवून तुझ्याशीं मी पुनर्विवाह करितों असें खोटेंच सांगून त्याने तिला फसविलें आणि ती गरोदर राहिल्यानंतर तिलाच रखेली म्हणून राहण्यास सांगू लागला. परंतु तिने ती गोष्ट संतापाने बाहेर फोडतांच, ही वेडी

घराजवळ नेहमी त्रास देते असें सांगून, तिच्या वेडाबद्दल दोन डॉक्टरांचे दाखले घेतले आणि बिचारीला पागलखान्यांत पाठवून दिलें.'

"वाती करीत असलेल्या लक्ष्मीबाई म्हणाल्या, 'काय हो शास्त्रीबोवा, एकंदरींत हा नवा काळ मोठाच कठीण आहे म्हणावयाचा. बायकांना चांगले दिवस आले म्हणतात तर तें कांही खरें नाही दिसत! कोणीही स्वैराचाराला आळा घालूं लागला की, तो आपला वेडा ठरून पागलखान्यांत जाण्याचें त्याच्या नशीबी आलेंच. कसा भयंकर नी भयप्रद काल आहे हा!—'

" 'यापेक्षा पूर्वीचे आमचे पुरुष दोन चार लग्नें करीत नाही तर बाहेर जात. पण बायकांना वेडें करून जगांतून तरी उठवीत नसत. घरमालकीण म्हणून तरी ती बिचारी घरांत राहूं शके.'

"पुराणिक म्हणाले, 'खरें आहे तुमचें म्हणणें. काळ वाईटच आला आहे.'

"पार्वतीबाई म्हणाल्या, 'अगदी आमच्या घराजवळची गोष्ट बघा, सांगतें तुम्हाला! तुम्हाला सुद्धा माहित असेल की, ती हरिभटांची नात एक तोतरे बोलते हाच काय तो तिचा दोष! म्हणून आजोबांनी सगळं घरदार शेवटीं तिलाच द्यावयाचें म्हणून लिहून ठेवलें. त्याचा मुलगा म्हणजे मुलीचा प्रत्यक्ष बाप, पण तो बिचारा अगदीच साधा मनुष्य. एक गोरागोमटा, हुशार मुलगा तिला करावयाला तयार झाला म्हणून मोठ्या हौसेने आईबापांनी लग्न केलें. आम्हांलासुद्धा वाटलं की, चांगलं मिळालं मुलीला घर! पण दोन महिन्यांच्या आंत त्यांनी आपलं त्या सासूसासऱ्यांच्याकडून आपल्या नांवाने बक्षीसपत्र करून घेतलं. मुलीने नवरा म्हणून संमतीची सही केली.

" 'झालें! जावयाचें काम साधलें. लागलीच त्यांनी आपलें सासू, सासरा आणि बायको या तिघांना पांस्लेड करून आणि वेडें ठरवून

पागलखान्यांत पाठवून मोकळा झाला! तिथे त्यांना खावयाला आणि कपडेसुद्धा तो पुरते देत नाही म्हणे. पण त्या पागलखान्याचे डॉक्टरही पागल असतात का हो! तो असा कसा चांगल्या शहाण्यासुरत्या लोकांना वेडे म्हणून ठेवून घेतो!"

अशाच प्रकारचा सर्व रीपोर्ट असल्याने मी मग पुढें जास्त न वाचतांच ठेवून दिला. कारण लोक बोलत होते तें सर्व खरेंच होतें.

डॉक्टरांना लोक बोलतात म्हणून वाईट वाटणें साहाजिकच होतें. कारण आम्ही आमच्याकडून रात्रंदिवस ह्या अभागी वेडयांच्या-करितां झटत होतों. तरीपण ईश्वरावाचून हें सारें जाणण्यास सध्या तरी कोणीही समर्थ नव्हतें.

लोकांच्या दृष्टीने डॉक्टर अश्विनीकुमार आणि मी दोघेच समोर दिसणारे अपराधी होतों. अशा चमत्कारिक गोष्टी लोक बोलतात यांत त्यांचा कांहीच दोष नव्हता. तथापि लोकांना खरे अपराधी लौकरच दिसतील या कल्पनेने मी समाधान मानून घेतलें. डॉक्टरांना सर्व कांही उल्हासाने सांगावयाचें, ही माझी मनःस्थिति मात्र आता पूर्ण मावळली.

'नारद' साप्ताहिकाचा अंक निघाल्यासून नवग्रह मंत्रिमंडळ चांगलेंच हादरलें होतें, असें म्हणावयाला हरकत नाही. कारण 'नारदा'चा खास अंक संपादकाने, सर्वच प्रांतभाषेंत छापून एकाच वेळीं, एकाच तारखेला गावोगावीं विकण्याची व्यवस्था केली होती. त्यामुळे सर्व हिंदु-स्थानभर त्याचा पुरा गवगवा झाला. तो झाकण्याकरितां, मंत्रिमंडळाने सरकारीपत्रकें काढून "हे सारे आरोप बनावट आहेत. केवळ द्वेषबुद्धीने केले आहेत. आम्ही जनतेची खात्री करून देण्यास तयार आहोत" वगैरे मजकूर घालून सर्व भागांत, सर्व प्रांतांत तीं प्रसिद्ध केलीं.

त्याशिवाय सर्वत्र, मुख्य प्रधान स्वतः सभा घेऊन सरकारचा निरापराधीपणा जीव तोडून लोकांना सांगूं लागले. अमरपुरांत तर, सकाळीं, दुपारीं, रात्रीं तिन्ही त्रिकाळ सभा होऊं लागल्या. पेठा, मोहल्ले व बाजार सर्वत्र सभाच सभा.

कांही सभांतून लोकांनी धीटपणाने विचारलें की, "पागलखान्यांत ठेवलेले, जनतेचे आवडते सर्वाधिकारी व मंत्रि आता जनतेला दाखविल्यावाचून जनता यापुढे विश्वास ठेवण्यास तयार नाही."

उद्योगमंत्रि मधुभाष बोलत होते. त्यांनी उत्तर दिलें, "जरूर! एक दिवस जाहीर सभेंत त्यांना तुम्हाला दाखविण्यांत येईल मग तर झालें ना?"

यावर लोकांना गप्प बसणें भागच होतें. पुनः मधुभाषांचें मधुर, भाषण सुरू झालें. मग त्यांनी आत्मनिवेदनास सुरवात केली. बहुधा ते नेहमी राष्ट्रभाषेंतच बोलत असत. वक्तृत्वाची कला त्यांना चांगली अवगत होती असेंच म्हणावें लागेल. मधुभाष म्हणाले, "पागल बनलेल्या आमच्या परममित्रांबद्दल, प्रजाजन हो! आमचीं हृदयें रात्रंदिवस किती दुःखी आहेत याची तुम्हाला कशी कल्पना असणार! बंधु भगिनींनो! आपले थोर सर्वाधिकारी आणि दुसरे मंत्रि, सवितादेवी, वीर सत्यशील, भाई काहूर आणि दुर्गादेवी याना तुम्ही कधीकाळीं एखादवेळ समारंभांत किंवा सभांत पहात असाल; परंतु त्यांच्या वेडामुळे, आमच्यावर पडलेला जबाबदारीचा भार किती मोठा आहे, त्याच्या भाराखाली आमचा कसा चक्काचूर झाला आहे, हें हृदयविदारक दृश्य तुम्ही पाहूं शकणार नाहीं!

"आपले थोर सर्वाधिकारी व इतर सर्व वेडे हे लोक किती प्रेमळ, किती कर्तव्यदक्ष, किती मोठे मुत्सद्दी आणि परम देशभक्त आहेत याची अनुभूति आमच्यासारख्या त्यांच्या परम मित्रांच्या व सहका-

त्यांच्यावाचून इतरांना येणें शक्य नाही. आम्हाला त्यांच्यावाचून कामही सुचत नाही."

लगेच त्यांचा कंठ रुद्ध झाला. खिशांतील हातरुमाल काढून त्यांनी डोळ्याला लावला. एक ना दोन, वेडयांच्या आणि त्यांच्या प्रेमाचीं जितकीं म्हणून प्रतीकें हावभावांनी, स्वरांत बदल करून, कृति करून दाखवितां येणें शक्य होतीं तितकीं दाखविलीं. शेवटीं "अशा आमच्या मन:स्थितींत जनतेने आमच्याबद्दल संशय व्यक्त करून आमच्या दु:खावर डागण्या दिल्या आहेत. यापेक्षा उद्याच आम्ही आपले राजीनामे जनतेला सादर करावेत असाच मी विचार करीत आहें." इतकें बोलून ते थांबले.

शंका घेणाऱ्यांना सुद्धा वाटलें की आपण चुकलों. इतक्यांत एका बाजूने आवाज आला. "आम्ही चुकलों, आपलीं मनें दुखविलीं. आम्ही माफी मागण्यास तयार आहों परंतु तुम्ही राजिनामे देतां उपयोगी नाही. क्षमेचें वचन द्या." म्हणून पांचपन्नास मंडळी उभी राहिली.

"जनतेच्या सेवकाला जनतेची आज्ञा मानण्यावाचून गतीच नाही. मान्य जनतेला सत्य गोष्ट दिसून आली व आमच्यावर त्यांनी विश्वास व्यक्त केल्याबद्दल सरकार फार आभारी आहे." टाळ्यांचा प्रचंड गजर!

टाळ्या वाजविणें, शब्द परत घेणें, आणखी बोला म्हणणारे हे सर्व तयार केलेले लोक असत इतकें सांगितलें म्हणजे पुरे.

* * * *

राक्षसांच्या मायावी रूपांसंबंधीं आपण जसें पुराणांत ऐकतों तसाच हा प्रकार होता.

देशप्रेमाचें बाह्य चिन्ह म्हणजे, शुभ्र खादीचा पोषाक, प्रेमाने भरलेली भाषा बोलणें व बोलवणें. ही सारी राक्षसांची मायावी रूपेंच नव्हेत तर काय!

वर्तमानपत्रांतून दुसऱ्यांच्या नांवाने कुटील विषयुक्त लिखाण स्वतःच लिहिणें, किंवा लिहून घेणें, हीं त्यांचीं ढोंगी रूपेंच होत.

वर्तमानपत्री प्रचार म्हणजे आधुनिक कालांतील सहस्रमुखी रावणच होत. त्याच्या आंत त्यांचें दडलेलें काळें अंतःकरण अगदी पारदर्शक असें दिसत असतें.

पूतना, सुंदर स्त्रीच्या रूपाने मुलें मारी. रावणाने गोसावीरूपाने सीतेला चोरली. मोहरमांत वाघाचीं सोंगें मुलांना फसवतात. नाटकांतील दारुडा नट, गंगातीरीं ऋषीचें सोंग घेऊन पवित्र गंगाजल पिऊन तपस्या करितो असें दाखवितो. बेकार नट नाटकांत राजा बनून प्रजा-पालन करितो; रोज दहांचें सेवन करणारी सिनेमा तारका, एकनाथाच्या धर्मपत्नीचें सोंग करिते, त्याप्रमाणें, आमचें नवग्रह मंत्रिमंडळ प्रजाहित-दक्ष राजाचा अधिकार स्वीकारून किसान कैवारी, राष्ट्रसेवक, वगैरे नांवें घेऊन जनतेची दिशाभूल करून आपला स्वार्थ निष्कंटक चालावा म्हणून कपटाने चांगल्या लोकांना वेडे ठरवून आपला स्वार्थ चालवीत होते.

राक्षसांचीं मायावी रूपें म्हणतात तीं हींच.

# १३. पहिले सर्वाधिकारी

जनतेचें अभिजात प्रेम कसें असतें, ही प्रत्यक्ष अनुभवण्याची गोष्ट होय! लोकमान्य टिळक, म. गांधी, जवाहरलालजी, विवेकानंद, अरविंद, हिंदुराष्ट्रपति सावरकर असे लोक सभेंत आले म्हणजे तें दिसतें. भगतसिंह, जितेंद्र, चाफेकर बंधु यांच्या स्मरणाने शुद्धतम प्रेमाच्या भावनांचा जनतेलाही एकांतांत अनुभव मिळतो. मर्यादापुरुष राम, आणि पूर्णावतार श्रीकृष्ण, सीता-सावित्री यांच्या प्रेमाने जग सदैव भरलेलेंच आहे, तरी या लोकांच्या विशिष्ट उत्सवप्रसंगीं एक क्षणभर परमोच्च दिव्य सात्विक प्रेमाचा जो अनुभव मिळतो तो अनुपम आणि न सांगतां येणारा आहे. आषाढी-कार्तिकीला भक्तगणांच्या प्रेमाने भरलेली पंढरी जो कोणी पाहील त्याला तो स्वर्गसुखाचा सोहळा लाभेल.

पहिले दिवशीं स्वतंत्रभारताचे पहिले सर्वाधिकारी भारतनंदन यांचें दर्शन व भाषण जाहीर झालें होतें. सुरवातीचा सकाळीं आठ वाजतां हा कार्यक्रम ठरला होता. तरीही हजारों लोक बरोबर वेळेला हजर झाले. त्यांचें स्वागत करण्याकरितां लोकांनी मोठाले हारतुरेही बरोबर आणले होते. लोकांमध्ये त्यांच्याबद्दलचें आदर व प्रेम तशा प्रकारचें होतें. त्यांना पाहण्याविषयीं लोकांची अधीरता प्रतिक्षणाला वाढत होती. त्या असंख्य लोकांचे जीव जणू जनतेच्या नेत्रांतून बाहेर पडून भारतनंदन शोधूं लागले.

बरोबर आठाला सर्वाधिकारी तयार केलेल्या स्टेजवर एखाद्या योगेश्वराप्रमाणें स्टेजच्या मागील दरवाजाने आले. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला! नुकतीच त्यांची पूजा जप वगैरे आटपून ते आलेले दिसले. कारण कपाळावर भस्माचे पट्टे ओढलेले दिसत होते. पायांत खडावा, शुभ्र साधें धोतर आणि अंगावर एक उपरणें असा साधाच त्यांचा वेष होता. लोकांनी त्यांना उत्थान दिलें व वन्देमातरम् म्हणून त्यांच्या अंगावर गुलाब मोगऱ्याचीं सुवासिक पुष्पें उधळलीं.

भारतनंदनांनी हसत मुखाने तें स्वागत स्वीकारलें. व आपणही सर्वत्र वाटोळें फिरून सर्वांना नमस्ते केलें. भारतनंदनांची शांतदांत, गोरी व तेज:पुंज मूर्ति पाहून लोकांना आनंद आणि शांत वाटलें. त्यांच्या तपस्येचें त्यांच्या चेहऱ्याभोवतीं एक प्रकारचें वलयच होतें. त्यांनी देशाकरितां सोसलेलें खडतर जीवन, तारुण्यापासूनच त्यांच्यांत बाणलेली सन्यस्त वृत्ति व त्याग आणि त्यांनी केलेलीं अनंत सत्कृत्यें हीं त्यांना पाहतांच लोकांच्यासमोर उभीं राहिलीं. व एक प्रकारें त्यांना आणि लोकांनाही परस्पर गहिंवर आला. जणु काय एखाद्या प्रिय सुहृदाचीच ती भेट लोकांना वाटली.

उलटया काळजाच्या मंत्रिमंडळाला मात्र तो प्रेमसोहळा पाहून अगदी बेचैन झालें. त्याच्या उलट मंत्रिमंडळ आणि ते सारे अधिकारी पाहून भारतनंदनांनी त्या सर्वांना अगदी शुद्ध भावाने नमस्ते करून कसें काय, बरें आहेना म्हणून विचारपूस केली. सज्जनांचे मार्ग सदैव थोर आणि औदर्याचेच असतात म्हणतात ते असे.

तें पाहून आपोआपच जनतेच्या व आपल्या त्या सर्वश्रेष्ठ पुढाऱ्याला व वरिष्ठाला पहिल्या रांगेत बसलेल्या सर्वांनी जरा लवूनच अभिवादन केलें.

त्यानंतर भारतनंदनांनी आपल्या भाषणाला सुरवात केली. ते म्हणाले, "बांधव हो! पुष्कळ दिवसांनी आपणा सर्वांना पाहण्याचा

मिळाल्याने मनाला अत्यंत प्रसन्नता वाटत आहे. बंधुभगिनींनो, पूज्य वंदनीय म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरू सर्व कुशल आहेत ना! त्यांना माझें अभिवादन आपण कळवाल ना! आपल्या स्वराज्याची घडी, नवीनच बसत असल्याने आणि सर्व समाजाची पुनर्घटनाच आपल्याला करावयाची असल्याने, तुम्हाला फार श्रम पडत असतील नाही कां?

"लोकसत्ताक राज्यघटनेचा कांहीसा नवाच असा हा प्रयोग आपण करीत आहांत, तो करीत असतांना भारतीय आणि प्रांतीय अष्टप्रधानांना व सर्वाधिकाऱ्यांना जनतेचा पूर्ण सहकार मिळत आहे ना! त्याचप्रमाणें देशांतील सर्व मंत्रिमंडळें, हीं आपली जबाबदारी ओळखून जात, धर्म, पंथ व पक्ष वगैरे कोणत्याही गोष्टी मनांत न धरितां जनतेशीं पूर्ण समरस होऊन, न्यायाने, धर्माने आणि प्रेमानेच व्यवहार करीत आहेत ना! पाऊसपाणी ठीक पडून शेतकरी, सुखी आणि शेती सुधारण्याची खटपट करीत आहेत ना!"

लोक चित्रासारखे शांतपणें, भारतनंदनांचें भाषण ऐकत होतें. परंतु जेव्हां मंत्रिमंडळाचा उल्लेख झाला तेव्हा जणु उत्तर द्या! अशा भावाने लोकांनी नवग्रह मंत्रिमंडळाकडे अर्थपूर्ण नजरेने पाहिलें. याबरोबर मंत्रि आधोवदन झाले.

सर्वाधिकारी पुढे म्हणाले, "मित्रहो, हें नवें राजकारण करीत असतांना आणि ईश्वरदत्त अशा जन्मसिद्ध स्वराज्याचा उपभोग घेत असतांना, तुम्ही कधी गाफील किंवा अदक्ष नाही ना राहात! कर्तव्यमग्न सात्विक आनंदाचा लाभ तुम्हाला होतोना!

"या सनातन देशाच्या दैवी संस्कृतीचें रक्षण, आचरण आणि वर्धन तुम्ही कृतज्ञतापूर्वक करीत आहांत ना! दैवी आणि परमोच्च संस्कृति, श्रेष्ठतम तपोधन, सत्यअहिंसेचीं महान् तत्त्वें, ऐहिक आणि पारलौकिक स्वातंत्र्याचें दिव्यमय आणि उत्तुंग ध्येय व आपला शुभ आशीर्वाद

आपल्या पूज्य पूर्वजांनी नव्या पिढीकरितां ठेविला आहे. त्याचा स्वाभिमानपूर्वक आदराने, हक्काने आणि प्रेमाने तुम्ही उपयोग करून घेत आहांत ना!

"कर्तृत्वाच्या आयुष्याचें नवें आणि पहिलें पाऊल आपण टाकीत आहोंत. अशा वेळीं आपणांत परस्पर ऐक्य, विश्वास व प्रेम या जरूर असलेल्या गोष्टी पूर्णत्वाने आपणांत वास करीत आहेत ना! ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध, समाजनेते, धर्मवेत्ते या सर्वांच्या बाबतींत तुमचा कृतज्ञताभाव आहे ना!"

"आपल्यांतील आपसांतील यादवीने, द्वेषाने, मत्सराने येणाऱ्या पारतंत्र्याचा कटु अनुभव आपण दीर्घकाल घेतला त्याचा विसर नाही ना तुम्हाला कधी पडत! इंग्रजी राज्यांत दुभत्या जनावरांचे जे खाटिकखाने चालले होते, ते बंद करण्याच्या आपल्या योजना तुम्ही आता पूर्णपणें अमलांत आणल्या असतीलच. राष्ट्राचें आरोग्य नीट असून लोक सुखी आहेत ना!

"आपलें वैमानिक दल, लष्कर, परराष्ट्रीय संबंध, व्यापारी करार, स्वदेशी उद्योगधंदे, शेतकऱ्यांचे घरगुती धंदे, संरक्षक सैन्य, यासंबंधीं राज्यधुरंधर जवाहरलालजी, राष्ट्रनियोजन समितीचे अध्यक्ष यांचे वरील बाबींसंबंधीं काय निर्णय आले आहेत! त्यांत आपली किती प्रगति झाली आहे हें सर्व सवडीप्रमाणें मंत्रिमंडळ मला कळवील अशी मला आशा आहे.

"सर्वांच्या शेवटीं, ज्या शीलाच्या पावित्र्यावर राष्ट्र जोमदार, अजिंक्य आदरणीय राहतें आणि वाढतें तें राष्ट्राचें शील, उत्तम राहण्याविषयीं, धर्ममंडळें, आणि धर्मगुरु यांनी केलेले नियम व सूचना या वारंवार लक्षांत घेऊन धर्माला धरून राहण्याविषयीं राष्ट्रधुरीण व समाजनेते हे काळजी घेतात ना!

" बंधुभगिनींनो, नवराष्ट्रांतील आमच्या सुविद्य भगिनी, धर्मशील, पतिव्रता, व्रतशील, देवीसमान मातृत्वाच्या पवित्र प्रेमाने भरलेल्या असून, त्यांच्या वात्सल्याचें सौख्य, राष्ट्रांतील लोकांना मिळतें ना! देवतारूप आदर्श अशा सर्व राष्ट्रमातांना नम्रपणें वन्दन करून आपण सर्व त्यांचे आशीर्वाद ग्रहण करीत असतां ना?

"असो आपल्या राष्ट्राचें सदैव मंगल असो! पागलखान्यांतील मी एक वेडा आहे. शिस्तीप्रमाणें डॉक्टर तपासणीला येण्याची वेळ झाली असल्याने तेथे हजर राहण्याकरितां आपणा सर्वांचा मी आता निरोप घेतों. आपण सर्वांनीं मला भेट देऊन आपलेपणाच्या प्रेमाचा जो अनुभव दिलात त्याबद्दल मी आपणांस शतशः धन्यवाद देतों! नमस्कार!"

इतकें बोलून लोकांनी त्यांच्याकरितां आणलेल्या असंख्य हारांना आदराने एक वेळ हुंगून ते पटकन निघून गेले.

भारतनंदनांचें, तें साधें, मधुर, सात्विक, गंभीर, ज्ञानयुक्त आणि प्रेमादरपूर्ण भाषण ऐकून लोकांना आनंद व आल्हाद वाटला. परंतु तें भाषण एकदम संपल्याने, लोकांना अगदीं अतृप्तसें वाटलें.

पुष्कळांनी त्या भाषणाला प्राचीन राजर्षीची उपमा दिली. आपल्यासमोर कोणी वेडा बोलला याची जाणीवसुद्धा लोकांना दिसली नाही.

हें सर्व चाललें असतांना मी माझी नजर पापग्रह मंत्रिमंडळाकडे रोखली होती. इतका वेळ शांत राहिलेले लोक उसासे सोडीत जरा विश्रांति घेण्यांत गुंतले होते. अशा वेळीं मंत्रिमंडळाचे प्रमुख, दुसरे सर्वाधिकारी इंद्रसेन, यांनी मंत्री मधुभाष यांच्या हातावर टाळी दिली व म्हटलें, "कसें काय मधुभाष! वेळीं अवेळीं राजकारणांत नीति, धर्म, सत्य, अहिंसा आणणाऱ्यांना आमच्या सुखांत लुडबुड करणाऱ्यांना कसें पुराण सांगत बसवलें! खरोखर आज आपल्या डोळ्याचें पारणें फिटलें!

"आता पागलखान्यांतील दगडांना बसा म्हणावें जन्मभर धर्म सांगत!"

मधुभाष मंत्र्यांनी 'भाई यह सारा आपकाही प्रताप है अब उनको मालुम पडेगा की हम कौन है!' असें उत्तर दिलें.

* * *

लोकांनी थोडा वेळ विश्रांति घेतल्यावर रंगुबाई वेडीला बाहेर घेऊन येण्यास मी एका नर्सला सांगितलें. रंगुबाई आल्या. या एका खेडयांत मास्तरीण होत्या, पण त्या पुन्या वेडया बनल्यावर एका तालुका बोर्डाच्या अध्यक्षांनी त्यांना एके रात्रीं येथे आणून पोचविलें होतें. त्यांच्या प्रकृतींत कोणत्याही औषधाने कधीही फरक पडला नाही. त्या एखादे वेळीं मला डॉक्टर म्हणून ओळखत. नाही तर त्या एक ठरलेली विनंती मला नित्य करीत व मग भीति वाटते म्हणून ओरडत.

रंगूबाईनी त्या प्रचंड सभेकडे एक वेळ पाहिलें! व मला विचारले, "डॉक्टर हे लोक कोण आहेत! इतके वेडे पागलखान्यांत राहतील कां!

मीः—हे लोक वेडे नाहीत!

रंगूबाईः—मी पण वेडी नाही ना!

मीः—नाही.

पुन्हा आठवल्यासारखें करून ती म्हणाली, "अहो, आज माझ्या शाळेचा बक्षीससमारंभ आहे!" पुन्हा लोकांना उद्देशून ती म्हणाली, "बंधुभगिनींनो, बसा. अध्यक्ष आले की आपल्या बक्षीस-समारंभाला सुरवात होईल बरें का!" हें इतकेंच काय तें ती निराळें बोलली. पुन्हा आपली रोजच्यासारखी माझ्यापुढे हात जोडून उभी राहिली व म्हणाली,

"प्राणपति, मी आपणापुढें आणि जिल्हापतीच्यापुढे हात जोडून विनंती करितें माझी त्या दुसऱ्या खेड्यांत नका हो बदली करूं! काय सांगूं तुम्हाला, तालुकाधिपति खंडेराव, आणि ते त्यांचे दुष्ट मित्र! हर हर, मी बाई मनुष्य काय खरें तुम्हाला सांगूं! मी कुमारी आहे हो! माझें लग्न होणार आहे. पण बाबांची गरीबी! महाराज आपण राष्ट्र-सभेचे प्रांतपति. आपण माझा सांभाळ करा, मला आपण बापाप्रमाणें पूज्य आहां. तो तालुकाधिपति खंडेराव! बोर्डाचा तो अध्यक्ष आहे. मला भलत्या ठिकाणीं बोलावतो! नाही ना तुम्ही माझें रक्षण करीत! तो पहा, आला! आला! खंड्या दुष्टा! मला भीति वाटते. देवा! देवा! देवा!" ती हृदय भेदक किंचाळ्या फोडूं लागली.

नर्सने तिला आंत नेली. त्याच वेळीं, एक खिडकीडीत, लहान खुजा पुरुष, तोंडावर गांधी टोपी धरून गर्दीतून जोराने मार्ग काढीत पळून गेला.

आजचा कार्यक्रम यानंतर बंद झाला.

# १४. वेड्यांचें प्रदर्शन !

"वेडयांचें प्रदर्शन ! किती भयंकर हे शब्द ! नाही ! मला नाहीच हें सहन होणार !" डॉक्टर म्हणाले. कांही केल्या त्यांची समजूत पडेना ! "चित्रगुप्त, अहो काय बोलतां हें तुम्ही ! निरापराधी, स्वाभिमानी, माणसांच्या दुर्दैवाची विटंबना करून ती पहात आनंद मानणाऱ्या या सैतानांना उपमा देण्याइतका वाईट शब्दसुद्धा या आमच्या सात्विक, दैवीगुणसंपन्न राष्ट्राच्या भाषेंत मला सापडत नाही हो ! नरभक्षक राक्षस, पशु सर्व यांच्यापुढे कमीच पडतील !

"तुम्ही म्हणतां गनिमी कावा ! पण अमंगल कल्पनांचा; आत्म्याचा अधःपात करणाऱ्या या दुष्ट भेसूर, भीतिप्रद, सोंगाची क्षणभर बतावणी करणें ही आपल्यालासुद्धा अमंगल बनविल्यावाचून राहणार नाही. रामाच्या सीतेवरील प्रेमाची परीक्षा पाहण्याकरितां जगन्माता पार्वतीने सीतेचें क्षणभर मायावी रूप धारण केलें. परंतु परपुरुषाची पत्नी होण्याची क्षणभर थट्टा केल्यानेसुद्धा पार्वतीला देहत्याग करावा लागला. शंकरांनी पार्वतीला सांगितलें, थट्टेंतसुद्धा पाप उच्चारल्याने देह अपवित्र होतो. मला यापुढें तूं स्वीकारार्ह नाहीस !

"रामाने प्रजारंजनाच्या थोर कर्तव्याकरितां, प्रियपत्नीला, पतिव्रतेला, गर्भिणीला रानावनांत सोडलें, अन्याय केला. विरहाचें प्रायश्चित्तही जन्मभर भोगलें. परंतु रामचारित्र्याला लागलेला हा निर्दयतेचा

व अन्यायाचा डाग वाल्मिकासारख्या त्याच्या भक्तालाही गंगाजलाने धुतां आला नाही.

"हे स्वार्थी लोक जगांतील सर्व सद्गुणांना आग लावून देऊन, त्या सर्वनाशी महाभयंकर अग्नीच्या ज्वाला पाहण्यास आणि तो आसुरी आनंद उपभोगण्यास अगदी आधीर झाले आहेत ! माझ्यामागें त्यांचा सारखा लकडाच आहे की, तो शो एकदा लौकर करा. लोकांची त्यांना खात्री करावयाची आहे की, तीं वेडीं माणसें आम्ही जीवंत ठेविलीं आहेत. शिवाय वेड्यांच्याकरितां लागणारा खर्चही या निमित्ताने ते जनतेला फसवून काढूं इच्छितात. आणि आपण त्यांच्या ह्या आसुरी इच्छा पुऱ्या करणार नाही कां !"

मी काकुळतीने म्हणालों, "डॉक्टर, तुमच्याइतकाच वेड्यांच्यावर उपासमारीचा प्रसंग येऊं नये म्हणून मी पण आपल्या प्रयत्नांची शिकस्त करीत आहे ना ? मग कां बरें तुम्ही इतकें दुःख मानतां ! आपण असें कांही कारस्थान केल्यावाचून आता या चक्रव्यूहामधून सहीसलामत सुटणें शक्य नाही.

"मी जाणतों की तुम्ही माझ्याहून जास्त कष्ट सोसलेत. परंतु म्हणून मी असें म्हणतों की तुम्ही यामध्ये आता कांहीच करूं नका. आजारी म्हणून घरीं रहा. मलाही वाटतें की हा ताण आता तुम्हाला सोसणें कठीण आहे. मी, भाई काहूर व दुर्गादेवी यांच्या सल्याने सर्व करितों. नव्हे सर्व कार्यक्रम आम्ही पुढीलप्रमाणें ठरविला आहे.

"आपल्या या पागलखान्याच्या राजवाड्यांतच, 'राणीवसा' या नांवाच्या बंद व प्रचंड विभागांतील खुल्या व विशाल जागेंतच आपण लोक बसण्याची व्यवस्था करावयाची. राजवाड्याच्या भिंतीला लागूनच स्टेज करावयाचें. पहिली रांग, नवग्रह मंत्रिमंडळ व येथील स्थानिक आणि इतर प्रांतांतील मंत्री व अधिकारी, श्रीमान, जाहागीरदार, संस्थानिक यांच्या करितांच राखून ठेवणार म्हणजे पुढे सोपें पडेल.

"बसविण्याची व्यवस्था करण्याच्या निमित्ताने पुण्यपथकाचे सर्व सेवक हजर राहणार आहेत. त्यांची व्यवस्था करण्याकरितां भाई काहूराने युवकसंघाला चिठ्ठी पाठविली आहे. तें सर्व अत्यंत गुप्त व व्यवस्थित होईल.

"शंभर, पन्नास, पंचवीस, दहा ते एक रुपयांपर्यंत तिकिटें छापलीं असून तीं जवळ जवळ खपलीं आहेत.

"वेडयांचें प्रदर्शन या शीर्षकाखाली पुष्कळ पत्रकें प्रसिद्ध केलीं आहेत व मंत्रिमंडळाच्या हुकमाने ही माहिती स्पर्धेने प्रसिद्ध करण्यास सर्व राष्ट्रीय पत्रें चढाओढ करीत आहेत. त्यांत आम्ही पुढील मजकुर प्रसिद्धीला दिला आहे.

" 'थोर लोकांचें वेड, म्हणजे सामान्य लोकांच्याप्रमाणें चिंध्या चिवडण्याचें वेड नव्हे. तर त्यांना लागलेलें वेड हें अत्यंत विकसित झालेलें, उदात्त व उच्च दर्जाचें धार्मिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय असें तत्वज्ञान होय.

"देशस्वातंत्र्याकरितां आहोरात्र झटणाच्या श्रमाने मेंदूला ताण पडून हे लोक वेडे झाले आहेत. तरी पण त्यांचें हें वेडही देशाचें आहे. या पूज्य थोर लोकांना पाहण्याची लोकांना तळमळ लागणें, हें साहाजिक आहे. परंतु लोकांच्या त्रासाने त्यांच्या मेंदूला ताण पडूं नये म्हणून आम्ही सरसहा भेटी देत नव्हतों.

" 'या थोर लोकांना आम्ही विनंती करूं की जनता तुम्हाला पाहण्यास व तुमची भाषणें व उपदेश ऐकण्यास उत्सुक आहेत. तुम्ही कांही तरी बोला. परंतु शेवटीं ते वेडे आहेत. लहर लागली तरच व पाहिजे असेल तें बोलतील नाही तर मूकच बसतील. जर ते लोक बोलले नाहीत तर लोकांना फसवणूक वाटूं नये म्हणून हें प्रथम कळवीत आहोंत.

" 'या थोर, श्रीमान, मोठया अधिकारी वेडयांची ते राजकीय वेडे असल्याने व्यवस्थाही तशीच चांगली ठेवावी लागते. अर्थातच त्याला

खर्च फार येतो. आणि म्हणूनच केवळ त्यांच्या खर्चाकरितां हीं तिकीटें लावलीं आहेत. तरी हे पैसे गेल्याबद्दल लोकांना दुःख वाटणार नाही किंवा ते तक्रारही करणार नाहीत, अशी आम्हाला आशा आहे.

" ' दूर ध्वनिक्षेपक यंत्रें लावल्याने सर्वत्र चांगलें ऐकावयास येईल. जास्तींत जास्त कार्यक्रम आठ दिवस चालेल.

" 'प्रत्येक दिवशीं चार तासाहून जास्त वेळ कार्यक्रम राहणार नाही.

" ' राजकीय वेडयांच्या व्यतिरिक्त जे इतर सामाजिक राजकीय व धार्मिक विभागांतील वेडे आहेत, त्यांनाही त्यांची प्रकृति बरी असली व लहर असली तर स्टेजवर आणण्यांत येईल. वेडयांच्यापैकी कांही वेडे गाणारे आहेत. त्यांची इच्छा झाली तर जनतेला गाणेंही ऐकण्यास मिळेल.

" ' पहिले दिवशीं नवभारताचे पहिले सर्वाधिकारी यांचा मुख्य कार्यक्रम राहील.'

" अशी ही एकंदर व्यवस्था आहे. तेव्हा तुम्ही कांही चिंता करूं नका. फक्त बरें वाटेल त्या दिवशीं घटकाभर स्टेजवर येऊन बसा.

" ' जा ! आता घरीं जा व शांत व्हा ! "

इतकें बोलून मी उठलों. डॉक्टरांना, मी जें इतकें बोललों तें आवडलें असें नाही. परंतु त्यांनी मौन धरलें व ते उठले.

# १५. जनताजनार्दन

गळूनि जातसे धर्म, ज्या ज्या वेळेस अर्जुना।
अधर्म उठतो भारी, तेव्हा मी जन्म घेतसें ॥७॥
राखावया जगीं संता, दुष्टा दूर करावया।
स्थापावया पुन्हा धर्म, जन्मतों मी युगीं युगीं ॥८॥

गीताई, अ. ४ था

ज्यापासून समाजाचें धारण, पोषण होतें असे नीतिनियम, धर्म व कर्तव्यें याकडे दुर्लक्ष होऊं लागणें ही समाजावर नव्या येणाऱ्या एखाद्या धोक्याची दग्याची भयप्रद सूचनाच होय. याचा परिणाम हळूहळू परंतु निश्चित घडून येतो आणि समाजांत अज्ञानी, स्वार्थी, क्रूर, कपटी, सुख-लोलुप, शीलभ्रष्ट अशा माणसांची वाढ होऊं लागते. आणि मग अन्याय व असत्य या रोगांनी राष्ट्र व्यापतें. सहजच त्याचें फळ शीलभ्रष्ट राष्ट्र पदभ्रष्ट होऊन चोर, जार, परपीडक हे सैतानाचे दूत समाजांत निर्भयतेने अमंगल कृत्यें करूं लागतात.

सर्वसामान्य लोक आणि सज्जन लोकांच्या छळाला अशा वेळीं मग उधडच ऊत येतो. ही सर्व बेबंदशाही नष्ट करून, धर्माची स्थापना व संतांचें रक्षण करण्याकरितां, दुष्टांना शासन करण्याकरितां

मग ईश्वर अवतार घेतो, असें श्रीकृष्णांनी स्वतःच गीतेंत सांगितलें आहे. असे अनंत अवतार झाल्याचें इतिहासही सांगतो.

कांही भाग्यवान पिढया, या सत्याचा साक्षात्कार अनुभवतात. ज्यांना हा चमत्कार दिसतो त्यांना मग तो अवतार कबूलच करावा लागतो.

जनताजनार्दन हा एक अवतारच होय. हृदयाहृदयांत ती दिव्य ज्योति पेटूं लागते आणि त्या विशिष्ट तेजाने अनेक आत्मे सामर्थ्य-संपन्न होऊन ईश्वराचा आविर्भाव, किंवा संचार एखाद्यांत फार प्रबल-तेने प्रतीत होतो. अशी गोष्ट घडून जग आश्चर्यचकित होईल काय अशी वारंवार आम्हाला आशा वाटे. डॉक्टर मला सारखे म्हणत की, "चित्रगुप्त आपण हा कार्यक्रम सुरू केला आहे खरा, परंतु या साहसाचा परिणाम काय होईल?"

मी त्यांना धीर देत म्हणें, "परम न्यायी ईश्वर आता ही गोष्ट फार वेळ सहन करणार नाही." अशा मनःस्थितींत ठरवलेले कार्यक्रम आम्ही पार पाडीत होतों.

दुसरे दिवशीं श्री सवितादेवी प्रथम स्टेजवर आल्या. कालच्या इतकेंच लोकांनी त्यांचें प्रेमपुरस्सर स्वागत केलें. सवितादेवींना मी विनंती केली "अमरपुरांतील लोक आज आपली भेट घेण्यास आणि आपले चार शब्द ऐकण्यास आले आहेत. त्यांना आपण कांही सांगावें.

ती कट्टी कर्मयोगिनी स्मित करून म्हणाली, "बरें आहे! बंधु-भगिनींनो! भारताचा पुनर्जन्म होत आहे. या परममंगल कालीं आपण सर्व, नवे सुंदर सद्गुण धारण करून आपणांत अवतरत असलेल्या जनताजनार्दनांचें प्रेमाने स्वागत करूं या. द्वेष, मत्सर, सुखलोलुपता, आळस, दुष्टता, इत्यादि मनुष्याला आणि राष्ट्राला मलिन करणारे

अमंगल विकार झाडून काढून, शरीरें आणि मनें स्वच्छ करूं या. शीलाच्या शुद्ध सोन्याने तुम्ही झळकलें पाहिजे! निर्मळ विचाराच्या तेजस्वी हिऱ्याचे मुकुट घालून तुम्ही चमकलें पाहिजे. ईश्वराचा अभिनिवेश हृदयाहृदयांत होऊं द्या.

"राम आणि कृष्ण, वामन, नारसिंह, सीता आणि सावित्री, असे सर्व अवतार, एकदम आपणांपैकी एकेकाच्या हृदयांत प्रगट करून आपण सर्व मिळून भारताचें उत्थान करूं. यापेक्षा जास्त तें मी काय सांगणार तुम्हाला? नमस्कार!"

लोकांनी टाळ्या वाजवून आपल्याला झालेला आल्हाद व्यक्त केला व त्या निघून गेल्या.

त्यानंतर इंग्रजांचें राज्य असतांना मुंबईच्या पागलखान्यांत सट्टेवाल्यांनी एका वेड्याला पागलखान्यांत पाठविलें होतें. तो आता म्हातारा झाला होता. परंतु मुंबईच्या नव्या मंत्रिमंडळाने त्यालाही नवभारत पागलखान्यांत पाठविलें होतें. कारण तोही राजकीय वेडाच आढळून आला होता.

त्याचें नांव आमच्या पागलखान्यांत ज्योतिषी असेंच भाई वेड्यांनी ठेवलें होते म्हणून आम्ही सर्व त्याला त्याच नांवाने हाक मारित होतों. हा गृहस्थ सट्टेवाल्यांना रोज भविष्य सांगे व त्यावर विश्वास ठेवणाऱ्या पुष्कळ लोकांनी सट्ट्यांत आणि रेसेसमध्ये कोट्यावधी रुपये मिळविले होते. म्हणून ते लोक त्याला नित्य खाणेंपिणें देऊन मोठ्या चैनींत ठेवीत असत. परंतु एकावेळी त्याने दहा धाडसी लोकांना आज तुम्ही सट्टे हाराल, सर्वनाश होईल असें सांगितलें आणि तसें घडून आलें. त्याचा परिणाम याची बत्तिशी वाईट आहे असा त्या सट्टेवाल्यांच्यावर झाला व तेव्हापासून हा वेडा म्हणून पागलखान्यांत पडला.

पागलखान्यांतही त्यांचें तोंड गप्प राहत नसे. न विचारतां ज्योतिष बोलत सुटावयाचें हा जणू त्याचा कार्यक्रमच असे. एकदा एका मुंबईच्या गृहमंत्र्याला त्याने सांगितलें की, तूं एक नाटक्या म्हणून प्रसिद्धी पावशील. एका गव्हर्नरला तो म्हणाला, "इंग्लंडच्या एका राजाला एक नर्तकी पदभ्रष्ट करील व विसाव्या शतकाच्या पहिल्या अर्धाच्या शेवटीं इंग्रजांच्या हातून हिंदुस्थान जाईल. इतकेंच नव्हे तर एक मोटा राक्षस त्यांचें साम्राज्य समुद्रांत बुडवील. अजूनही असेंच कांही तरी भविष्य बडबडतो. हल्ली तो अंध व बहिरा झाला आहे. ही सर्व त्याची माहिती देऊन मी त्या अंधाला धरून स्टेजवर ध्वनिक्षेपक यंत्राजवळ आणून बसविलें व खूप मोठ्याने ओरडून त्याला सांगितलें की, ज्योतिषीबाबा पुष्कळ लोक आज तुमचें भविष्य ऐकण्यास आले आहेत, तरी आजच्या दिवसाचें भविष्य सांगा.

असं का, बरें आहे सांगतो, असें म्हणून तो सांगूं लागला. तो म्हणाला, "लोक हो आजचा दिवस मोटा उलटसुलट, मंगल आणि अमंगल असा आहे. आजच्या दिवशीं वेडे लोक शहाणे होतील आणि शहाणे वेडे होतील. मुक्त बंदी होतील आणि बंदी मुक्त होतील. आज नऊ रावण, नऊ कंस, नऊ दुर्योधन, दोन राहू केतू, एक शनी, एक ब्रह्महत्या, एक साडेसाती अशी एक मोठी टोळी, जिच्यांत अनेक भैरव, कांही वेताळ, कांही सैतान, संजीवनी, डांकिनी हे सर्व पाशबद्ध होणार आहेत. झालं. संपलं आजच्या दिवसाचं भविष्य!"

हें त्या म्हाताऱ्याचें भविष्य ऐकून लोक खूपच हसले. एकाने तर त्याला विचारलें की, "काहो बाबाजी! हल्ली पृथ्वीवर राक्षस, भुतें, सैतान, रावण, कंस, दुर्योधन कोठे राहतात हो! त्यांचा पत्ता सांगाल कां आम्हाला!"

बाबाजी म्हणाले, "हो हो! आहेत तर! ते हल्ली मनुष्य-रूपाने राजपुरुषांच्या वेषांत आहेत. येथेच तुमच्या आसपास ते असले

पाहिजेत. तसेंच रावण, कंस आणि दुर्योधन ह्या त्रिकुटाचें हल्ली मेत्त-कुट झालें असून प्रत्येक राक्षसांत ते तिघेही आपलें लीलानाटक करीत आहेत. लौकरच हे राक्षसी पूर्णावतार मुक्तीला जातील."

हें ऐकून हा अगदीच पागल दिसतो म्हणून लोक खूप हसले. मग त्याला मी आंत नेलें.

त्यानंतर वीर सत्यशील यांना आणलें. त्याबरोबर एक मोठाच चमत्कार घडला. सर्व लष्करी आधिकारी त्यांना पाहतांच एकदम उठून उभे राहले व त्यांनी वीर सत्यशीलांना लष्करी नमस्ते केला. त्यांनी आपला नेंहमीचा म्हणजे वेडे नसतांना सेनापतिपदावर असतांना जो पोषाक करीत असत तोच त्यांनी आज केला होता. तो सलाम घेऊन ते झपाटयाने निघून गेले.

लोक उद्गारले "अरे! अरे! इतका शूर, वीर, वेडा होऊन पागलखान्यांत पडला अं!" त्यानंतर सकाळचा कार्यक्रम संपला.

दुपारीं तीन वाजतां पुन्हा कार्यक्रम सुरू झाला. त्या वेळीं भयंकर गर्दी लोटली होती. कारण त्या वेळीं भाई काहुराचें भाषण होणार होतें. त्याच्या लोकप्रियतेचा तो परिणाम होता.

स्त्रीवेडयांना स्टेजवर आणूं नये अशी त्या दिवशीं सकाळीं मंत्रिमंडळाने डॉक्टर अश्विनीकुमारांना इच्छा कळविली. डॉक्टर बरें म्हणाले.

बरोबर तीनला भाई काहुराने लष्करी पोषाकांतच स्टेजवर प्रवेश केला व आल्याबरोबर भाषणाला सुरवात केली.

"बंधुभगिनींनो, सुस्वागतम्! आज वेडयांचा तमाशा पाहण्यास तुम्ही सर्व शहाणे आलांत ही फारच चांगली गोष्ट झाली. याबद्दल मी तुमचे हार्दिक आभार मानतों.

"तुमच्याजवळ शिल्लक असलेल्या अकलेचा हा शेवटचा अवशेष तरी निदान अकलेने उपयोगांत आणण्याची बुद्धि तुमच्याजवळ उरली आहे हें पाहून ईश्वराचे आभारच मानले पाहिजेत.

"सर्व दैवीसंपत्तीचें दिवाळें वाजवून, शेणाचे दिवे पाजळून, आपलें अपशकुनी तोंड अंधेरांतच लपवून बसलां असतां, तर तुम्हाला थोडी तरी लज्जा उरल्याचें लोकांना भासलें असतें व तुम्ही सुधारण्याची थोडी तरी आशा उरली आहे अशा समजुतीने लोक फसले असते, परंतु ठीक झालें !

"लोक हो! असा एक हीन मनुष्यस्वभाव आहे की, त्याला थोडीशी सत्ता मिळतांच, सत्तेची दारू पिऊन, धुंद आणि मत्त होऊन मनुष्य उन्मत्त खेळ खेळूं लागतो. क्षणभराच्या सत्तेनें आपण आतां जिकलें असें त्यांना वाटूं लागतें. लोकलज्जा, समाज, धर्म, आणि प्रत्यक्ष ईश्वर कोणालाच भिण्याचें त्याला मग कारण नाही असें वाटूं लागतें. दुर्योधनी बेडर वृत्तीनें मग सत्ताधारी लोक आपल्या आसुरी लालसा पुऱ्या करितात. त्यांच्या राक्षसी नाटकांतील ते स्वतःच मेषपात्रें बनून अघोर कर्में निधड्या छातीने ते जगाला दाखवूं लागतात.

"हळूहळू पापांनी ते काळे ठिक्कर पडतात परंतु ते चेहरे पाहून स्वतःची स्वतःलाच भीति वाटूं नये म्हणून मग ते आत्मपरीक्षणाचे सुंदर आरसे, आपल्या हाताने दगडावर हापटून फोडून त्याच्या ठिकऱ्याठिकऱ्या उडवतात. हेतु हा की आपलें हिडीस चित्र आपल्याला दिसूं नये. पण मला खात्री आहे की त्यांच्या दुष्कर्मांचीं भुतें शेवटीं त्यांना सतावून सोडतील आणि आत्महत्या करावी असें अंतीं त्यांना वाटेल.

"भाई हो, ते क्षणभराच्या अमंगल विकाराकरितां, कुलस्त्रियांचा, धर्मपत्नीचा विश्वासघात आणि अपमान करून व पराकोटीचा

मानभंग करून, त्यांना वेडया ठरवून, पागलखान्यांत पोचवितात किंवा छळून छळून ठार करितात. आपल्या स्वैर विषयासक्तीला तृप्त करण्याकरितां कुलटांना, शीलभ्रष्ट स्त्रियांना लग्नाचे दाखले आणि नीतीचीं प्रमाणपत्रें देऊन पवित्र गृहमन्दिरें भ्रष्ट करून, संसारसुखें धुळीला मिळवितात. स्वतःच्या निरपराधी संतानांना पाप्यांचे वारस म्हणून हीन आणि लज्जास्पद जीवन त्यांच्या वाटणीला ठेवितात.

"बंधुभगिनींनो नवभारतांत राष्ट्रोद्धारक नेते म्हणून असे लोक वावरत आहेत. सज्जनांची, साधूंची, सुधारकांची, सनातन्यांची, नाना सोंगें घेऊन स्वतःचा स्वार्थ साधण्याकरितां, अधिकारलालसेकरितां स्वबांधवांना वेडे ठरवून, जिवंतमृतांच्या समाधी त्यांनी बांधल्या आहेत. त्याचेंच नांव तुरुंग आणि वेडयांचे दवाखाने.

"सिंहांना आणि वाघांना कपटाने कोंडून आपला पराक्रम आणि विक्रम मग ते प्रदर्शनें भरवून लोकांना दाखवीत सुटतात. बंधुभगिनींनो मला बोलण्यास लाज वाटते व वाईट वाटतें की, समाजसेवेचीं, राष्ट्र-सेवेचीं ढोंगें करून कित्येक कुलीन घराण्यांतील स्त्रियाही आपल्याला स्वैराचार करावयाला मिळावा म्हणून संततिनियमनाची आवश्यकता दाखवून प्रत्यक्ष पोटच्या पोरांच्या हत्या, आणि गर्भपात करीत आहेत. आपल्या स्वतःच्या पोटच्या पोराच्या हत्त्या करणाऱ्या त्या राक्षसी स्त्रिया कोणत्या प्रकारची राष्ट्रसेवा आणि समाजसेवा किंवा धर्मसेवा करीत असतील तें तुम्ही पाहतच असाल. स्वतःच्या हक्काची, न्यायाची आणि दर्जाची मागणी करणाऱ्या नवभारतांतील कांही स्त्रिया खुशाल स्वैर वागून विवाहित पुरुषांशीं लग्नें लावीत सुटतात. व आपल्या. सारख्याच दुसऱ्या स्त्रियांना संसारविहीन, दीन करून दुसऱ्याचे हक्क पायाखाली तुडवितात.

"कांही विवाहित स्त्रिया स्वतःचे पति सोडून पैसा, मान, मोटारी

यांसारख्या क्षुद्र सुखांच्याकरितां दुसऱ्या कपटी नरशत्रूंच्या दासी बनून पवित्र पातिव्रत्याची माती करून नर्काच्या अधिकारी होतात. हें सारें सहन करणारे नादान नवरे स्त्रीच्या या पेशाने सात मजली माडया उठवून स्वर्गात पोचल्याचें सौख्य भोगतात.

"नाही. बंधुभगिनींनो, स्वतंत्र भारतांत, दैवी भारतांत असले असुर, मानवराक्षस आपण केव्हांही वावरूं देतां उपयोगी नाही.

"न्यायाच्या, धर्माच्या, सत्याच्या आणि समाजाच्या या शत्रूंना, शासन करण्यास आपण निर्भय चित्ताने वीर वृत्तीने तयार झालें पाहिजे.

"बंधुभगिनींनो, शेवटीं हे पापी लोक तुम्हाला दाखवून युवक मंडळ त्यांना तुमच्या परवानगीने शासन करील. हे पहा ते पापी लोक! आपलें नवग्रह मंत्रिमंडळ! यांनी आपल्या साध्वी स्त्रियांना आणि आम्हाला निष्कारण वेडें करून कपटाने या पागलखान्यांत कोंडलें. पहा त्यांचीं काळीं ठिक्कर तोंडें!"

मंत्रिमंडळ आणि प्रेक्षक यांच्यांत एकदम खळबळ आणि हालचाल सुरू झाली.

इतक्यांत एक वेडी सैरावैरा धावत पळत, प्रेक्षकांच्या गर्दीत घुसली. बाळा, बाळा करीतच तिने स्टेजवरून उडी टाकली. केव्हा आलासरे, कुठें गेला होतासरे म्हणून, एक प्रांतमंत्री अयोद्ध्याप्रसाद लकाडे यांच्याजवळ बसलेल्या एका मुलाला घट्ट कवटाळून मिठी मारून बसली. तो मुलगाही तिला बिलकूल भ्याला नाही. उलट 'बाबा, पहा, पहा, आई आली! आई ग, आता नको कधी मला टाकून जाऊं! आपल्या घरांत की नाही एक मुसलमानीण बाई–ती आपल्या ड्रायव्हरच्या घरीं नव्हती का ग?–ती रोज येते आणि मला त्रास देते ग आई. ती म्हणते की, हिंदु झालें आहें मी!'

ती कावरीबावरी वेडी, कांहीच ऐकत नव्हती. केवळ मुकेच घेत सुटली मुलाचे.

हा प्रकार सुरू आहे तों आमच्या स्त्रीवार्डांतील सर्व वेडया स्त्रिया स्टेजवर येऊन डोळे फाडून तिथल्या गर्दीकडे टकमका पाहूं लागल्या.

बेबी, बेबी करून आणखी एकजण एका मुलीला ओढूं लागली. ती मुलगी त्यामुळें घाबरून आक्रोश करूं लागली. लोक सोडवूं लागले तों, तों, ती जास्तच मगरमिठी मारूं लागली.

पागलखान्याच्या नर्सेस घाबरून त्या वेडयांना आंत नेण्याची पराकाष्ठा करूं लागल्या पण त्या नांव ऐकेनात. आमचीही त्रेधा उडाली. मंडपांत न भूतो न भविष्यति गोंधळ उडाला.

इतक्यांत मरीआई गीता, चवताळून, मालतीबाई, मालतीबाई करून सर्वाधिकारी इंद्रसेन यांच्याजवळ बसलेल्या बाईंना खुर्चीवरून फराफरा ओढूं लागली. तोंडाने सारखा पट्टा सुरू होता की, "मालती-बाई! लाज नाही वाटत तुला! साहेबांच्या जवळ बसलीस! बाईसा-हेबांच्या खेटराची सर तरी तुला आहे काय! चांडाळणी कुठे भोगशील ह्या पापाची फळें. आम्हाला वेडया म्हणून येथे पोचवून, बाईसाहे-बांच्या घराची मालकीण होऊन बसलीस होय!"

इंद्रसेन मरीआई गीतेला दूर सारूं लागले व मालतीबाईंचें रक्षण करूं लागले. परंतु गीता अकाळ विकाळ ओरडली, "खबरदार साहेब! गडीमाणसाच्या बायकोवर हात टाकाल तर याद राखा! स्वतःच्या स्त्रीला, वेडी करून सोडून दुसऱ्याच्या बायकोवर डोळा ठेवतां तुम्ही! कशाचे हो तुम्ही मोठे लोक!"

मंत्रिमंडळ, व इतर हजारों लोक बाहेर जाण्याचा प्रयत्न करूं

लागले पण राजवाड्याच्या त्या आवारांत कडेकोट बंदोबस्त होता कोणीही बाहेर जाऊं शकेना.

पुण्यपथक लाठ्याकाठ्या घेऊन व्यवस्था ठेवण्याचा प्रयत्न करूं लागलें तों जास्तच गोंधळ उडाला. तें पाहून भाई काहुर आपल्या पहाडी आवाजाने ओरडून म्हणाला, "पलटण नंबर एका एकदम नवग्रह मंत्रिमंडळ आणि पाहिल्या लाईनमध्ये बसलेले इतर सर्व अधिकारी यांना कैद करून, पागलखान्यांतील आमच्या निवासांतील जागेंत कोंडून ठेवा! या सर्व अनर्थाचें मूळ हें पापग्रह मंडळ व त्यांचे उपग्रह अधिकारी लोक आहेत!"

भाईच्या मुखांतून हे शब्द बाहेर पडतांच एक सशस्त्र तुकडी स्टेजच्या मागील बाजूने येऊन एका क्षणांत नवग्रह मंत्रिमंडळासहित सर्व अधिकारी लोकांना पकडून घेऊन गेली. साखळदंडासहित सर्वच तयारी युवक मंडळाने ठेविली होती. नंतर दुसरी सशस्त्र तुकडी रिकाम्या खुर्च्यांवर येऊन उभी राहिली.

पुन्हा शीळ घालून, खड्या आवाजांत काहूर म्हणाला, "बंधु-भगिनींनो कोणाच्याही जीवाला धोका नाही. सर्वांना सुरक्षित घरीं नेऊन पोहचविण्यांत येईल. मात्र सर्वांनी शांत राहिलें पाहिजे."

भिऊन सर्व सभा चित्रासारखी स्वस्थ बसली. नंतर भाई काहुराने जास्त वेळ न घेतां सर्व सभेला मंत्रिमंडळाची दुष्ट कृत्यें पुराव्यासहित दाखविलीं. वेड्या होऊन संसाराला मुकलेल्या स्त्रिया व पहिलें मंत्रिमंडळ यांना वेडें ठरविल्याचें ढळढळित खोटें उदाहरण स्वतः भाई व इतर हें समोर दिसत असल्याने आणखी तो नवग्रह मंत्रिमंडळाच्या दुष्टतेचा पुरावा कोणता पाहिजे होता. निदान सध्यां-पुरता तो पुरेसाच होता. पण त्याशिवाय स्वत: मंत्रिमंडळ या

वेडयांच्या कारस्थानाकरितां निरनिराळया लोकांना जीं पत्रें पाठवीत असत तीं मिळवण्याकरितां भाई काहूराने खटपट करून तीं मिळवलीं. राज्यकारभारांत त्यांनी घेतलेल्या लाखो रुपयांच्या लांची, भ्रष्ट केलेल्या स्त्रिया, इंग्रज व्यापाऱ्यांशीं देशाला विघातक असे केलेले व्यापार-विषयक करार, देशद्रोह, प्रजाद्रोह यासंबंधीं सविस्तर हकीगतीचें सरकारी कागद पत्रावर उजडे पाडणारें एक हजार पानांचें लिखाण, सवितादेवी भारतनंदन व इतर मंत्री यांनी लिहून तयार ठेवलें होतें. तें त्या सभेला दाखवून भाई म्हणाला.

“ मित्रहो, या राजक्रांतीच्या घडामोडीमुळे येथे व इतर प्रांतांत जी खळबळ उडेल.ती शांत झाल्यावर जनता नेमून देईल त्या प्रतिनिधीं-समोर नवग्रह मंत्रिमंडळाच्या दुष्कृत्यांची चौकशी करण्यांत येईल. आणि ते अपराधी ठरले तर नवें मंत्रिमंडळ नेमण्यांत येईल. तोंपर्यंत तात्पुरती व्यवस्था पहिलें मंत्रिमंडळ बंधमुक्त करण्यांत येऊन त्यांच्या हातांत देण्यांत येईल.

आमच्याच जागीं नवग्रह मंत्रिमंडळ कैदेंत राहील. शेवटीं आम्हा दोघां डॉक्टरांचे आभार मानून शहरबंदोबस्ताच्या तयारीला युवक मंडळ गेलें. पहिलें मंत्रिमंडळ अधिकारावर आलें. लष्करी अधिकारी धर्मसिंग यानेंच ही क्रांती बंड करून सुलभ केली. वीर सत्यशीलांना माझ्याबरोबर खुणेची अंगठी देऊन त्यांनी हेंच सुचविलें होतें.

सर्व लोक आपल्या घरीं गेले. पूर्ण मंत्रिमंडळ आपल्या जुन्या अधिकारावर आलें. जनतेला व प्रांतांना सर्व कारस्थान व हकीकत कळविण्यांत आली. वर्तमानपत्रांत सर्व हकीगती दिल्या व क्रांति शांततेने पार पाडली. दुष्टांचे साथी भिऊन गेल्यामुळे व त्यांना आधार न राहिल्याने त्यांनी कांही गडबड केली नाही. बाकी इतर सर्वांना आनंद वाटला.

लोकांना हळू हळू नित्य कळतच होतें. मंत्रिमंडळाने ही स्वार्थी लोकांची लिमिटेड कंपनीच स्थापन केली होती. आरोपाच्या केसचं पुस्तक छापणें सुरू झालें होतें.

नवग्रह मंत्रिमंडळाच्या दुष्टतेचें बलीदान म्हणून पागलखान्यांत वेडया करून टाकललेल्या स्त्रिया मात्र खरोखरच वेडया झाल्या व जगांतून उठल्या. डॉक्टरांना त्यांच्याकरितां भारी भारीच वाईट वाटे. म्हणून ते व मी येथेच राहलों. सौभाग्यवती मला मदत करीत असे..

त्या वेडया स्त्रियांच्या बाबतींत ईश्वर नवग्रह मंत्रिमंडळाला क्षमा करील काय?

समाप्त